CMYK





सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह




धाराशिव | बुधवार, २३ सप्टेंबर २०२६ । वर्ष ४ थे अंक १९४ । पाने १२+८ । किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. ▌dainiktarunbharat.com ▌epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



बळाशिवाय तत्त्व, सत्तेशिवाय न्याय आणि प्रयत्नांशिवाय नियती अपूर्ण आहे, हे व्यावहारिक सत्य आहे. म्हणूनच संपूर्ण हिंदू समाजाने आपल्या पूर्ण शक्तिनिशी एकजूट होऊन उभे राहिले पाहिजे.

**स्व. यादवराव कृष्ण जोशी**
रा. स्व. संघाचे पूर्व
सह सरकार्यवाह

# केंद्राची प्रतीक्षा न करता शेतकऱ्यांना मदत करणार

## मुख्यमंत्री फडणवीस यांचे आश्वासन; शनिवारपर्यंत प्राथमिक अधिसूचना काढणार

**मुंबई, २२ सप्टेंबर**

शेतकऱ्यांना आपल्या अडचणी, तक्रारी अथवा म्हणणे मांडण्याची संधी मिळावी, यासाठीही व्यवस्था केली जाणार आहे. केंद्राकडे आर्थिक मदतीचे पॅकेज मागितले जाणार असून, त्यासाठी स्वतंत्र प्रस्ताव तयार करण्याची प्रक्रिया राज्य सरकारकडून सुरू करण्यात येणार आहे. मात्र, अतिवृष्टी, पावसाची अनियमितता आणि नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य सरकार केंद्राच्या आर्थिक मदतीची वाट पाहत बसणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्र्यांनी राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत सुरूच राहणार असल्याचे सांगितले.

केंद्राकडून मदत मिळविण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (एनडीआरएफ) च्या नियमांनुसार प्रस्ताव सादर करावा लागतो. त्यासाठी कायद्यात निश्चित केलेली प्रक्रिया आणि कालमर्यादा आहे. त्यामुळे या प्रक्रियेचे पालन करून केंद्राकडे प्रस्ताव पाठविलाच जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

यापूर्वीही राज्यात दुष्काळ अथवा अतिवृष्टीसारख्या परिस्थिती निर्माण झाल्यानंतर केंद्राच्या मदतीची प्रतीक्षा न करता राज्य सरकारने तातडीच्या उपाययोजना केल्या आहेत. यापुढेही शेतकऱ्यांना आवश्यक असलेली मदत राज्याच्या माध्यमातून सुरू ठेवण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

केंद्राकडे जाणारा प्रस्ताव आणि राज्य सरकारकडून केली जाणारी मदत या दोन्ही प्रक्रिया समांतरपणे सुरू राहणार असल्याने आपत्तीग्रस्त शेतकर्यांना तातडीचा दिलासा देण्यावर सरकारचा भर असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.



### बांधावर जाणार मुख्यमंत्री

ही उपसमिती दर आठवड्याला बैठक घेऊन स्थानिक प्रशासनाकडून आलेल्या अहवालांचा आढावा घेईल. ही कॅबिनेटची सब-कमिटी असल्याने या समितीला मंत्रिमंडळाचे सर्व अधिकार प्रदान करण्यात आले आहेत, ज्यामुळे तातडीने उपाययोजना राबवणे शक्य होणार आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सर्व मंत्री आणि आमदारांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाण्यास सुरुवात केली आहे. स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेदेखील प्रभावित भागांची पाहणी करण्यासाठी बांधावर जाणार आहेत.

### दुष्काळ निवारणासाठी विशेष उपसमिती

राज्यात निर्माण झालेल्या संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी आणि बळीराजाला तातडीने दिलासा देण्यासाठी महायुती सरकार ॲक्शन मोडमध्ये आले आहे. स्थानिक पातळीवर बिकट परिस्थितीनुसार तत्काळ निर्णय घेता यावेत, यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली एका ९ मंत्र्यांच्या विशेष मंत्रिमंडळ उपसमितीची घोषणा केली आहे.

उच्चस्तरीय समितीत मंत्री गिरीश महाजन, गुलाबराव पाटील, संजय राठोड, पंकजा मुंडे, दत्तामामा भरणे, जयकुमार गोरे, प्रताप सरनाईक, मकरंद आबा पाटील आणि बाबासाहेब पाटील या मंत्र्यांचा समावेश आहे. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल हे या उपसमितीचे सदस्य सचिव म्हणून कामकाज पाहणार आहेत. ◂ (तभा वृत्तसेवा)

### स्थानिक स्वराज्य संस्थांना विशेष अधिकार

पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्यासह स्थानिक स्वराज्य संस्थांना विशेष अधिकार आणि निर्देश देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महानगरपालिका, नगरपालिका आणि पंचायती राज संस्थांकडे पाणीपुरवठ्याचे सर्वंकष नियोजन सोपवण्यात आले आहे.


# सार्वजनिक स्थळी फटाक्यांवर बंदी

## उच्च न्यायालयाचा दणका; उपकरणे जप्त करण्याचे निर्देश



**मुंबई, २२ सप्टेंबर**

मुंबई उच्च न्यायालयाने धार्मिक सण आणि उत्सवाच्या काळात सार्वजनिकस्थळी फटाके फोडण्यावर बंदी घातली आहे. धार्मिक सण-उत्सव आणि मिरवणुकांदरम्याना होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाची गंभीर दखल घेत उच्च न्यायालयाने काल सु-मोटो दाखल करुन घेत सरकारला बाजू मांडण्याचे निर्देश दिले होते. न्यायमूर्ती जी.एस. कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने ध्वनीप्रदूषण प्रकरणावर दोन वेळा सुनावणी घेतली असून, मंगळवारी झालेल्या सुनावणीत न्यायालयानं धार्मिक सण-उत्सव आणि मिरवणुकांदरम्यान सार्वजनिक स्थळी फटाके वाजवण्यास बंदी घातली आहे.



ध्वनी प्रदूषण तसेच पर्यावरणासंदर्भात नियमावली स्पष्ट आहे. तरी ध्वनी प्रदूषणाच्या तक्रारी येतात, मग हे थांबवणार कसे? असा सवाल मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला केला आहे. पंढरपूरच्या वारीत हजारो लोक भजन आणि जयघोष करतात. त्यात टाळ वाजवला जातो आणि तिथे ध्वनी प्रदूषण होत नाही, असे निरिक्षण उच्च न्यायालयाने नोंदविले. दरम्यान, राज्य सरकारने न्यायालयात आपली बाजू मांडताना परवानगी फक्त मिरवणुकीला आहे, ध्वनिक्षेपकांना कोणतीही परवानगी नसल्याचे सांगितले. ध्वनिक्षेपकांचा वापर करताना मर्यादेच्या अधीन राहणे बंधनकारक असून, लेसर लाईटच्या वापराला, मिरवणुकीत फटाके फोडायलाही परवानगी नसल्याचे राज्य सरकारने उच्च न्यायालयात स्पष्ट केले.

राज्य सरकारच्या शांतता क्षेत्रांच्या यादीत रुग्णालय आणि शाळांसह धार्मिक स्थळदेखील मोडतात. मग गणपतीचे मंडप देखील शांततात क्षेत्रात मोडू शकतात मात्र त्यासाठी ते सूचीबद्ध करावे लागेल, अशी भूमिका राज्य सरकारने मांडली. ध्वनी प्रदूषणाची मर्यादा उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे तसेच उपकरणांची जप्ती करण्याचे आदेश उच्च न्यायालयानं राज्य सरकारला दिले आहेत. ◂ (तभा वृत्तसेवा)

### परवानगी नसेल तर ध्वनिक्षेपक लावता येणार नाही

ढोल-ताशा पथकांमध्ये हातोड्याने बडवण्यात येणाऱ्या पत्र्याच्या सिलेंडरवर बंदी घालण्यात आली असून मंडळांना परवानगी जाहीर प्रदर्शित करावी लागेल. परवानगी प्रदर्शित न केल्यास ध्वनिक्षेपक लावता येणार नसल्याचे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच, भविष्यात परवानगी देताना अनामत रक्कम घेण्याच्या सूचनांचे उल्लंघन झाल्यास अनामत रक्कम जप्त करण्याच्या सूचना उच्च न्यायालयाने दिल्यात.

# जरांगेंच्या सहकाऱ्यांच्या आर्थिक व्यवहारांची होणार चौकशी

**मुंबई, २२ सप्टेंबर**

मनोज जरांगे पाटील यांचे माजी सहकारी अजय बारस्कर यांनी केलेल्या आरोपांनंतर मराठा आरक्षण आंदोलनाशी संबंधित काही नेते, त्यांचे नातेवाईक आणि व्यावसायिक सहकाऱ्यांच्या आर्थिक व्यवहारांची आयकर विभागाकडून छाननी केली जाणार असल्याची माहिती समोर येत आहे.

आयकर विवरणपत्रे, मालमत्ता, मोठे आर्थिक व्यवहार तसेच व्यावसायिक संबंधांची तपासणी केली जाणार आहे. जरांगे यांच्या आंदोलनाशी संबंधित व्यक्ती किंवा त्यांच्या नातेवाईकांशी संबंधित कंपन्यांना मिळालेल्या सरकारी कंत्राटांचीही चौकशी केली जाणार असल्याची चर्चा आहे. प्राथमिक माहितीनुसार, संबंधित व्यक्तींच्या आर्थिक व्यवहारांसोबतच निधीच्या स्त्रोताची, जमीन आणि मालमत्तेचीही छाननी केली जात आहे. छत्रपती संभाजीनगरमधील एका कंपनीला सुमारे ७६४.७ कोटी रुपयांची सरकारी कामे मिळाल्याच्या आरोपांचीही तपासणी केली जाणार आहे. कंत्राटातील बोली प्रक्रिया आणि संबंधित व्यवहारांमध्ये झालेली वाढ यांचीही तपासणी होणार आहे. बारस्कर यांनी जरांगे यांच्यावर आंदोलनाच्या माध्यमातून कंत्राटे मिळवून दिल्याचे आरोप केले होते. ◂ (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### चार दिवसांच्या तेजीला लगाम

**मुंबई :** माहिती तंत्रज्ञान, सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि तेल-गॅस शेअर्समधील विक्रीच्या दबावामुळे मंगळवारी भारतीय शेअर बाजारातील चार दिवसांच्या तेजीला पूर्णविराम मिळाला. चढ-उताराच्या सत्रानंतर बाजार २३,३५० च्या खाली बंद झाला. जागतिक बाजारातून मिळालेल्या सकारात्मक संकेतांमुळे बाजाराची सुरुवात तेजीने झाली. मात्र, सुरुवातीच्या काही तासांतच बाजारावर दबाव वाढला आणि निफ्टी दिवसभरातील २३,२८५.७५ च्या सखल स्तरावर पोहोचला. ब्रेंट क्रूडच्या दरात सलग पाचव्या दिवशी घसरण होऊन तो प्रति बॅरल १०० डॉलरच्या खाली आला. यामुळे बाजाराला काही प्रमाणात दिलासा मिळाला.

### २८ सप्टेंबरपासून बँका तीन दिवस बंद

**नवी दिल्ली :** युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सने २८ सप्टेंबरपासून तीन दिवसांच्या देशव्यापी संपाची घोषणा केली आहे. मंगळवारी उपमुख्य कामगार आयुक्तांसमोर झालेली सलोख्याची बैठक अनिर्णित राहिली. हा संप २८, २९ आणि ३० सप्टेंबर रोजी होणार आहे. यापूर्वी, अर्थ मंत्रालयाने बँक कर्मचाऱ्यांना संप न करण्याचे आवाहन केले होते. या घोषणेनंतर, पुढील आठवड्यात बँका सलग पाच दिवस बंद राहतील हे जवळपास निश्चित झाले आहे. २६ व २७ सप्टेंबर महिन्यातील चौथा शनिवार आणि रविवार आहे. मुख्य मागणी आठवड्यात पाच दिवस बँकिंगची आहे. इतर मागण्यांमध्ये पेन्शन अद्ययावत करणे आणि त्यात सुधारणा करणे, सर्व पेन्शनधारकांसाठी एकसमान महागाई भत्ता सूत्र, राष्ट्रीय पेन्शन प्रणाली कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शन योजनेत जाण्याचा पर्याय देणे या मागण्यांचा समावेश आहे.

### मुख्यमंत्री फडणवीस बार्शीत घेणार दुष्काळाचा आढावा

**बार्शी, दि.२२ सप्टेंबर-**

सध्याच्या पावसाळ्यात सोलापूर जिल्ह्यात पावसाने दडी मारल्याने बार्शी तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पाऊस नसल्याने खरीपातील सर्वच पिकांना मोठा फटका बसला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्या बुधवारी बार्शी तालुक्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. बार्शी तालुक्यातील कुसळंब आणि पाथरीच्या शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेणार आहेत. शेतकऱ्यांशी संवादही साधणार आहेत. दुपारी २ वाजता कुसळंब येथील शेतशिवारात मुख्यमंत्री फडणवीस पिकांची पाहणी करणार आहेत.

## सुधारित एससी-एसटी कायदा

# जनहित याचिका फेटाळली

### २०२० मधील निकालावर फेरविचारास नकार

**नवी दिल्ली, २२ सप्टेंबर**

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यातील २०१८ मधील सुधारणेच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या जनहित याचिकेवर विचार करण्यास सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी नकार दिला. या सुधारणेद्वारे अटकपूर्व जामिनावर निर्बंध पुन्हा लागू करण्यात आले होते.

सुधारित कायद्यान्वये, एफआयआर नोंदवण्यापूर्वी प्राथमिक चौकशी करण्याची आणि अटकेपूर्वी पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकताही काढून टाकण्यात आली होती. सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची व न्या. व्ही. मोहना यांच्या न्यायासनाने ब्रिजभूषण सैनी यांची याचिका फेटाळली. सर्वोच्च न्यायालयाने २०२० मध्येच या सुधारित तरतुदी वैध ठरवल्या होत्या, असे निरीक्षण न्यायासनाने नोंदवले. २०२० च्या निकालाचा फेरविचार केला जावा, हा सैनी यांच्या वतीने बाजू मांडणारे वकील विष्णू शंकर जैन यांनी केलेला युक्तिवादही न्यायालयाने फेटाळून लावला. या तरतुदींचा संभाव्य गैरवापर रोखण्यासाठी पुरेशी सुरक्षाकवचे यापूर्वीच निश्चित करण्यात आली आहेत, असे न्यायासनाने स्पष्ट केले.

वकिलांनी या कायद्यांतर्गत नोंदवल्या गेलेल्या प्रकरणांमधील शिक्षेचे प्रमाण कमी असल्याचा उल्लेख केला आणि वैधानिक योजनेअंतर्गत नुकसानभरपाई वाटप करण्याच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. नुकसानभरपाई म्हणून ४९३ कोटी रुपये वाटण्यात आले आहेत आणि अशी यंत्रणा एफआयआर दाखल करण्यास प्रोत्साहन देऊ शकते, असा आरोप त्यांनी राज्यसभेच्या एका सदस्याच्या भाषणाचा संदर्भ देत केला. सर्वोच्च न्यायालयाच्या २०१८ मधील निकालात नमूद केलेल्या त्रुटी दूर न करता, केवळ २०१८ च्या सुधारणेद्वारे संसद अशा तरतुदींना वैध ठरवू शकत नाही, ज्यांना न्यायालयाने यापूर्वी सौम्य केले होते, असे त्यांनी पुढे म्हटले. ◂ (वृत्तसंस्था)

## आज १२ तासांची असणार दिवस-रात्र

**नवी दिल्ली, २२ सप्टेंबर**

उत्तर गोलार्धात ऋतू बदलणार आहेत आणि जगभरात हा बदल दर्शवणारी तीच खगोलशास्त्रीय घटना भारतातही अनुभवायला मिळेल. नासाच्या २०२६ च्या खगोलशास्त्रीय गणनेनुसार, सप्टेंबर 'विषुव दिन' २३ सप्टेंबर रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी ५.३५ वाजता होईल. नावाप्रमाणे 'विषुव दिना'चा अर्थ पृथ्वीवरील प्रत्येक ठिकाणी नेमके १२ तास सूर्यप्रकाश आणि १२ तास अंधार असेल, असा नाही. ही घटना वर्षातून दोनदा म्हणजेच एकदा मार्चमध्ये आणि एकदा सप्टेंबरमध्ये घडते. सूर्याचा केंद्र पृथ्वीच्या विषुववृत्ताला ओलांडतो, तेव्हा हे घडते. ◂ (वृत्तसंस्था)

# जुन्या घराची भिंत अंगावर कोसळून मावशी-भाचीचा करुण अंत

■ **वैराग (ता.बार्शी) येथील घटना**

■ **तीन जण थोडक्यात बचावले**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२२ सप्टेंबर-**

जुन्या व जीर्ण झालेल्या घराची भिंत अचानक कोसळल्याने ढिगाऱ्याखाली दबून मावशी आणि भाचीचा करुण अंत झाला. सुमन महादेव पारधे (वय-७६, रा.इंदिरानगर, वैराग), मिना उर्फ मिलन गुलाब ठोंबरे (वय-५६, रा.खेंदाड गल्ली, वैराग), अशी त्यांची नावे आहेत. दरम्यान, यात तीन जण थोडक्यात बचावले. ही घटना बार्शी तालुक्यातील वैराग येथील खेंदाड गल्ली येथे घडली.

याबाबतचे वृत्त असे की, वैराग येथील लक्ष्मीचे कुरण परिसरात ठोंबरे कुटुंबीय वास्तव्यास आहेत. सोमवार, दि.२१ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री जेवण आटोपून सर्व कुटुंबीय झोपले होते. घराच्या एका खोलीत मिना उर्फ मिलन गुलाब ठोंबरे




व त्यांच्या मावशी सुमन महादेव पारधे या दोघी झोपल्या होत्या. तर शेजारील दुसऱ्या खोलीत रामा गुलाब ठोंबरे, निशा गुलाब ठोंबरे व त्यांचा चिमुकला मुलगा वीर झोपलेले होते.

मंगळवार, दि.२२ सप्टेंबर २०२६ रोजी पहाटे ५.३० वाजण्याच्या सुमारास सर्वजण गाढ झोपेत असताना जुन्या घराची कमकुवत झालेली भिंत अचानक मोठा आवाज करत कोसळली. भिंतीचा जड आणि मोठा भाग मिना ठोंबरे आणि सुमन पारधे ह्या दोघी झोपलेल्या खोलीवर पडल्याने पत्रे तुटून त्या क्षणार्धात विटा-मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडल्या गेल्या. रामा ठोंबरे, निशा ठोंबरे, वीर ठोंबरे हे तिघे बचावले आहेत. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच वैराग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अमोल कादबाने, पोलिस उपनिरीक्षक प्रतापसिंह जाधव, पोलिस कॉन्स्टेबल उमेश कंगले, गणेश चव्हाण यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. याबाबत जगदाळे मामा रुग्णालयचे वैद्यकीय अधिकारी डॉ.सावंत यांनी वैराग पोलिस ठाण्याला माहिती दिली. पोलिस उपनिरीक्षक विक्रम वडणे हे पुढील तपास करीत आहेत.

### स्थानिकांची धावपळ अन् बचावकार्य

भिंत कोसळल्याचा प्रचंड आवाज होताच शेजारील खोलीत झोपलेले कुटुंबीय दचकून जागे झाले. त्यांच्या आक्रोशामुळे स्थानिक नागरिक आणि नातेवाईक घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनी कोणतीही वेळ न दवडता शर्थीचे प्रयत्न करुन ढिगारा हटवून ढिगाऱ्याखाली दबलेल्या दोघींना बाहेर काढले. त्या दोघींना वैराग येथील एका खासगी रुग्णालयात प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी बार्शी येथील जगदाळे मामा रुग्णालयकडे नेण्यात आले. याठिकाणी डॉक्टरांनी त्या दोघींना मृत घोषित केले.

# परिषदेच्या पाच जागांसाठी २३ ऑक्टोबरला निवडणूक

### पदवीधर-शिक्षक मतदारसंघांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर

**मुंबई, २२ सप्टेंबर**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील पाच जागांसाठी अखेर निवडणुकीचे बिगुल वाजला आहे. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), पुणे आणि नागपूर विभाग पदवीधर, तसेच अमरावती आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघांसाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार असून, २७ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे.

भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार २९ सप्टेंबरला निवडणूक अधिसूचना प्रसिद्ध होईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत ६ ऑक्टोबर असून, ७ ऑक्टोबरला अर्जांची छाननी केली जाणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ ऑक्टोबर आहे. मतदान २३ ऑक्टोबरला सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत होईल. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण केली जाणार आहे.

या पाच मतदारसंघांतील विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी संपत आहे. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) विभाग पदवीधर मतदारसंघाचे सतीश चव्हाण, पुणे विभाग पदवीधरचे अरुण लाड, नागपूर विभाग पदवीधरचे अभिजीत वंजारी, अमरावती विभाग शिक्षकचे किरण सरनाईक आणि पुणे विभाग शिक्षकचे जयंत आसगावकर हे मावळते सदस्य आहेत. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच संबंधित मतदारसंघांमध्ये आचारसंहिता लागू झाली असल्याचे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

### राज्यसभेच्या १२ जागांसाठीही निवडणूक

**नवी दिल्ली :** निवडणूक आयोगाने मंगळवारी उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि पश्चिम बंगालमधील राज्यसभेच्या १२ जागांसाठी निवडणुका आणि पोटनिवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुका १६ ऑक्टोबरला होणार आहेत. विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ नोव्हेंबरमध्ये संपणार असल्याने उत्तर प्रदेशातील १० तर उत्तराखंडमध्ये एका राज्यसभेच्या जागेसाठी निवडणुका होणार आहेत. तसेच पश्चिम बंगालमध्ये एका जागेवर पोटनिवडणूक होईल.

**७२ वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा**

# कार्तिक आर्यन, यामी गौतम सर्वोत्कृष्ट

**केवडीया, २२ सप्टेंबर**

गुजरातमधील केवडीया येथे मंगळवारी झालेल्या ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात यामी गौतमला सर्वोत्कृष्ट अभिनेत्री तर कार्तिक आर्यन आणि ममुटी यांना संयुक्तपणे सर्वोत्कृष्ट अभिनेते पुरस्काराने गौरविण्यात आले. प्रथमच राजधानी दिल्लीबाहेर झालेल्या या सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

विविध श्रेणींमध्ये एकूण ९२ विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. पाच दशकांहून अधिक काळ चाललेल्या कारकिर्दीत भारतीय चित्रपटसृष्टीला दिलेल्या योगदानाबद्दल ज्येष्ठ कन्नड अभिनेते अनंत नाग यांना २०२४ चा दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान करणे, हे या सोहळ्यातील सर्वात मोठे आकर्षण होते. त्यांना २०२५ मध्ये पद्मश्री पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले होते. आदित्य सुहास जांभळे दिग्दर्शित 'आर्टिकल ३७०' या हिंदी चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. अभिनेता-दिग्दर्शक रणदीप हुडा यांना 'स्वातंत्र्य वीर सावरकर' या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकीय पदार्पणाचा पुरस्कार मिळाला, तर राजकुमार पेरियासामी यांना 'अमरन' या तमिळ चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचा पुरस्कार मिळाला. यामी गौतमला 'आर्टिकल ३७०' साठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्री (मुख्य भूमिका) पुरस्कार मिळाला, तर ममूटी आणि कार्तिक आर्यन यांना अनुक्रमे 'ब्रह्मयुगम' आणि 'चंदू चॅम्पियन' साठी सर्वोत्कृष्ट अभिनेता (मुख्य भूमिका) पुरस्कार विभागून देण्यात आला. ◂ (वृत्तसंस्था)



### मनोज मुंतशीर सर्वोत्कृष्ट गीतकार

प्रख्यात चित्रपट निर्माते आदित्य धर यांना ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात त्यांच्या 'आर्टिकल ३७०' या हिंदी चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. 'श्रीकांत' या हिंदी चित्रपटाने सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपटाचा पुरस्कार जिंकला. निर्माते भूषण कुमार यांनी हा पुरस्कार स्वीकारला. तेलुगू चित्रपट 'पुष्पाः द रूल पार्ट-०२' ला सर्वोत्कृष्ट वेशभूषा पुरस्कार मिळाला, तर बंदरेड्डी सुकुमार यांना चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट पटकथा पुरस्कार मिळाला. मनोज मुंतशीर यांना 'मैदान' चित्रपटातील 'जाने दो' या गाण्यासाठी सर्वोत्कृष्ट गीतकार पुरस्कार मिळाला.

**'मानस'मध्ये राहतात ५० हून अधिक गेंडे**

(पान ३ वर)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# चार महिन्यांत ५७१ 'ड' श्रेणीतील शाळांचे रुपडं पालटणार

## भौतिक सुविधांसाठी ६१ कोटींची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ सप्टेंबर-**

जिल्हा परिषदेच्या शाळांमधील भौतिक सुविधांचा अभाव दूर करून शैक्षणिक गुणवत्तेला चालना देण्यासाठी प्रशासनाने आता 'ड' श्रेणीतील शाळांच्या कायापालटाचे लक्ष्य निश्चित केले आहे.

जिल्ह्यातील तब्बल ५७१ 'ड' श्रेणीतील शाळा पुढील चार महिन्यांत 'क' श्रेणीत आणाव्यात, तसेच त्यानंतर टप्प्याटप्प्याने या शाळांना 'अ' आणि 'ब' श्रेणीत नेण्यासाठी नियोजन करावे, असे निर्देश सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी संबंधित शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना तसेच सर्व गटशिक्षणाधिकारी यांना दिले आहेत.

नियोजन समिती सभागृहात शैक्षणिक सुविधा व गुणवत्ता विकास अभियानाच्या आढावा बैठकीतनंतर सर्व अधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांनी निर्देश दिले. जिल्हा परिषदेच्या सुमारे अडीच हजार शाळांचे भौतिक सुविधांच्या आधारे सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यात ५७१ शाळा 'ड', १,०८९ 'क', ९६९ 'ब' तर १३२ शाळा 'अ' श्रेणीत असल्याची माहिती देण्यात आली. 'ड' श्रेणीतील प्रत्येक शाळेसाठी आवश्यक सुविधांचा स्वतंत्र आराखडा तयार करून ग्रामसभेत मांडण्याचे निर्देश गोरे यांनी दिले. पालक, ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी आणि दानशूर व्यक्तींना सहभागी करून घेत शाळा विकासासाठी लोकसहभाग वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे.

### ६१ कोटींचा निधी आवश्यक

मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी बैठकीत शाळानिहाय सर्वेक्षणाचा आढावा सादर केला. 'ड' श्रेणीतील शाळांमध्ये वर्गखोल्यांचे बांधकाम व दुरुस्तीसाठी सुमारे ४२ कोटी, मुलींच्या शौचालयांसाठी ५.२५ कोटी, मुलांच्या शौचालयांसाठी ५.४८ कोटी, शौचालय दुरुस्तीसाठी १.८३ कोटी, संरक्षक भिंतीसाठी १.९० कोटी, २७३ शाळांच्या पाणीपुरवठ्यासाठी १.६९ कोटी आणि विद्युतीकरणासाठी १.१९ कोटी रुपयांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

शासकीय निधीसोबतच सीएसआर, आमदार निधी आणि पंधरावा वित्त आयोगाच्या निधीचा प्रभावी वापर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. जिल्हा नियोजन समितीमार्फत यापूर्वीच २५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, आवश्यकतेनुसार अतिरिक्त निधीचा विचार केला जाईल, असे जैन यांनी स्पष्ट केले.

### सर्वेक्षणातून शाळेच्या गरजा पूर्ण

सर्वेक्षणातून प्रत्येक शाळेच्या गरजा निश्चित झाल्या आहेत. त्यानुसार शाळानिहाय सुधारणा आराखडा तयार करून कामांना प्राधान्य दिले जाईल. भौतिक सुविधा मजबूत करण्यासोबतच शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठीही आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

## दुध काढताना म्हशीने लाथ मारल्याने गवळी जखमी

**सोलापूर** - दूध काढत असताना अचानक म्हशीने छातीवर लाथ मारली.त्यात ३८ वर्षीय गवळी जखमी झाले. ही घटना मार्डी (ता.पंढरपूर) येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडली. सागर पुंडलिक सुतार (वय ३८ रा. मार्डी) असे जखमीचे नाव आहे.सागर सुतार हे रविवारी सकाळी घरात म्हशीची धार काढत होते.त्यावेळी म्हशीने अचानक त्यांच्या छातीवर लाथ मारली. त्यात ते जखमी झाले.त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात आज मंगळवारी दाखल करण्यात आले.

## लहान मुलांच्या भांडणातून महिलेस मारहाण

**सोलापूर** - धानोरे (ता.माढा) येथे लहान मुलांच्या भांडणातून केलेल्या मारहाणीत प्रियांका विजयकुमार मगर (वय ३१) ही महिला जखमी झाली. सोमवारी रात्री १० वाजेच्या सुमारास त्यांना सचिन मगर, नितीन मगर आणि अन्य दोघांनी मिळून मारहाण केली. ही घटना सोमवारी रात्रीच्या सुमारात घडली.त्यांना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## महत्वाचे...




## सांगोल्यातील 'आपुलकी'च्या समाजसेवेची सोलापुरात दखल

### जेपी शांतता पुरस्कार २०२६ ने सन्मान

**सांगोला, दि.२२ सप्टेंबर-**

सामाजिक बांधिलकी, मानवता आणि शांततेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला या संस्थेचा जॉईन फॉर पीस मल्टीपर्पज सोसायटी, सोलापूर यांच्या वतीने प्रतिष्ठेच्या जेपी शांतता पुरस्कार २०२६ ने सन्मान करण्यात आला. सोलापूर येथील डॉ.निर्मलकुमार फडकुले सभागृहात आयोजित सोहळ्यात हा पुरस्कार महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे माजी चेअरमन ॲड. मिलिंद थोबडे यांच्या हस्ते आपुलकी प्रतिष्ठानच्या सदस्यांना प्रदान करण्यात आला. यावेळी माजी आप्रकाश यलगुलवार, पुणे येथील ज्येष्ठ समाजसेवक जाहीरभाई शेख, सोलापूर महानगरपालिकेचे नगरसेवक अमोलबापू शिंदे, मुळेगाव तांडाचे सरपंच विजय राठोड यांच्यासह जॉईन फॉर पीस मल्टीपर्पज सोसायटीचे अध्यक्ष प्रा.डॉ.जैनोद्दीन मुल्ला, सचिव प्रा.जैनुद्दीन पटेल तसेच इरफान लालकोट, मेहबूब पटेल, शफिक रचभरे, ॲड.आसिफ शेख, जावेद मुजावर उपस्थित होते. आपुलकी प्रतिष्ठानच्या माध्यमातून गरजू विद्यार्थी, महिला, दिव्यांग, निराधार कुटुंबे तसेच समाजातील विविध घटकांसाठी सातत्याने सेवाभावी उपक्रम राबविले जात आहेत. या कार्याची दखल घेत संस्थेला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारण्यासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, प्रा.डॉ.राजेंद्र सूर्यवंशी, चंद्रशेखर कवडे, श्रीकांत देशपांडे, दीपक कुलकर्णी, अरविंद डोंबे गुरुजी आणि अतुल वाघमोडे उपस्थित होते. सूत्रसंचालन अकबरखान पठाण, आभार आसिफ शेख यांनी मानले.



## डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त जीएम संस्थेतर्फे अभिवादन

**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याजयंतीनिमित्त जी. एम मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने बुधवार पेठेतील सम्राट चौक येथील डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सामुदायिक बुद्धवंदना घेऊन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त शशिकांत गायकवाड, उत्सव अध्यक्ष अभी क्षीरसागर, आप्पासाहेब बागले, उमेश लोंढे, अविनाश क्षीरसागर आप्पासाहेब गायकवाड, नेहाल क्षीरसागर, संदेश माशाळकर, सचिन थोरात आदी उपस्थित होते.



## माजी आमदार आडम मास्तर यांचा जीवन गौरव पुरस्काराने सन्मान

**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

कामगार, कष्टकरी आणि चालक बांधवांच्या हक्कांसाठी आपल्या संपूर्ण आयुष्यात सातत्याने संघर्ष करणारे माजी आमदार आडम मास्तर यांचा वाहतूक संघटना संयुक्त महासंघांच्या वतीने 'जीवन गौरव पुरस्कार २०२६' देऊन सन्मान करण्यात आला. अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष आणि सामाजिक कार्याची दखल घेत महासंघाने त्यांना हा विशेष सन्मान प्रदान केला. चालक दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय चालकरत्न पुरस्कार सोहळा २०२६ मध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेले चालक बांधव, संघटनेचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. यावेळी महासंघाचे प्रदेश अध्यक्ष रियाज सय्यद, अन्सार शेख, युसुफ शेख, समीर शेख, युसुफ मेजर उपस्थित होते

## सोलापूर जिल्हा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी

**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

पावसाअभावी सोलापूर जिल्ह्यातील खरीप हंगाम संकटात सापडला असून, शेतकरी आणि पशुपालकांसमोर गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्हा तातडीने कोरडा दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून जाहीर



करावा, तसेच पशुधनासाठी दुसऱ्या जिल्ह्यांतून अथवा परराज्यातून चारा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी राधाकृष्ण गोशाळेचे अध्यक्ष व मानद पशुकल्याण अधिकारी अभय कुलथे यांनी केली आहे. एकीकडे देशी गोवंशाच्या संवर्धनासाठी शासनाच्या विविध योजना राबविल्या जात असताना, दुसरीकडे दुष्काळ सदृश परिस्थितीत चाऱ्याअभावी शेतकऱ्यांना पशुधन विकण्याची वेळ येणे ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आणि पशुधन वाचविण्यासाठी तातडीने चाऱ्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे, असे अभय दादा कुलथे यांनी सांगितले. यावेळी गोशाळा महासंघ राज्य कार्यकारिणी सदस्य महेश भंडारी तसेच जगदंब प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय यादव उपस्थित होते.

## लिमयेवाडी येथे चाकूने मारहाण;१४ वर्षाची मुलगी जखमी

**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

तुझे वडील कुठे गेलेत ? अशी विचारणा करून चाकू आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत १४ वर्षाची मुलगी जखमी झाली. ही घटना सलगरवस्ती परिसरातील लिमयेवाडी येथे आज मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली .गोपिका प्रभाकर गायकवाड (वय १४ रा.लिमयेवाडी) असे जखमी मुलीचे नाव आहे. सकाळी आठ वाजेच्या सुमारास गोपिका ही घरात काम करीत होती. त्यावेळी दत्ता लांबतुरे आणि करुणा नावाच्या महिलेने तिला तुझे वडील कुठे गेलेत. अशी विचारणा केली.त्यानंतर तिला चाकूने मारहाण केली. त्यात तिचे मान आणि हाताला जखम झाली. तिला उपचारासाठी वडिलांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## मोदी परिसरात तरुणाला दगडाने मारहाण

**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

दगड आणि लाथा बुक्क्यांनी केलेल्या महाराणी २७ वर्षीय तरुण जखमी झाला ही घटना शहरातील मोदी परिसरातील दुर्गा माता मंदिराजवळ सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली रोहन रवी व्हटेपल्ली (वय २७ रा. मोदी) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो रात्री १२ वाजेच्या सुमारास मोदी परिसरातील दुर्गामाता मंदिराजवळ गेला होता. त्यावेळी कुणाल मलकारी आणि दीपक तुपळेकर या दोघांनी मिळून विनाकारण मारहाण केली. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## बेसबॉल ज्युनियर मुले निवड चाचणी स्पर्धा आज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

सोलापूर शहर व जिल्हा बेसबॉल असोसिएशन यांच्या वतीने बेसबॉल जुनियर मुले जिल्हा निवड चाचणी स्पर्धा बुधवार २३ सप्टेंबर रोजी श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर विमानतळ समोर येथे दुपारी ४ वाजता होईल.

या निवड चाचणीसाठी येताना खेळाडूंनी आधार कार्डची झेरॉक्स व आवश्यक साहित्यसह मैदानावर उपस्थित रहावे. खेळाडूंची जन्मतारीख ही १जानेवारी २००९ नंतरची असावी. यामधून निवडलेला संघ हा २६ ते ३० सप्टेंबर दरम्यान अहिल्यानगर येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेत सहभागी होईल खेळाडूंनी मैदानावर संघटनेचे सचिव प्रा.संतोष खेंडे ९८५०६६६७९५ अथवा गंगाराम घोडके ९४२३७१७२७७ यांच्याशी संपर्क साधावा. या निवड चाचणी स्पर्धेसाठी जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा संघटनेचे जिल्हाध्यक्ष सीए विनोद भोसले, उपाध्यक्ष प्रा.संतोष गवळी व सचिव प्रा. संतोष खेंडे यांनी केले आहे.

## महापालिका छोट्या ठेकेदारांची २८ कोटींची बिले नऊ महिन्यांपासून थकित

### बिले तातडीने न दिल्यास कामबंद आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या विविध कामांची तब्बल २८ कोटी रुपयांची बिले नऊ महिन्यांपासून प्रलंबित आहेत. देयकांची वर्गवारी बदलून छोट्या ठेकेदारांवर अन्याय केला जात असल्याचे आरोप करत बिले तातडीने अदा न केल्यास कामबंद आंदोलन छेडण्याचा इशारा महानगरपालिका कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष रामभाऊ दुधाळ यांनी महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

महापालिका प्रशासनाने ३ ऑगस्ट २०२६ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार देयकांची अ, ब, क आणि ड अशी वर्गवारी केली आहे. मुख्य कार्यालयासह झोन क्रमांक १ ते ८ मधील मेंटेनन्स व इतर कामांचा समावेश 'ब' संवर्गात करण्यात आला आहे. मात्र, ही कामे प्रत्यक्षात अत्यावश्यक स्वरूपाची असून त्यांना 'अ' संवर्गात समाविष्ट करावे, अशी मागणी ठेकेदारांनी केली आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रस्त्यांवरील खड्डे बुजविणे, रस्ते दुरुस्ती, चेंबर उचलणे, विसर्जन कुंडातील गाळ उपसणे यासारखी कामे तातडीने करावी लागतात. त्यासाठी कामगारांना रोजंदारीवर पैसे द्यावे लागतात. मात्र, दुसरीकडे बिले रखडल्याने ठेकेदार आर्थिक अडचणीत सापडल्याचे असोसिएशनने म्हटले आहे.

सर्वसाधारण सभेच्या २० जुलैच्या बैठकीतील विषय क्रमांक ८१ व ८२ मधील वाढीव कामांची सुमारे २८ कोटी रुपयांची बिले प्रलंबित असल्याचा दावा करण्यात आला आहे. ही रक्कम वेळेत न मिळाल्यास सणासुदीच्या काळातील अत्यावश्यक कामांवर परिणाम होण्याची शक्यता ठेकेदारांनी व्यक्त केली आहे.विविध कामांच्या निविदा काढताना शासन आणि उच्च न्यायालयाने छोट्या ठेकेदारांना कामे मिळावीत, यासाठी कामांचे अनावश्यक एकत्रीकरण टाळण्याबाबत आदेश दिल्याचा दावा असोसिएशनने केला आहे. मात्र, प्रशासनाकडून वारंवार कामे एकत्रित करून दीड ते दोन कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या निविदा काढल्या जात असल्याचा आरोप दुधाळ यांनी केला. छोट्या ठेकेदारांवर आधीच अन्याय होत असताना आता तातडीच्या कामांची २८ कोटींची देयके वर्गवारी बदलून रखडविण्यात आल्याने अडचण वाढली आहे. प्रशासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन बिले 'ब' ऐवजी 'अ' संवर्गात समाविष्ट करून तातडीने अदा करावीत, अशी मागणी दुधाळ यांनी केली आहे.

## पावनखिंडीच्या शौर्यगाथेतून इतिहासाचा जागर

### श्री वेद गणपती मंडळाचा देखावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

एमआयडीसी परिसरातील नीलम नगर येथील श्री वेद गणपती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त प्रथमच 'पावनखिंड' या ऐतिहासिक शौर्यगाथेवर आधारित भव्य देखावा साकारण्यात येत आहे.

या देखाव्यात छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती केंद्रस्थानी असून, बाजीप्रभू देशपांडे व मावळ्यांनी पावनखिंडीत दिलेल्या अभूतपूर्व लढ्याचे दर्शन घडविण्यात येणार आहे.

या पावनखिंड देखाव्याचे आज सायंकाळी उद्घाटन होणार आहे. या उपक्रमासाठी मंडळाचे संस्थापक श्रीनिवास मैले, अध्यक्ष नागार्जुन



राऊल, उपाध्यक्ष जयेंद्र बिच्चल व नवीन पोब्बती, सल्लागार बालाजी ध्यावरकोंडा, प्रकाश तुम्मा, नागेश कैरमकोंडा, अंबादास दुबासी, आकाश वंगारी, सुनील वन्नम, अशोक मैले, आनंद मैले, सचिव वेणु गुंडेटी, सहसचिव श्रीकांत वन्नम, खजिनदार मधुसूदन मार्चला, सहखजिनदार उमेश वंगारी, कार्याध्यक्ष महेश कैरमकोंडा, मिरवणूक प्रमुख श्रीशैल पुजारी, तुषार भोसले, लक्ष्मण अंदिगर, गोवर्धन दुभाषी, रवी संगा, राजू गुंडेटी, लक्ष्मण गुंडेटी, अभी मैले, प्रमुख चेतन तुम्मा, बालाजी दुभाषी यांच्यासह नवनाथ शितोळे, आदित्य द्यावरकोंडा, गणेश गुंडेटी, साई येमूल परिश्रम घेत आहेत.

## सोलापूरच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रतिभा आणि मेहनतीची क्षमता : ऋषीकेश कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

सोलापूरच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रतिभा आणि मेहनतीची क्षमता आहे. परंतू त्यांना मोठ्या अपेक्षांप्रमाणे प्रयत्न करणेही गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी यशासाठी '५ डी' वर लक्ष केंद्रित करावे. यामध्ये डिक्लेरेशन, डेडिकेशन, डिटरमिनेशन, डिसिप्लिन आणि डेडलाइनचा समावेश आहे, असे मार्गदर्शन ऋषिकेश कुलकर्णी यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ सोलापूर एमआयडीसी आणि उद्योग बँक माजी सेवक सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बौद्धिक व्याख्यानमालेत 'सोलापूरचे कौशल्य सोलापूरच्या विकासासाठी' या विषयावर सोलापूरचे ऋषिकेश कुलकर्णी यांनी सोमवारी सातवे पुष्प गुंफले. या व्याख्यानमालेचे यंदाचे ६१ वे वर्ष आहे. वक्त्यांचा परिचय व्याख्यानमाला अध्यक्ष गोवर्धन चव्हाण यांनी करून दिला.प्राचार्य एम. एम.बीडकर यांनी




स्वागत आणि प्रास्ताविक केले. आभार प्रदर्शन प्रा. विठ्ठल वंगा यांनी केले.

कुलकर्णी म्हणाले, सोलापुरातील अनेक कंपन्यांना प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज आहे. मात्र, पुणे आणि मुंबईतील जीवनशैलीकडे विद्यार्थी आकर्षित होतात. त्याऐवजी सोलापुरातच रोजगाराच्या संधी स्वीकाराव्यात. स्थानिक पातळीवर काम केल्याने वेळेचे नियोजन शक्य होते. घरचे जेवण आणि कुटुंबाचा सहवास, हेही सोलापुरात काम करण्याचे महत्त्वाचे फायदे आहेत, असे त्यांनी सांगितले.



## आहार, विहार, निद्रा ही त्रिसूत्री उत्तम असेल तर जीवनशैली उत्तम : डॉ. शेंडगे

### मनोरमा मल्टिस्टेटतर्फे जीवनशैली व आहारावर व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

आहार, विहार आणि निद्रा या त्रिसूत्रीचा योग्य पद्धतीने अवलंब केल्यास जीवनशैली निरोगी राहण्यास मदत होते. बैठे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी विशेषतः आहाराच्या वेळा, व्यायाम आणि पुरेशी झोप याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. शिळे अन्न टाळावे, सकाळचा नाश्ता पौष्टिक असावा आणि जेवणाच्या वेळा नियमित ठेवाव्यात, असे मार्गदर्शन डॉ. विद्या शेंडगे यांनी केले.

मनोरमा पावन गणपती पूजनिमित्त मनोरमा मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीतर्फे जीवनशैली व आहार या विषयावर मनोरमा सांस्कृतिक भवन येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मल्टिस्टेटच्या चेअरमन शोभा मोरे होत्या. व्यासपीठावर बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे, डॉ. सत्यजित वाघचवरे, डॉ. शुभांगी वाघचवरे आणि सीईओ शिल्पा कुलकर्णी उपस्थित होते.

रात्रीचे जेवण शक्यतो सात वाजेपर्यंत करावे. रात्री हलका आहार घ्यावा. जेवणानंतर किमान १५ मिनिटे शतपावली करावी. पुरेशी झोप घेतल्यास आरोग्याच्या अनेक समस्या टाळण्यास मदत होते. पावसाळ्यात पालेभाज्या, ऋतुनुसार फळे आणि सॅलडचा आहारात समावेश करावा. जंकफूड शक्यतो टाळावे. सकाळी उठल्यानंतर कोमट पाणी, दुपारी कोकम सरबत तसेच काकडी, टोमॅटो, गाजर, बीट यांसारख्या पदार्थांचा आहारात समावेश करावा. असा सल्ला डॉ. शेंडगे यांनी दिला. यावेळी डॉ. सत्यजित वाघचवरे आणि डॉ. शुभांगी वाघचवरे यांनी दातांचे आरोग्य या विषयावर मार्गदर्शन केले. प्रारंभी शिल्पा कुलकर्णी यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. विद्या भगरे-भोसले यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास मनोरमा मल्टिस्टेटच्या शाखांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## सासऱ्याचा खून करणाऱ्या जावयाचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

पत्नीसोबत घटस्फोट झाल्याचा राग मनात धरून सासऱ्याचा गळ्यावर चाकूने वार करून निर्घृण खून करणाऱ्या जावयाचा जामीन अर्ज सोलापूरचे जिल्हा व सत्र न्यायाधीश (८) श्री. जे. जे. मोहिते यांनी फेटाळून लावला आहे.

सादिक सैपन दफेदार (रा. पानमंगळूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर) असे जामीन फेटाळण्यात आलेल्या आरोपी जावयाचे नाव आहे.या खटल्याची सविस्तर हकीकत अशी की, २४ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२ च्या सुमारास दक्षिण सोलापूर तालुक्यातील इंगळगी ते कणबस रोडलगत असलेल्या शेतात (गट नं. ८) सिकंदर मुळका शेख हे उसाच्या पिकाला पाणी देत होते. यावेळी आरोपी जावई सादिक दफेदार याने त्याची पत्नी शेहनाज दफेदार हिच्याशी घटस्फोट झाल्याचा राग मनात धरून सिकंदर शेख यांच्या गळ्यावर चाकूने वार करून त्यांचा खून केला. त्यानंतर आरोपीने स्वतःच्या गळ्यावरही वार करून जीवन संपवण्याचा प्रयत्न केला होता. याप्रकरणी मृताचा पुतण्या आलम उर्फ लाला जहांगीर शेख याने वळसंग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. पोलिसांनी तपास करून आरोपीविरुद्ध भा.न्या.सं. कलम १०३(१), ३५१(२)(३) अन्वये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.खटल्याच्या सुनावणीदरम्यान आरोपीच्या वकिलांनी, 'घटना रागाच्या भरात घडली असून आरोपीची मानसिक स्थिती ठीक नव्हती,' असा युक्तिवाद करत जामीन मिळण्यासाठी अर्ज केला होता. याला सरकारी पक्षाने तीव्र विरोध केला. जिल्हा सरकारी वकील ॲड. डॉ. प्रदीपसिंग मो. राजपूत यांनी न्यायालयात युक्तिवाद केला की, 'सरकार पक्षाकडे प्रत्यक्षदर्शी बाल साक्षीदार, वैद्यकीय आणि परिस्थितीजन्य भक्कम पुरावा आहे. आरोपी हिंसक प्रवृत्तीचा असून जामीन मिळाल्यास तो पुराव्यांशी छेडछाड करू शकतो किंवा साक्षीदारांच्या जीवाला धोका निर्माण करू शकतो.'न्यायाधीश श्री. जे. जे. मोहिते यांनी सरकारी पक्षाचा हा युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपी सादिक दफेदार याचा जामीन अर्ज फेटाळून लावला. सबब सरकार पक्षाचा युक्तीवाद ग्राहय धरुन आरोपीचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे. सदर प्रकरणात सरकारपक्षातर्फे जिल्हा सरकारी वकिल ॲड. डॉ. प्रदिपसिंग राजपूत यांनी काम पाहिले तर आरोपीच्यावतीने ॲड. धनंजय माने यांनी काम पाहिले.



शरद पवार यांनी मुख्यमंत्री असताना जलसिंचनाची कामे योग्य पद्धतीने केली असती, तर आज महाराष्ट्रावर दुष्काळाची वेळ आलीच नसती. सुप्रिया सुळे एक एकर शेतीमधून करोडो रुपये कसे कमावतात, याचे सूत्र त्यांनी सामान्य शेतकऱ्यांना सांगितले पाहिजे.
- नवनाथ बन, भाजपा प्रवक्ते

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
बुधवार २३ सप्टेंबर २०२६ ३

टाटा समूहाची मालकी कोणत्याही एका व्यक्तीकडे राहू नये आणि व्यवसायातील बहुसंख्या भागीदारी लोककल्याणकारी उद्दिष्टांना समर्पित असलेल्या ट्रस्टकडे असावी, याच हेतूने त्यांच्या मालकीचे समभाग ट्रस्टकडे सोपवण्यात आले.
-शरद पवार, अध्यक्ष, (श. प. गट)



# ब्रिटन सौदीच्या मदतीला

## हुथी बंडखोरांचा प्रतिकार करण्यासाठी करणार सहकार्य



लंडन, २२ सप्टेंबर
येमेनमध्ये इराण-समर्थित हुथी बंडखोरांच्या हल्ल्यांचा प्रतिकार करण्यासाठी सौदी अरबला मर्यादित लष्करी मदत देण्याचे ब्रिटनने मान्य केले आहे, अशी माहिती पंतप्रधान अँडी बर्नहॅम यांनी दिली.

सौदीच्या विमानांमध्ये हवेतच इंधन भरण्याची सुविधा 'रॉयल एअर फोर्स' पुरवेल, यावर त्यांनी सहमती दर्शवली आहे, असे बर्नहॅम यांनी न्यू यॉर्कमधील संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेसाठी जात असताना पत्रकारांना सांगितले. हा करार काही आठवड्यांसाठी आहे. याचा आढावा घेतला जाईल, असे बर्नहॅम यांनी सांगितले. हुथी आणि येमेनच्या सौदी-समर्थित सरकारमधील संघर्ष पुन्हा पेटला असून, हुथींनी सौदी अरबवर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. यामध्ये शनिवारी रियाधला लक्ष्य केलेल्या एका हल्ल्याचाही समावेश होता. नंतर तो रोखण्यात आला.

हुथींनी बाब-अल-मंदेब सामुद्रधुनी आणि लाल समुद्रात सौदीच्या जहाजवाहतुकीवर नाकेबंदी जाहीर केली तसेच सौदी अरबच्या हद्दीतील सौदी-संबंधित जहाजे आणि तेल सुविधांवरही त्यांनी हल्ले केले. या महिन्याच्या सुरुवातीला हुथी बंडखोरांनी येमेनमध्ये आगेकूच करत मोखा हे महत्त्वाचे बंदर आणि लाल समुद्रातील काही मोक्याची बेटे आपल्या ताब्यात घेतली. यामुळे त्यांना 'बाब-अल-मंदेब' या मार्गावरील जहाजवाहतुकीवर अधिक चांगल्या प्रकारे लक्ष ठेवणे शक्य झाले आहे. या मार्गावरून जागतिक व्यापारापैकी सुमारे १२ टक्के व्यापार चालतो. सौदी अरबवर हल्ले होत असून, तिथे भविष्यात व्यत्यय येण्याची शक्यता असल्याने ते मार्ग खुले ठेवणे गरजेचे आहे. त्यामुळे ब्रिटन आणि व्यापक क्षेत्राचे हित जपण्यासाठी पावले उचलत आहे, असे बर्नहॅम म्हणाले.
(वृत्तसंस्था)

### हुथींच्या हल्ल्यांचा बर्नहॅम यांच्याकडून निषेध

ब्रिटनने हुथींच्या हल्ल्यांचा बर्नहॅम यांनी निषेध केला. प्रादेशिक स्थिरता राखण्यासाठी, नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी आणि मानवतावादी मदतीचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी यूके आपल्या भागीदारांसोबत काम करेल, असे त्यांनी म्हटले. ब्रिटनच्या अधिकाऱ्यांनी यापूर्वी या मुद्द्यावर तपशीलवार माहिती देण्यास नकार दिला होता. पण, सौदी अरब आणि ब्रिटनमध्ये घनिष्ठ मैत्री असल्याचे नमूद केले होते. बायडेन आणि ट्रम्प यांच्या प्रशासनांच्या काळात हुथी बंडखोरांवर बॉम्बहल्ला करणाऱ्या अमेरिकेने, यावेळी लष्करीदृष्ट्या यात सहभागी होण्याबाबत कोणताही रस दाखवलेला नाही.



# जागतिक व्यवस्था तणावाखाली; बहुपक्षीय सहकार्य आवश्यक

## एस. जयशंकर यांचे प्रतिपादन; पी फोर एम परिषदेचे भूषवले अध्यक्षपद

न्यू यॉर्क, २२ सप्टेंबर
संयुक्त राष्ट्रांच्या ८१ व्या आमसभेच्या पृष्ठभूमीवर आयोजित 'बहुपक्षीयता शिखर परिषदे'त युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी जागतिक आव्हानांवर प्रकाश टाकला. जागतिक व्यवस्था तणावाखाली आहे. त्यासाठी बहुपक्षीय सहकार्य आवश्यक असल्याचे प्रतिपादन एस. जयशंकर यांनी केले.

भारताने सह-प्रायोजक म्हणून बहुपक्षीयता बळकट करण्याच्या आणि संयुक्त राष्ट्रांमध्ये सुधारणा करण्याच्या बाजूने भूमिका मांडली. जागतिक आव्हानांचा सामना करण्यावर आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य अधिक दृढ करण्यावर या परिषदेत विशेष भर देण्यात आला. युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा यांनी ऑस्ट्रेलिया, बार्बाडोस, ब्राझील, कॅनडा, भारत आणि केनिया यांच्यासोबत या उपक्रमाचे सह-यजमानपद भूषवले. सर्व खंडांमधील आंतरराष्ट्रीय समुदायाचे व्यापक आणि वैविध्यपूर्ण प्रतिनिधित्व पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

आम्ही सर्व वेगवेगळ्या प्रदेश, संस्कृती आणि इतिहासातून आलो आहोत, तरीही आम्हाला समान आव्हानांचा सामना करावा लागतो, असे कोस्टा म्हणाले. जग सध्या एका गंभीर वळणावर उभे आहे, जिथे संघर्ष सतत पसरत आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यांकडून आंतरराष्ट्रीय कायद्याचे वारंवार उल्लंघन केले जात आहे.

बहुपक्षीय यंत्रणा सध्या प्रचंड तणावाखाली आहे. हवामान बदल, साथीचे रोग, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आर्थिक असुरक्षितता यासारखी आव्हाने इतकी व्यापक आहेत की लहान किंवा मोठा कोणताही देश त्यांना एकट्याने तोंड देऊ शकत नाही.

त्यामुळे आपण संघर्षांचे रूपांतर सहकार्यात केले पाहिजे. त्यांनी बहुपक्षीय सहकार्य, परस्पर आदर आणि आंतरराष्ट्रीय कायदा यावर आधारित जागतिक जाळे उभारण्याच्या गरजेवर भर दिला. एस. जयशंकर यांनी या उपक्रमाची सुरुवात केल्याबद्दल राष्ट्राध्यक्ष अँटोनियो कोस्टा यांचे आभार मानले. सह-प्रायोजक म्हणून या उपक्रमात सहभागी होताना भारताला आनंद होत असल्याचे त्यांनी नमूद केले.
(वृत्तसंस्था)

### बहुपक्षीयतेचा ठाम पुनरुच्चार गरजेचा

आपण अशा वेळी भेटत आहोत जेव्हा जागतिक व्यवस्था तणावाखाली आहे. गेल्या काही दशकांपासून जग एक प्रकारचा निरंतर समतोल साधण्याची प्रक्रिया अनुभवत आहे. ही एक अशी संरचनात्मक घडामोड आहे जिची खूप आधीच गरज होती. तथापि, तीव्र स्पर्धा, भू-राजकीय तणाव आणि प्रत्यक्ष संघर्ष यांनी या प्रक्रियेला एक वेगळे स्वरूप दिले आहे. या गोष्टींवर वेळीच नियंत्रण न ठेवल्यास, आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या मूळ भावनेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. म्हणूनच, या टप्प्यावर बहुपक्षीयतेचा ठाम पुनरुच्चार करणे अत्यंत आवश्यक आहे, असे जयशंकर म्हणाले.

# तणाव वाढविल्यास भूगोल बदलू

## इराणच्या रिव्होल्युशनरी गार्डचा अमेरिकेला इशारा

दुबई, २२ सप्टेंबर
युद्ध अजून संपलेले नाही. संघर्ष अधिक तीव्र केल्यास युद्धाचा भूगोल बदलू. अमेरिकेसोबतचा संघर्ष अधिक तीव्र झाल्यास इराण आपली शस्त्रे, लष्करी रणनीती आणि लक्ष्यांमध्ये बदल करेल, असा इशारा इराणने अमेरिकेला दिला आहे.

दरम्यान, होर्मुझच्या सामुद्रधुनीत पोहोचलेल्या एका टँकरवर अज्ञात प्रक्षेपक धडकले. यात चालक दलाचे दोन सदस्य जखमी झाले, अशी माहिती ब्रिटनच्या लष्कराने दिली. मंगळवारी यहुदी धर्मातील सर्वात पवित्र दिवस योम किप्पुरसाठी देशाचा बराचसा भाग बंद असल्याने इस्रायली सैन्याने सतर्कता बाळगली आहे. येमेनमध्ये इराण-समर्थित हुथी बंडखोरांच्या हल्ल्यांचा प्रतिकार करण्यासाठी सौदी अरबला मर्यादित लष्करी मदत देण्याचे ब्रिटनने मान्य केले आहे, अशी माहिती पंतप्रधान अँडी बर्नहॅम यांनी दिली. बंडखोर आणि सौदी-समर्थित येमेनी सरकार यांच्यातील संघर्ष पुन्हा भडकल्याने हुथी आणि सौदी अरबने परस्परांवर हल्ले केले आहेत.
(वृत्तसंस्था)



दिल्लीकडे जाणाऱ्या रेल्वेच्या चालक केबिनवर सांबा सेक्टरमध्ये समाजकंटकांनी दगडफेक केली. यामध्ये केबिनच्या काचा फुटल्या. या घटनेनंतर सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी आरोपींच्या शोधासाठी मोहीम हाती घेतली आहे

# माओवाद्यांच्या अड्ड्यांवरून चिनी ग्रेनेड-शस्त्रास्त्रे जप्त

## सुरक्षा दलांची मोठी कारवाई

बिजापूर, २२ सप्टेंबर
छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यातील वनक्षेत्रात माओवाद्यांनी पूर्वी लपवून ठेवलेला शस्त्रास्त्रे, दारूगोळा आणि स्फोटकांचा साठा जप्त करण्यात आला. यात चिनी बनावटीच्या ग्रेनेड्सचाही समावेश असल्याची माहिती पोलिसांनी मंगळवारी दिली.

सुरक्षा दलाने बेद्रे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लंका पहाडी जंगलात या महिन्यात शोधमोहीम राबवली. त्यात हा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. जप्त केलेल्या साहित्यामध्ये एक सेल्फ-लोडिंग रायफल (एसएलआर), एक इन्सास रायफल, एक .३१५ बोरची बंदूक, दोन बॅरल ग्रेनेड लाँचर्स (बीजीएल), बीजीएलचे १७ गोळे, चिनी बनावटीचा ग्रेनेड, एसएलआरची ४९ काडतुसे, .३१५ बोर रायफलची १५ काडतुसे, एसएलआरचे चार मॅगझिन्स आणि एक .३१५ बोरच्या मॅगझिनचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले.

माओवाद्यांच्या अड्ड्यांवरून इतर साहित्यही जप्त करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. जप्त केलेली शस्त्रे आणि इतर साहित्य कायदेशीर प्रक्रियेचे पालन करून ताब्यात घेण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे, असे त्यांनी सांगितले. सुरक्षा दलांनी सप्टेंबर महिन्यात विजापूरमध्ये विविध मोहिमांदरम्यान लपवून ठेवलेले माओवाद्यांचे अनेक साठे हस्तगत केले आहेत. २० सप्टेंबर रोजी भैरमगड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वनक्षेत्रातून एक एके-४७, .३१५-बोरचे शस्त्र, एक सिंगल-शॉट बंदूक, एक पिस्तूल, जिवंत काडतुसे आणि मॅगझिन्स जप्त करण्यात आले, असे त्यांनी सांगितले.
(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'फौजी'चे प्रदर्शन ढकलले पुढे



मुंबई : अभिनेता प्रभास मागील काही काळापासून 'फौजी' चित्रपटामुळे चर्चेत आहे. हनु राघवपुडी दिग्दर्शित हा पीरियड ड्रामा यावर्षी ३ डिसेंबर रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार होता, पण आता निर्मात्यांनी याबाबत माहिती दिली आहे. 'फौजी' चित्रपट पुढे ढकलण्यात आला आहे, असे निर्माते रवी शंकर यांनी सांगितले. चित्रपटाच्या पोस्ट-प्रॉडक्शनचे काम प्रलंबित असल्यामुळे हा चित्रपट २०२७ पर्यंत पुढे ढकलण्यात आला आहे. निर्मात्यांनीही चित्रपट पुढे ढकलल्याची पुष्टी केली आहे, मात्र प्रदर्शनाची नवीन तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. निर्माते रवी शंकर यांनी २१ सप्टेंबर रोजी एका 'प्री-रिलीज' कार्यक्रमात नानीच्या आगामी 'द पॅराडाईज' या चित्रपटाचे प्रदर्शन पुढे ढकलल्याची घोषणा केली.

### 'अंग'ला ऑस्करमध्ये प्रवेश

मुंबई : नागालँडच्या 'अंग' या चित्रपटाला २०२७ च्या ऑस्कर पुरस्कारांच्या 'इंटरनॅशनल फीचर फिल्म' श्रेणीत थेट प्रवेश मिळाला आहे. यावर्षी भारताकडून ऑस्करसाठी जाणारा हा दुसरा चित्रपट असेल. यापूर्वी मराठी चित्रपट 'गोंधळ'ला भारताची अधिकृत प्रवेशिका मिळाली होती. 'अंग'ने टोरंटो इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल २०२६ मध्ये प्लॅटफॉर्म पुरस्कार जिंकला आहे. याच पुरस्कारामुळे चित्रपटाला ऑस्करमध्ये थेट प्रवेश मिळाला. नागा चित्रपट निर्माते थेजा रियो यांचा हा चित्रपट धर्मांतरापासून आपली संस्कृती वाचवण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका आदिवासी व्यक्तीची कथा सांगतो. या चित्रपटातील बहुतांश कलाकार नागालँडमधील स्थानिक आणि आदिवासी समुदायातील आहेत. त्यांच्यासोबत बाफ्टा पुरस्कार (ब्रिटिश अकादमी चित्रपट पुरस्कार) विजेते ब्रिटिश अभिनेते डग्लस हेन्शॉल हेही महत्त्वाच्या भूमिकेत आहेत.

### एप्रिलपासून सुरू होणार '३ इडियट्स' सिक्वेलचे चित्रीकरण



मुंबई : २००९ सालच्या '३ इडियट्स'च्या सिक्वेलचे चित्रीकरण एप्रिल २०२७ पासून सुरू होण्याची शक्यता आहे. दिग्दर्शक राजकुमार हिरानी सध्या चित्रपटाच्या पटकथेवर काम करत आहेत. आमिर खान फेब्रुवारीमध्ये चित्रपटाची अंतिम पटकथा वाचतील, त्यानंतर या प्रकल्पाचे अधिकृत काम पुढे सुरू होईल. या सिक्वेलमध्ये आमिर खानसोबत करीना कपूर खान, आर. माधवन आणि शर्मन जोशी या प्रमुख कलाकारांची जोडी पुन्हा एकदा एकत्र येण्याची अपेक्षा आहे. '३ इडियट्स'चा सिक्वेल सध्या लेखनाच्या टप्प्यात आहे. राजकुमार हिरानी आणि त्यांची टीम पुढील वर्षाच्या सुरुवातीला संहितेचा अंतिम मसुदा तयार करतील. आमिर खान फेब्रुवारीमध्ये ही पटकथा वाचून आपली संमती देईल. आमिर खानची मंजुरी मिळताच निर्माते एप्रिल २०२७ मध्ये चित्रपटाचे चित्रीकरण सुरू करण्याची योजना आहे.

# नार्को-दहशतवादी नेटवर्कचा भंडाफोड

## हरयाणा एटीएसने ७ जणांना केली अटक

पंचकुला, २२ सप्टेंबर
आंतरराष्ट्रीय नार्को-दहशतवादी नेटवर्कशी संबंधित एका प्रकरणाचा भंडाफोड करत हरयाणा एटीएसने पंजाबमधील सात आरोपींना अटक केली. आरोपींच्या ताब्यातून दोन कार, एक मोटारसायकल, एक अमेरिकन बनावटीचे पिस्तूल, एक ३०-बोरचे पिस्तूल, तीन नोटा मोजण्याची यंत्रे, पाच मोबाईल फोन, १२ जिवंत काडतुसे आणि ५२९ ग्रॅम हेरॉईन जप्त करण्यात आले आहे.

हरयाणा एटीएसचे पोलिस अधीक्षक वरुण सिंगला यांनी सांगितले की, १३ सप्टेंबरला पहाटे पंचकुला येथील एका क्लबमध्ये गोळीबाराची घटना घडल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. तपासादरम्यान समोर आले की, पाच तरुण दोन वेगवेगळ्या वाहनांमधून क्लबमध्ये आले होते. क्लबमध्ये दारू पीत असताना त्यांच्यात एका मुद्द्यावरून वाद झाला. त्यानंतर आरोपींपैकी एकाने वाहनातून पिस्तूल काढून दोन गोळ्या झाडल्या. यात एक तरुणी जखमी झाली. जखमी तरुणीला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणात आतापर्यंत सात आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(वृत्तसंस्था)

### तपास दहशतवादविरोधी पथकाकडे हस्तांतरित

**चौकशीदरम्यान, आरोपीचे एका आंतरराष्ट्रीय नार्को-टेररिस्ट नेटवर्कशी असलेल्या संबंधांबाबत महत्त्वाचे पुरावे समोर आले. या नेटवर्कचे काही सूत्रधार विदेशात, विशेषतः अमेरिकेत राहतात. ते आरोपींना राहण्याची सोय, वाहने आणि पैसे पुरवतात, जेणेकरून शस्त्रे, अमली पदार्थ आणि अमली पदार्थांच्या विक्रीतून मिळालेले पैसे सूत्रधारांनी निश्चित केलेल्या ठिकाणी पोहोचवता येतील. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता तपास हरयाणा पोलिसांकडून दहशतवादविरोधी पथकाकडे (एटीएस) हस्तांतरित करण्यात आला.**

# मलेशियाच्या व्हिसा-मुक्त प्रवेश सुविधेचा वापर करू नका

## भारतीय उच्चायुक्तालयाने जारी केली सूचना

क्वालालंपूर, २२ सप्टेंबर
नोकरी शोधण्यासाठी मलेशियाच्या ३०-दिवसांच्या व्हिसा-मुक्त प्रवेश सुविधेचा वापर करू नका, असा इशारा भारताने मंगळवारी आपल्या नागरिकांना दिला. क्वालालंपूरमधील भारतीय उच्चायुक्तालयाने 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक सूचना जारी केली आहे.

या सूचनेत भारताने म्हटले आहे की, फसव्या एजंट्सच्या आमिषाला बळी पडून नोकरीच्या खोट्या आश्वासनांवर मलेशियात येणाऱ्या भारतीय नागरिकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. ३०-दिवसांची व्हिसा-मुक्त सुविधा केवळ पर्यटन आणि सामाजिक भेटींसाठी आहे. या सुविधेअंतर्गत कोणतेही काम किंवा रोजगारास परवानगी नाही, असे सांगत भारतीय उच्चायुक्तालयाने पर्यटक व्हिसावर मलेशियात काम शोधणाऱ्या भारतीय नागरिकांना सावध केले आहे.
(वृत्तसंस्था)

### पर्यटकांसाठी आवश्यक कागदपत्रे बाळगावी

या सूचनेत ल्यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, अनेक भारतीय फसव्या एजंट्सच्या नोकरीच्या खोट्या आश्वासनांना बळी पडतात. यामुळे निर्धारित वेळेपेक्षा जास्त काळ वास्तव्य, बेकायदेशीर दर्जा, शोषण आणि अटकेसह कायदेशीर कारवाई होते. हे मलेशियाच्या इमिग्रेशन नियमांचे उघड उल्लंघन आहे. इमिग्रेशनच्या कोणत्याही समस्या टाळण्यासाठी पर्यटकांनी परतीचे निश्चित तिकिट, हॉटेल बुकिंगचा पुरावा, ऑनलाइन भरलेले 'मलेशिया डिजिटल अरायव्हल कार्ड', किमान सहा महिन्यांची वैधता असलेला पासपोर्ट आदी आवश्यक आणि प्रमाणित कागदपत्रे सोबत बाळगावीत.

### ओडिशामध्येही जोडप्याला केली मारहाण

बंगळूरू : बिहारमधील जमुई येथे एका अल्पवयीन मुलगा आणि मुलीवर झालेल्या हल्ल्यानंतर आता ओडिशामध्येही अशीच एक घटना समोर आली आहे. ओडिशाच्या ढेंकनाल जिल्ह्यात एका तरुणासह महिलेवर झालेल्या हल्ल्याचा आणि विनयभंगाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले आहे. पोलिसांनुसार, पीडित तरुण आणि महिला मोटरसायकलवरून कपिलाशकडे जात असताना काही लोकांनी त्यांना थांबवले. सोशल मीडियावर व्हायरल व्हिडिओमध्ये अनेक लोक त्यांना घेरताना तसेच तरुणाला मारहाण करताना दिसत आहे. तर काही लोक महिलेची छेड काढताना तर ती लोकांना त्या दोघांना सोडून देण्याची गयावया करताना दिसून येत आहे. त्यानंतरही लोकांचे त्यांना मारहाण व गैरवर्तन सुरूच होते.

# 'मानस'मध्ये राहतात ५० हून अधिक गेंडे

## अनेक वर्षांच्या संवर्धनाला यश; पर्यावरण आणि वनमंत्र्यांनी दिली माहिती

गुवाहाटी, २२ सप्टेंबर
'मानस राष्ट्रीय उद्यान' एकशिंगी गेंड्यांनी उल्लेखनीय पुनरागमन केले असून आता युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळात ५० हून अधिक गेंडे मुक्तपणे फिरत आहेत, असे आसामचे पर्यावरण आणि वनमंत्री जयंत मल्ला बरुआ यांनी मंगळवारी सांगितले.

शिकार आणि संघर्षामुळे १९९३ पर्यंत मानसमधील गेंड्यांची संख्या पूर्णपणे नष्ट झाली होती. त्यांच्या नामशेष होण्यापूर्वी या उद्यानात अंदाजे ७५ ते १०० गेंडे होते, असे जागतिक गेंडा दिनानिमित्त समाज माध्यमवर केलेल्या एका पोस्टमध्ये बरुआ म्हणाले. या प्रजातीला मानसमध्ये परत आणण्याचे श्रेय त्यांनी अनेक वर्षांच्या संवर्धन प्रयत्नांना, अधिवासाच्या संरक्षणाला, पुनर्वसन कार्यक्रमांना आणि सामुदायिक सहभागाला दिले. आता या उद्यानात ५० हून अधिक मोठे एकशिंगी गेंडे आढळतात आणि त्यांची संख्या वाढते आहे.

बरुआ यांच्या मते, हे एक उत्साहवर्धक संकेत आहे. ही प्रजाती स्वतःला स्थापित करत आहे आणि आपल्या पुनर्स्थापित अधिवासात एक शाश्वत भविष्य घडवत आहे.



मानसमध्ये सलग तीन वर्षे गेंड्यांची एकही शिकार झालेली नाही. शून्य गेंड्यांपासून ते वाढत्या, प्रजननक्षम लोकसंख्येपर्यंत आणि या प्रदेशातून नामशेष झालेल्या प्रजातीपासून ते 'मानस'च्या गवताळ प्रदेशात पुन्हा एकदा मुक्तपणे फिरणाऱ्या गेंड्यांपर्यंत हे वन विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे द्योतक आहे, असे बरुआ म्हणाले. दृढनिश्चय, संरक्षण आणि सामुदायिक सहभाग एकत्र आले. संवर्धनाच्या सामर्थ्याचे हे एक उदाहरण आहे, असे त्यांनी या पुनरागमनाचे वर्णन केले.

'मानस' शून्यातून हिरो झाले आहे आणि येथे जन्मलेला प्रत्येक गेंडा हा आसामच्या वन्यजीवांचे संरक्षण करण्याच्या आणि एकेकाळी गमावलेले परत मिळविण्याच्या वचनाचे प्रतीक आहे, असे मंत्री म्हणाले. 'मानस राष्ट्रीय उद्यान'ला १९८५ मध्ये युनेस्कोचे जागतिक वारसा स्थळ आणि १९८९ मध्ये बायोस्फिअर रिझर्व्ह म्हणून घोषित करण्यात आले.
(वृत्तसंस्था)

### संघर्षामुळे नष्ट झाले वाघ

**बोडो अतिरेक्यांच्या अशांततेदरम्यान, ज्यात शेकडो झाडे तोडली गेली आणि वन्यजीव मारले गेले, १९९२ मध्ये या उद्यानाला युनेस्कोच्या संकटातील जागतिक वारसा यादीत टाकण्यात आले. या संघर्षामुळे उद्यानातील सर्व गेंडे आणि सुमारे ५० टक्के वाघ नष्ट झाले. संवर्धनाच्या प्रयत्नांनंतर २०११ मध्ये धोक्याचा दर्जा काढून टाकण्यात आला.**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# ज्याच्या हाती कायद्याची लाठी...

एखाद्या व्यक्तीच्या दारावर अचानक पोलिस येतात. त्याला ताब्यात घेतात. घरच्यांना धक्का बसतो. शेजाऱ्यांच्या नजरा वळतात. फोन बंद होतात. संपर्क तुटतो. काही तासांत तो माणूस सर्वांसाठी 'आरोपी' होतो. त्याच्याविरुद्ध काय आरोप आहे, हे त्याला कळते किंवा कळत नाही; पण त्याचे स्वातंत्र्य मात्र संपलेले असते. या टप्प्यावर भारतीय राज्यघटनेने कलम २२ (१) अंतर्गत अप्रत्यक्षपणे पोलिसांना विचारलेल्या प्रश्नाचा पुनरुच्चार करून सर्वोच्च न्यायालयाने ताज्या निर्णयात पोलिसांच्या अनियंत्रित वर्तणुकीला लगाम लावण्याचा प्रयत्न केला आहे. लेखी कारण न दिल्यास अटक बेकायदेशीर ठरते. अशा प्रकरणात पोलिस अधिकाऱ्याची चौकशी केली पाहिजे, असा निर्वाळा दिला आहे. राज्यघटनेच्या कलम २२(१) मध्ये स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, अटक केलेल्या व्यक्तीला त्याच्या अटकेची कारणे शक्य तितक्या लवकर सांगितली पाहिजेत आणि त्याला आपल्या पसंतीच्या वकिलाशी सल्लामसलत करण्याचा व त्याच्यामार्फत बचाव करण्याचा अधिकार नाकारता येणार नाही. तसे हे सारे नवीन नाही. राज्यघटना नवी नाही आणि त्यातील उपरोक्त तरतूदही नवीन नाही. संविधान निर्मात्यांचे जिवंत अनुभव या कलमाच्या मागे आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात घटना लागू झाली. पण, पोलिसांचे स्वरूप एका रात्रीत बदलणारे नव्हते. घटना समितीत झालेल्या चर्चेत या धोक्याची जाणीव असलेल्यांनी आपली मते मांडली आणि त्यामुळेच या कलमाला घटनेत स्थान मिळाले होते. ती चर्चा वाचताना आजही अस्वस्थ वाटते. कारण १९४९ मध्ये व्यक्त झालेली भीती आणि २०२६ सालातील स्थिती यांत फार मोठे अंतर पडलेले नाही. सरकार बदलले. पोलिसांचा गणवेश बदलला. कायदे बदलले. पण, मूलभूत धोका तसाच राहिला. तो असा की, अटक करण्याचा अधिकार असलेल्या व्यक्ती-यंत्रणेकडून अधिकाराचा गैरवापर होऊ शकतो. अनेकदा होतोही. त्यामुळेच पोलिसांच्या अधिकारावर नियंत्रण ठेवण्यासाठी नागरिकांना या कलमान्वये अधिकार दिलेला आहे, हेच सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकवार सांगितले आहे.

प्रत्येक अटक बनावट नसते किंवा प्रत्येक पोलिस अधिकारी दुष्ट हेतूने काम करतो, असे म्हणणे अन्यायकारक आहे. गंभीर गुन्ह्यांचा तपास करायचा असतो. आरोपी फरार होऊ शकतो. पुरावे नष्ट करू शकतो. साक्षीदारांवर दबाव आणू शकतो. आरोपी पुन्हा गुन्हा करू शकतो. काही वेळा तातडीची कारवाई अपरिहार्य असते आणि ती अटक असू शकते. पण, तपासाची गरज आणि घटनात्मक अधिकार यांच्यात निवड करण्याची मुभा पोलिसांना संविधानाने दिलेली नाही. कारण अटक करण्याची प्रक्रिया अत्यंत केंद्रिकृत असते. त्या प्रक्रियेत काही चूक झाली तर त्याच यंत्रणेला ती चूक झाकण्याचा मोह होऊ शकतो. अशा स्थितीत ज्याने चूक केली, त्याला सुटून जाता येऊ नये, हे या घटनात्मक तरतुदीचे मर्म होय. सर्वोच्च न्यायालयाने २१ सप्टेंबरच्या आदेशात जे म्हटले आहे, ते या अनुषंगाने समजून घेतले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा स्पष्ट केले आहे की, अटकेची कारणे लेखी स्वरूपात आणि आरोपीला समजणाऱ्या भाषेत दिली पाहिजेत. सामान्य परिस्थितीत ती अटकेच्या वेळीच दिली जाणे अपेक्षित आहे. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत, अटकेच्या क्षणी लेखी कारण देणे व्यवहार्य नसल्यास प्रथम तोंडी कारण सांगता येईल; पण त्यानंतरही दंडाधिकाऱ्यासमोर रिमांडसाठी नेण्याच्या किमान दोन तास आधी लेखी कारणे देणे आवश्यक आहे. हा कालावधी पाळला न गेल्यास अटक बेकायदेशीर ठरू शकते. याचा सरळ अर्थ असा की, "साहेब, आम्ही त्याला तोंडी सांगितले होते," एवढे सांगून आता प्रकरण संपणार नाही. कारण, तोंडी सांगितल्याचे कोण सिद्ध करणार? म्हणून लेखी पुरावा आवश्यक ठरतो. यापूर्वी एका प्रकरणात वकिलाशी सल्लामसलत, पोलिस कोठडीला विरोध आणि जामीन मागणे यासाठी अटकेची कारणे समजणे आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. एखाद्याची अटक ही अपरिहार्य आहे, असा कायदा राबविणाऱ्या यंत्रणेचा दावा असला, तरी अटकेसाठी लेखी कारणे देऊन आरोपीला कायदेशीर मदत मागण्याचा मार्ग मोकळा करून दिलाच पाहिजे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते.

सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयाचा सर्वांत महत्त्वाचा भाग फेरअटकेसंबंधीचा आहे. समजा एखाद्याला पोलिसांनी अटक केली आणि लेखी कारणे दिली नाहीत. ही अटक बेकायदेशीर असल्याचे दंडाधिकारी म्हणाले. ती व्यक्ती सुटली. आता पोलिस म्हणतात की, कागदोपत्री चूक झाली आहे. ठीक आहे. आता आम्ही त्याला पुन्हा अटक करतो. येथे सर्वोच्च न्यायालयाने ब्रेक लावला आहे. पहिली अटक बेकायदा ठरून व्यक्ती सुटली असेल तर त्याच यंत्रणेला स्वतःच्या मनानुसार त्या व्यक्तीला लगेच पुन्हा अटक करता येणार नाही. तपास यंत्रणेला प्रथम अटकेची लेखी कारणे द्यावी लागतील. पहिल्यांदा कारणे का दिली नाहीत, याचे स्पष्टीकरण द्यावे लागेल आणि पुन्हा कोठडी का आवश्यक आहे, हे सांगावे लागेल. याचा अर्थ असा की, ज्या अधिकाऱ्याने संविधानातील तरतुदीचा भंग केला, त्यालाच पुन्हा नागरिकाचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा अधिकार दिला जाऊ नये. हा पोलिसांवरील अविश्वास नव्हे; हे अधिकारांवरील नियंत्रण होय. सारेच पोलिस कायदा पाळतात असेही नाही. लोकशाहीतील पोलिस यंत्रणा ही 'सरकारची लाठी' नसते. ती कायद्याची अंमलबजावणी करणारी सार्वजनिक यंत्रणा असते. तिला मिळालेले अधिकार नागरिकांकडून आले आहेत. ते त्यांना संविधानाने दिले आहेत आणि संविधान व कायद्यानेच ते मर्यादित केले आहेत. सामान्य नागरिकाकडे अधिकृत सत्ता नसते. पोलिसांकडे ती असते. ज्याच्या हातात अधिकार आहे, त्याच्याकडून अधिक शिस्त अपेक्षित असते. ज्याच्या एका सहीने माणूस कोठडीत जातो, त्याच्याकडून अधिक जबाबदारी अपेक्षित असते. ज्याच्या एका चुकीमुळे एखाद्याचे जीवन उद्ध्वस्त होऊ शकते, त्याने 'प्रक्रियात्मक चूक' हा शब्द ढालीसारखा वापरता कामा नये, हेच सर्वोच्च न्यायालयाने नव्याने सांगितले आहे. कलम २२ संविधानात सुरुवातीपासून आहे. जुन्या कायद्यात अटकेचे कारण सांगण्याची तरतूद होती. नव्या कायद्यातही ती आहे. घटनेतही आहे. कायद्यात न्यून नाही. कायद्याचे पालन करण्यासाठी लागणाऱ्या संस्थात्मक संस्कृतीत उणिवा आहेत. भारतात कायद्यांची कमतरता ही समस्या नसून अंमलबजावणीची समस्या मोठी आहे. या निर्णयाचा परिणाम साध्य करण्यासाठी काही गोष्टी झाल्या पाहिजेत. त्यातील पहिली म्हणजे अटकेचे लेखी कारण हे स्पष्ट आणि आरोपीला समजणाऱ्या भाषेत असले पाहिजे. फॉर्ममधील दोन ओळीचा रकाना भरून काम भागता कामा नये. दुसरा मुद्दा म्हणजे ही अटक कायदेशीर आहे की नाही, यावर रिमांडच्या वेळी विचार झालाच पाहिजे. तिसरा मुद्दा म्हणजे ज्या अधिकाऱ्याने चूक केली त्याच्यावर प्रत्यक्ष कारवाई झाली पाहिजे. एखाद्यावर कितीही गंभीर आरोप असला, तरी कारवाई ही कायद्याच्या चौकटीतच झाली पाहिजे, असा संविधानाचा आग्रह आहे. गुन्हा गंभीर असेल तर तपास अधिक सक्षम करा. दोष सिद्ध करा. पण 'गुन्हा गंभीर आहे म्हणून संवैधानिक व कायदेशीर प्रक्रिया आम्हाला लागू नाही' असे म्हणण्याचा अधिकार कोणत्याही तपास यंत्रणेला नाही, असेच सर्वोच्च न्यायालयाला म्हणायचे आहे. याचा अर्थ असा की, ज्याच्या हाती कायद्याची लाठी, त्याची जबाबदारी मोठी! खाकी वर्दीला अधिकारांचे भान आहेच. आता मर्यादांचे भान यावे, अशी अपेक्षा नागरिकांनी या निर्णयाच्या अनुषंगाने केली तर ती गैरवाजवी ठरणार नाही. ■

## धर्म-संस्कृती

# कैलासराणा शिवचंद्रमौळी : अद्भुत शिवस्तुती...!

**प्रा. दिलीप जोशी**

शिवभक्तांमध्ये शिवलीलामृत, शिव महिम्न, शिवपंचाक्षरी जप, रुद्राभिषेक जितके प्रसिद्ध आहेत त्याहून अधिक आवडती आणि प्रसिद्ध आहे ती 'कैलासराणा शिवचंद्रमौळी' ही शिवस्तुती. ही शिवस्तुती सर्वत्र भक्तिभावाने गायिली जाते. स्कंदपुराणातील तत्त्वावर आधारित 'कैलासराणा' ही शिवस्तुती 'कैलासराणा' याच नावाने प्रसिद्ध आहे. शिवस्तुतीच्या रचनाकारांबाबत विविध मते असली, तरी उपलब्ध हस्तलिखिते आणि इतर माहितीवरून प. पू. श्रीधरस्वामी नाझरेकर यांनी ही शिवस्तुती रचिली आहे. श्रीधरस्वामींचे कुलदैवत नागेश्वर असून त्यांच्या वडिलांचे नावदेखील नागेश आहे. शिवलीलामृत किंवा त्यातील अकरावा अध्याय वाचल्यावर शिवस्तुती म्हणण्याची पद्धत आहे, हे विशेष. या शिवस्तुतीचे एकूण ३१ श्लोक आहेत. प्रत्येक श्लोकांत म्हणजे शेवट हा 'तुजवीण शंभो मज कोण तारी' या आर्त हाकेने केला आहे. ही स्तुती शिवाची शक्ती आहे. स्तुती गाताना सहज भावसमाधी लागते. या सुंदर रचनेचा भावार्थही खूपच गोड आहे.

**कैलासराणा शिवचंद्रमौळी । फणींद्र माथां मुकुटी झळाळी ।**
**कारुण्यसिंधू भवदुःखहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।१।।**

हे भगवान शिवा, आपण कैलास पर्वतावर निवासी आपल्या मस्तकी चंद्रकोर आहे. नागाचा मुकुट आपल्या माथ्यावर असलेले आपण करुणेचे सागर आहात. तुमच्याशिवाय मला कोण तारणार?

**जटा विभूति उटि चंदनाची । कपालमाला प्रीत गौतमीची ।**
**पंचानना विश्व निवांतकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।३।।**

हे भगवंता, आपण आपल्या जटेमध्ये विभूती आणि चंदनाचा लेप लावलेला आहे. कपाळी माला आणि साक्षात गौतमी गंगा धारण केली आहे. आपण आपल्या पाच मुखाने विश्वाला शांति प्रदान करता.

**वैराग्ययोगी शिव शूलपाणी । सदा समाधी निजबोधवाणी ।**
**उमानिवासा त्रिपुरांतकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।४।।**
**उदार मेरु पति शैलजेचा । श्रीविश्वनाथ म्हणती सुरांचा ।**
**दयानिधीचा गजचर्मधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।५।।**
**ब्रह्मादि वंदी अमरादिनाथ । भुजंगमाला धरि सोमकांत ।**
**गंगा शिरीं दोष महा विदारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।६।।**

हे भगवंता, आपण हातात त्रिशूळ धारण केलेले वैराग्य योगी आहात. आत्मज्ञान देणारे उमेचे स्वामी पण सदैव समाधी अवस्थेत राहता. लोकांना त्रास देणाऱ्या त्रिपुरासुराचा वध करणारे आपण उदार आणि शैलजेचे पती आहात. गजचर्म धारण केलेले दयानिधी तुमच्याशिवाय मला कोण तारणार?

**कर्पूरगौरी गिरिजा विराजे । हळाहळें कंठ निळाचि साजे ।**
**दारिद्र्य दुःखे स्मरणें निवारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।७।।**
**स्मशानक्रीडा करितां सुखावे । तो देव चूडामणि कोण आहे ।**
**उदासमूर्ती जटाभस्मधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।८।।**

हे प्रभो, आपल्या समिप कर्पुरगौर असणारी गिरिजा आई, हलाहलामुळे आपण नीलकंठ झालेले आहात. स्मशानात क्रीडा करणारे योगी आहात.

**भूतादिनाथ अरि अंतकाचा । तो स्वामी माझा ध्वज शांभवाचा ।**
**राजा महेश बहुबाहुधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।९।।**
**नंदी हराचा हर नंदिकेश । श्रीविश्वनाथ म्हणती सुरेश ।**
**सदाशिव व्यापक तापहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।१०।।**

हे विश्वनाथ, आपणच भूतांचे स्वामी आणि यमाचाही अंत करणारे, नंदीचे स्वामी नंदीकेश्वर, देव तुम्हाला विश्वनाथ म्हणतात. आपण सदाशिव, सर्वव्यापी आणि ताप हरण करणारे आहात. हे भगवंता! आपण उग्ररूप, भीषणरूप, विक्राळरूप आणि दिगंबर अवस्थेत आहात. कामदेवाचा विनाश करणारे रुद्र विश्वंभर आहात. तुमच्याच इच्छेने संसार उत्पन्न आणि नष्ट होतो. हे उमापती, भैरव आपणच विघ्नविनाशक आहात. हे प्रभो, आपण भागीरथीच्या तीरावर विश्वनाथ रूपाने असणारे त्रिनेत्रधारी आहात. प्रयाग क्षेत्री त्रिवेणी आपल्या चरणांची पूजा करतात. तुझी स्तुती करण्यास मी अपात्र आहे. तू कैवल्यदाता असूनही मानवाला याची जाणीव नाही. तूच विश्वाचा नियंता आहेस. हे प्रभू! आपण तपस्वी, सर्वांच्या इच्छा पूर्ण करणारे कामधेनू आहात. जो भक्त तुम्हाला भजतो त्याच्या सर्व इच्छा आपण पूर्ण करता. तुमच्याशिवाय मला कोण तारेल?

**विरामकाळीं विकळ शरीर । उदास चित्तीं न धरीच धीर ।**
**चिंतामणी चिंतनें चित्तहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।**

हे महादेवा, आयुष्याच्या अखेरी शरीर विकल, मन उदास होते. अशावेळी तुम्ही चिंतामणी बनून सुखद अंत आणि सर्वदुःखे टाळून मला मुक्ती दे. हे फक्त तूच करू शकतो. हे शंभो! तुझ्यामुळेच ब्रह्मनाद गगनात भरून उरतो त्यामुळे माझी प्रपंच माया नष्ट होते. तुझी कथा कुमारी म्हणजे शुद्ध आणि पवित्र शक्ती आहे. हे महादेवा, कमरेला घंटामाळ, पिवळी वस्त्रे धारण केलेले आपण जिवाशिवाची अभंग समाधी लावत मायाचिंता नष्ट करता. गंभीर, धीरोदात्त, संकटांना न घाबरणारे, देवकुळाचे रक्षण करणारे तुम्हाला मंदार, बिल्व, बकुळ अशा विविध पुष्पांची माळा अर्पण करतो. हे प्रभो, तुला जाईजुई चंपक पुष्पमाळ धारण केलेले काशीनाथ आपणच आहात. आपल्या कानामध्ये अलक्ष्यमुद्रा म्हणजे साध्या डोळ्यांना न दिसणारी दिव्य कुंडले त्यामुळे भुरळ पाडणारे विलक्षण सौंदर्य आपले आहे.

**नागेशनामा सकळा जिव्हाळा । मना जपें रे शिवमंत्रमाळा ।**
**पंचाक्षरी ध्यान गुहाविहारीं । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।२९।।**

इथे श्रीधरस्वामी आपले कुलदैवत तथा आपले वडील नागेश यांचे स्मरण नागेश्वराच्या रूपात करतात. 'नमः शिवाय' या पंचाक्षरी मंत्राला सदैव हृदयरूपी गुहेत निवासी ठेवण्यास सांगतात.

**शास्त्राभ्यास नको श्रुति पढुं नको तीर्थासि जाऊं नको ।**
**योगाभ्यास नको व्रतें मख नको तीव्रें तपें तीं नको ।**
**काळाचे भय मानसीं धरुं नको दुष्टांस शंकूं नको ।**
**ज्याचीया स्मरणें पतीत तरती तो शंभु सोडूं नको ।।३१।।**

सर्वात शेवटी आपल्याला खूप सुंदर संदेश त्यांनी दिला. शास्त्रांचा अभ्यास किंवा वेदपठन नको, तीर्थयात्रेचीही आवश्यकता नाही. योगाभ्यास, व्रतवैकल्ये किंवा कठीण तपश्चर्या करण्याचीही गरज नाही. मनात काळाची भीती किंवा दुष्टांची शंका बाळगू नका. फक्त ज्याच्या केवळ स्मरणाने पापी लोकही तरून जातात, त्या भगवान श्रीशंभू महादेवाचा कधीही त्याग करू नका. हा त्यांचा उपदेश आपल्यासाठी महत्त्वाचा आहे. ■

९८२२२६२७३५

## वेध

**गिरीश शेरेकर**

# एफडीएचा परवाना अंतिम हमी नव्हे!

नागरिकांच्या ताटात पोहोचणारा प्रत्येक घास सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्याला अपायकारक नसावा, ही मूलभूत अपेक्षा आहे. अन्नसुरक्षेचा प्रश्न हा केवळ परवाना आहे की नाही, इतक्यापुरता मर्यादित नाही. अन्न तयार करण्याची पद्धत, वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालाची गुणवत्ता, स्वच्छता, साठवणूक, पाण्याची शुद्धता, खाद्य तेलाचा दर्जा, रंग व रसायनांचा वापर, कालबाह्य पदार्थांची विक्री, भेसळ, अन्न हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांची स्वच्छता आणि तयार अन्नाची सुरक्षित वाहतूक या सर्व बाबी तितक्याच महत्त्वाच्या आहेत. म्हणूनच अन्न व औषध प्रशासनाने (एफडीएने) केवळ परवाना आहे की नाही? या एका प्रश्नाभोवती आपली तपासणीची यंत्रणा फिरवणे पुरेसे नाही. एखाद्या खाद्यपदार्थ विक्रेत्याकडे वैध परवाना असणे ही अन्नसुरक्षेची सुरुवात आहे, पण अंतिम हमी नव्हे! परवाना मिळाल्यानंतर त्या आस्थापनात प्रत्यक्षात कोणत्या पद्धतीने अन्न तयार केले जाते, त्याची विक्री कशी केली जाते आणि नियमांचे पालन सातत्याने होते का, याची नियमित तपासणी होणे आवश्यक आहे. सर्वच शहरांमध्ये खाद्यपदार्थांच्या व्यवसायाचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला आहे. हॉटेल, रेस्टॉरंट, खानावळ, मेस, कॅटरिंग व्यवसाय, बेकरी, मिठाईची दुकाने, फास्ट फूड सेंटर, ज्यूस सेंटर, चहाच्या टपऱ्या, स्टॉल, किराणा दुकाने, डेअरी उत्पादने विकणारे, ऑनलाईन अन्नविक्री करणारे, रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेते अशा असंख्य माध्यमांतून नागरिकांच्या आहारात दररोज हजारो प्रकारचे पदार्थ पोहोचतात. या प्रत्येक टप्प्यावर अन्नसुरक्षेची जबाबदारी महत्त्वाची ठरते. अन्न व्यवसायासाठी आवश्यक परवाना किंवा नोंदणी असणे ही कायदेशीर आवश्यकता आहे. मात्र परवाना मिळाल्यानंतर त्या व्यवसायाला कायमस्वरूपी 'क्लीन चिट' मिळते, असा अर्थ काढणे धोकादायक आहे. व्यवसायाची परिस्थिती बदलू शकते, स्वयंपाकघरातील स्वच्छता कमी होऊ शकते, कच्चा माल निकृष्ट असू शकतो, साठवणुकीची पद्धत बदलू शकते किंवा नियमांचे उल्लंघन सुरू होऊ शकते. त्यामुळे परवाना तपासणीसोबतच प्रत्यक्ष आस्थापना तपासणी ही सातत्याने होणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, एखाद्या मेस चालकाकडे परवाना असल्याचे तपासणीत आढळले, तरी त्याच्या स्वयंपाकघरातील पाण्याची गुणवत्ता, भांडी स्वच्छ आहेत का, कच्चे व शिजलेले पदार्थ स्वतंत्र ठेवले आहेत का, खाद्यपदार्थ योग्य तापमानावर साठवले जातात का, कामगारांची स्वच्छता आहे का, कचऱ्याची विल्हेवाट योग्य पद्धतीने लावली जाते का, खाद्यतेल किती वेळा वापरले जाते, अशा अनेक बाबी तपासणे आवश्यक आहे. परवाना असणे आणि अन्न सुरक्षित असणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. एफडीएच्या तपासणीचा केंद्रबिंदू हा नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण असला पाहिजे.

गेल्या तीन महिन्यात (जून ते ऑगस्ट) एफडीएने जवळपास राज्यातील १२ हजार ८३ अन्न उत्पादक व विक्रेत्यांची तपासणी केली. त्यापैकी नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत ६०३ परवाने निलंबित करण्यात आले आणि सुमारे ८७५ जणांवर कारवाई करण्यात आली. जवळपास ६५ कोटींचा भेसळयुक्त व निकृष्ट दर्जाचा अन्नसाठा जप्त करण्यात आला. याशिवाय राज्यातील २ हजार ९०२ औषध उत्पादन आणि विक्री केंद्रांची तपासणी करण्यात आली. त्यातील ६७७ परवाने निलंबित आणि २०३ परवाने रद्द करण्यात आले. सदर विभागाने कधी नव्हे ते इतके काम केले आहे. त्याबद्दल त्यांचे कौतुकच आहे. या विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्यामुळेच ते शक्य झाले आहे. आतापर्यंत झालेल्या कारवायांमध्ये सातत्य ठेवण्याची गरज आहे. खाद्यपदार्थांचा विनापरवाना व्यवसाय करणाऱ्यांची संख्या भरपूर आहे. त्यांच्यावर पण कारवाई करून त्यांना परवान्याच्या कक्षेत आणले पाहिजे. उघड्यावर पदार्थ विकणाऱ्यांसाठी काही नियम असले पाहिजे. ज्या विक्रेत्यांवर कारवाई झाली आणि त्यांनी परवाने काढले त्यांचीसुद्धा वेळोवेळी तपासणी आवश्यक आहे. परवानाधारक असूनही नियम धाब्यावर बसविणाऱ्या विक्रेत्यांवर तर कठोर कारवाई व्हायला हवी. विविध खाद्यपदार्थांचे नियमित नमुने घेऊन अधिकृत प्रयोगशाळांमध्ये तपासणी करण्यावर भर दिला पाहिजे. प्रत्येकालाच अन्नसुरक्षेची हमी पाहीजे आहे. प्रशासन आणि ग्राहक यांच्या समन्वयाने आणखी ठोस उपायोजना होऊ शकतात. त्यासाठी ग्राहकांची जागरूकताही तितकीच महत्त्वाची आहे. अन्नसुरक्षा हा विषय खूप व्यापक आहे. तुकाराम मुंढे यांच्याकडून जनतेला खूप अपेक्षा आहेत. त्या केव्हा पूर्ण होतील, याकडेच सर्वांचे लक्ष आहे. ■

९४२०७२१२२५

## विशेष

# 'नवे पुणे' : नियोजनातील नवा प्रयोग?

**प्रा. सुखदेव बखळे**

मुंबईनंतर नवी मुंबई उभी राहिली. नवी मुंबईनंतर तिसऱ्या मुंबईची संकल्पना पुढे आली आणि आता चौथ्या मुंबईच्या नियोजनालाही वेग आला आहे. याच पृष्ठभूमीवर आता 'नवे पुणे' उभारण्याची संकल्पना पुढे आली आहे. पुणे आज महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी, शिक्षणाचे आद्य केंद्र, माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे प्रमुख हब, ऑटोमोबाईल उद्योगाची राजधानी आणि स्टार्टअप इकोसिस्टिमचा महत्त्वाचा आधारस्तंभ बनले आहे. गेल्या दोन दशकांमध्ये पुण्याने ज्या वेगाने विकास केला, त्याच वेगाने शहराची लोकसंख्याही वाढली. पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड, हिंजवडी, खेड-शिवापूर, तळेगाव, चाकण, रांजणगाव, लोणी काळभोर, उरुळी कांचन, वाघोली, खराडी, मुळशी अशा परिसरांमध्ये शहरीकरणाचा वेग प्रचंड वाढला आहे. परंतु 'नवे पुणे' म्हणजे नेमके काय, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. केवळ नवीन गृहनिर्माण प्रकल्पांचा समूह म्हणजे नवे पुणे नव्हे. नव्या शहराची संकल्पना म्हणजे स्वतंत्र अर्थव्यवस्था, रोजगाराची केंद्रे, सामाजिक सुविधा, शैक्षणिक संस्था, आरोग्य व्यवस्था, आधुनिक सार्वजनिक वाहतूक, पर्यावरणीय संतुलन आणि स्वयंपूर्ण नागरी व्यवस्थेची निर्मिती होय. नवे पुणे उभारताना सर्वप्रथम रोजगाराचा विचार करावा लागेल. शहरात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला रोजच्या रोजगारासाठी जुन्या पुण्यात यावे लागणार असेल, तर वाहतूक कोंडी आणखी वाढेल. त्यामुळे माहिती-तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रिक वाहन उद्योग, संरक्षण उत्पादन, जैवतंत्रज्ञान, सेमीकंडक्टर, हरित ऊर्जा, संशोधन संस्था आणि सेवा उद्योगांची स्वतंत्र केंद्रे नव्या शहरात निर्माण करावी लागतील. शहराची अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण असेल, तरच त्याचा विस्तार यशस्वी ठरेल. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पायाभूत सुविधा आधी की वस्ती आधी या प्रश्नाचे उत्तर शोधावे लागेल. भारतातील बहुतेक शहरांचा अनुभव सांगतो की, आधी इमारती उभ्या राहतात आणि नंतर रस्ते, पाणी, सांडपाणी व्यवस्था, शाळा, रुग्णालये आणि सार्वजनिक वाहतूक यांचा विचार केला जातो.

नवे पुणे उभारताना ही चूक टाळली पाहिजे. प्रथम रस्ते, मेट्रो, 'बस रॅपिड ट्रान्झिट', जलपुरवठा, मलनिस्सारण, वीज, डिजिटल फायबर नेटवर्क, हरित क्षेत्रे आणि सामाजिक सुविधा उभारल्या गेल्या पाहिजेत. त्यानंतरच गृहनिर्माणाला परवानगी द्यावी. सिंगापूर, दक्षिण कोरियातील सॉन्गडो, संयुक्त अरब अमिरातीतील मसदार सिटी किंवा भारतातील चंदीगड, नवी मुंबई यांसारख्या नियोजित शहरांचा अभ्यास येथे उपयुक्त ठरू शकतो. ही शहरे केवळ इमारतींचे समूह नाहीत, तर भविष्यातील गरजा लक्षात घेऊन तयार केलेली शहरे आहेत. पुण्यालाही अशाच दीर्घकालीन दृष्टिकोनाची आवश्यकता आहे. पर्यावरण हा नव्या पुण्याचा सर्वात महत्त्वाचा आधार असला पाहिजे. आज पुण्याचा विस्तार होताना टेकड्या सपाट केल्या जात आहेत, नद्यांचे नैसर्गिक प्रवाह अडवले जात आहेत, झाडांची मोठ्या प्रमाणावर कत्तल होत आहे. पावसाळ्यात पूर आणि उन्हाळ्यात पाण्याची टंचाई ही त्याचीच परिणती आहे. नव्या पुण्याच्या आराखड्यात किमान ३० ते ४० टक्के क्षेत्र हरित पट्ट्यासाठी राखीव ठेवणे आवश्यक आहे. नदी, नाले, जलसाठे आणि जैवविविधता यांचे संरक्षण हा विकासाचा अविभाज्य भाग असला पाहिजे. पाणी हा आणखी एक गंभीर प्रश्न आहे. आज पुणे शहराला धरणांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहावे लागते. वाढत्या लोकसंख्येसाठी अतिरिक्त जलस्रोत कुठून आणले जाणार? पावसाच्या पाण्याचे संकलन, पुनर्वापर, सांडपाण्याचे शुद्धीकरण आणि उद्योगांसाठी प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर ही तत्त्वे सुरुवातीपासूनच बंधनकारक केली पाहिजेत.




वाहतुकीच्या बाबतीत नवे पुणे हे खासगी वाहनांवर आधारित नसावे. जगभरातील आधुनिक शहरे सार्वजनिक वाहतुकीवर भर देत आहेत. मेट्रो, उपनगरी रेल्वे, इलेक्ट्रिक बस, सायकल ट्रॅक आणि पादचारी मार्ग यांचे जाळे आधी तयार झाले पाहिजे. प्रत्येक नागरिकाला १५ मिनिटांच्या अंतरात शिक्षण, आरोग्य, बाजारपेठ आणि रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या '१५ मिनिटांचे शहर' या संकल्पनेचा विचारही करता येईल. डिजिटल पायाभूत सुविधा हेही नव्या शहराचे वैशिष्ट्य असले पाहिजे. स्मार्ट ट्रॅफिक सिस्टिम, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नागरी सेवा, ऑनलाईन प्रशासन, डिजिटल आरोग्य सुविधा, स्मार्ट वीज मीटर, कचरा व्यवस्थापन आणि ऊर्जा कार्यक्षम इमारती यामुळे शहराचा दीर्घकालीन खर्च कमी होईल; मात्र या सर्वांइतकाच महत्त्वाचा प्रश्न म्हणजे जमीन संपादन. महाराष्ट्रातील अनेक प्रकल्प जमीन अधिग्रहणामुळे रखडले आहेत. शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केल्याशिवाय नवे पुणे उभे राहू शकणार नाही. केवळ भरपाई देऊन प्रश्न सुटणार नाही. शेतकऱ्यांना विकसित भूखंड, प्रकल्पातील भागीदारी, रोजगार, कौशल्य प्रशिक्षण आणि दीर्घकालीन आर्थिक सुरक्षा देणारे मॉडेल स्वीकारावे लागेल. अन्यथा, हा प्रकल्प वादग्रस्त ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेक नवीन शहरांमध्ये उच्चभ्रू गृहनिर्माणाला प्राधान्य दिले जाते.

सरकारने एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, नवे पुणे उभारणे म्हणजे जुने पुणे विसरणे नाही. पुण्यातील वाहतूक, नदी प्रदूषण, कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, अतिक्रमणे आणि अनियंत्रित बांधकामे या समस्या सोडवल्याशिवाय नवीन शहर उभारण्याचा संदेश जनतेपर्यंत सकारात्मक पद्धतीने पोहोचणार नाही. जुने शहर अडचणीत आणि नवीन शहर स्वप्नात, अशी स्थिती निर्माण होता कामा नये. नवे पुणे हे महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचे पुढील इंजिन ठरू शकते. मुंबईवरील ताण कमी करणे, जागतिक गुंतवणूक आकर्षित करणे, उच्च तंत्रज्ञान उद्योगांना जागा उपलब्ध करून देणे आणि नियोजनबद्ध नागरीकरण घडवून आणणे यासाठी ही संकल्पना महत्त्वाची ठरू शकते; परंतु यासाठी राजकीय इच्छाशक्ती, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, पर्यावरणीय संतुलन आणि नागरिकांचा सहभाग हे चारही घटक तितकेच आवश्यक आहेत. आजचा प्रश्न 'नवे पुणे हवे की नको?' हा नाही. खरा प्रश्न असा आहे, की 'नवे पुणे कसे असावे?' जर ते पर्यावरणपूरक, तंत्रज्ञानसक्षम, रोजगारनिर्मिती करणारे, सार्वजनिक वाहतुकीवर आधारित, सर्वसमावेशक आणि स्वयंपूर्ण शहर असेल, तर ते महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा देऊ शकते; पण जर ते केवळ 'रिअल इस्टेट'चा विस्तार ठरले, तर पुण्याच्या विद्यमान समस्यांचीच पुनरावृत्ती होईल. म्हणूनच 'नवे पुणे' ही केवळ विकासाची संकल्पना नसून महाराष्ट्राच्या नागरी भवितव्याची कसोटी आहे. नियोजन, पर्यावरण, रोजगार, सामाजिक न्याय आणि शाश्वत विकास यांचा समतोल साधला, तर हे शहर भारतातील आदर्श नियोजित शहर ठरू शकते. या निमित्ताने एका प्रगतशील शहराची नेमकी उभारणी जवळून पाहायला मिळणार आहे. ■

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वाचक पत्रे

### युपीआय शुल्क द्यायला हवे

युपीआय शुल्कावरून फारच गदारोळ होतोय. का तर, युपीआय आधी निःशुल्क होते आणि ते निःशुल्कच राहावे हा दुराग्रह. याच दृष्टिकोनातून बघितले तर आयकर द्यायलाच नको. कारण कष्ट करून शिकणार आम्ही, स्पर्धा परीक्षा देऊ आम्ही, नोकरीकरिता वाट पाहू आम्ही, नोकरी लागल्यावर कष्ट करून काम करणार आम्ही; आणि तरीही मिळालेल्या वेतनावर आयकर घेणार तुम्ही; वा काय न्याय आहे? तसे म्हटले तर कोणताही कर द्यावयास लागूच नये. हो ना. एवढ्या साऱ्या सोयीसुविधा पुरविण्याकरिता यंत्रणा उभी करावी लागते. तिचा रखरखाव ठेवावा लागतो, काळानुसार बदल बदल करावे लागतात. आजचे सॉफ्टवेअर साधारणतः १८ महिन्यात कालबाह्य होते. ते जर काळानुरूप बदलले नाही तर ते आपण सहज वापरू शकणार नाही. कारण जुनी प्रणाली नवीन प्रणालीला मदत करीत नाही. जे देश विकसित आहेत त्या देशात फुकट काहीच मिळत नाही म्हणून ते विकसित आहे. या शुल्कातुन दोन बँक, सरकार, सेवा देणारी संस्था यांना २००० रुपयाच्या वरील ४ टक्के व्यवहारावर जो पैसा मिळेल खूप जास्त असणार आहे काय? यांचा एकंदर वार्षिक खर्च २१००० कोटी रुपये आहे (सरकारी आकडेवारी). त्या मानाने आवक काय आहे तर शून्य. शुल्कातून याची काही भरपाई झाली तर पूर्ण यंत्रणा सुरळीत राहू शकेल. युपीआयमुळे सुखाचे काय काम झाले? चाकरमान्याचा पगार बँकेत जमा होण्यास सुरुवात झाली. त्याला भरपूर काळ लोटला. पैसे काढण्यास किंवा बिल भरण्यास तीन-चार तास वाट पाहाव्या लागणाऱ्या रांगा संपल्या. या रांगेचा साक्षीदार म्हणून आज जे ५५-६० च्या पुढील वयाचे आहेत त्यांना विचारा. रकमेचे हस्तांतरण सुलभ झाले आणि अजून कितीतरी. निःशुल्क पाहिजे अशी राळ उठविणाऱ्या बुद्धिमानांचे(?) लक्ष मी एका दुसऱ्या बाबीकडे वेधू इच्छितो. गत आर्थिक वर्षामध्ये भारतातल्या सगळ्या बँकांनी मिळून ३७,००० कोटी रुपये कमाविले; अगदी अलगद. खात्यामध्ये कमीत कमी रक्कम नाही म्हणून, धनादेश परत फिरला तर पैसे वळते होतात. भारतातील सर्व बँका अनेक माहीत नसलेल्या शुल्कामधून जितके कमवितात त्या तुलनेत युपीआयला लागणारे शुल्क फारच कमी आहे. निःशुल्क सेवा ही कालबाह्य संकल्पना मेंदूतून काढून टाकायला हवी. आज जी सेवा मिळतेय त्यापेक्षा उत्तम सेवा भविष्यात मिळत राहो यासाठी शुल्क मान्य करा.

**राजेश्वर गोडे**/९१५८२३५६८७

■■■

### सर सलामत, तो पगडी पचास!

हिंदी भाषेतील ही म्हण गर्भित अर्थपूर्ण आहे. भारतीय संस्कृतीत पुरुष जातीच्या मस्तकावर मुंडासं, फेटा, टोपी (हॅट) पगडी आणि देवाला, राजाला मुकुट हे सन्मानाचे प्रतीक आहे. रक्षण करणारे पोलिस, जलसेना, वायुसेना, स्थलसेना किंवा अग्निशमन विभागातील जवान ते अधिकारी हे विविध प्रकारच्या टोप्या धारण करतात. त्यांना बघितल्यावर आपला हात सहजच सलाम करण्यासाठी वर होतो. बुद्धीचे स्थान हे शरीरातील मेंदूस्थानी शिरोभागी आहे. अत्यंत नाजूक असलेला पण महत्त्वाचा अवयव कठीण अस्थीच्या कवचाचे आत सुरक्षित असतो. बुद्धिवंत, उच्चविद्याविभूषित मनुष्याची वैचारिक पात्रता उच्च कोटीची, समाजाला दिशा देणारी, हित साधण्यासाठी असेल तर समाज त्यांचा अशाच पगड्या घालून जाहीर सन्मान करतो. उपरोक्त म्हणीत हाच अर्थ दडलेला आहे. मात्र, बुद्धिहीन, विकृत, मतभेद-मनभेद निर्माण करणारी किंवा हिंसक प्रवृत्तीची असेल तर असे पगडीऐवजी निषेध किंवा टीकेचे धनी होतात. मराठी बोली भाषेत डोक्यात माती गेली आहे का? डोके ठिकाणावर आहे का? डोक्यावर पडला आहे का? इत्यादी वाक्प्रचार अशाच प्रवृत्तीच्या मनुष्यासाठी उपयोगात आणले जातात. सध्या बुद्धीची देवता गणेशाचा उत्सव सुरू आहे. सर्वांना सुबुद्धी देऊन मस्तकी अशाच पन्नास पगड्या येऊ दे!

**संजय पाठक**/नागपूर

■■■

### अमेरिकन फुफाजींचा तीळपापड

नवी दिल्लीत पार पडलेल्या ब्रिक्स शिखर परिषदेमुळे अमेरिकेत अस्वस्थता दिसून आली. अमेरिकन माध्यमे आणि वृत्तपत्रांतून ही चीड स्पष्टपणे जगासमोर येत आहे. ब्रिक्स हा अमेरिकेचे जागतिक वर्चस्व आणि डॉलरसाठी धोकादायक असल्याची डोनाल्ड ट्रम्प यांना जाणीव आहे. त्यांनी ब्रिक्स देशांना डी-डॉलरायझेशनच्या अनुषंगाने १०० टक्के आयात शुल्क लावण्याची धमकी दिलेली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ब्रिक्स व्यापार मंचावरील भाषणात जगात वाढत असलेल्या व्यापार अडथळ्यांचा आणि एकतर्फी आयात शुल्क धोरणांचा उल्लेख करून ट्रम्पवर अप्रत्यक्षपणे टीका केली आहे. भारताच्या अध्यक्षतेखाली आयोजित झालेल्या ब्रिक्स-२६ परिषदेत डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्याच्या विषयावर चर्चा झाली. ब्रिक्स-पे द्वारा सदस्य देशांच्या पेमेंट सिस्टिम्स एकमेकांशी जोडल्या जातील. भारताचा भर रुपयाचा वापर वाढवण्यावर आहे. भारताने ब्रिक्स मंचाचा वापर विकसनशील देशांचा आवाज बुलंद करण्यासाठी केलेला आहे. ट्रम्प तात्यांनी आपला झालेला तीळपापड लपवत 'सगळं काही व्यवस्थित होईल...' असं विधान केलेलं आहे. ब्रिक्समुळे नाराज झालेल्या अमेरिकन फुफाजींचे भविष्य खरे ठरल्यास संपूर्ण जगाला नक्कीच दिलासा मिळेल. ■

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

## क्रीडा वृत्त...



### रोलर हॉकी स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालयास विजेतेपद

**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर -**

शालेय शहर रोलर हॉकी स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालयाने १९ वर्षाखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकविले. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी, मुख्याध्यापिका स्मिता रणदिवे, सरोजिनी मुलींटी यांनी अभिनंदन केले. विजेता संघ : अक्षरा बंदपट्टे, अपेक्षा बंदपट्टे, आरुषी गुजर, प्राची फुले, आसावरी पतंगे, वैष्णवी हिरेमठ, पायल परबळकर, कानन शिंगाडे, श्रेया बुलबुले, प्रणाली यमपुरे, प्राची यमपुरे, साक्षी बुलबुले.



### खेडगी कॉलेजच्या दोघांची जिल्हा बुध्दिबळ स्पर्धेसाठी निवड कामगिरी

**अक्कलकोट, दि. २२ सप्टेबर-**

अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी संचलित सी. बी. खेडगी महाविद्यालयाच्या दोघांची तालुका बुद्धिबळ स्पर्धेतून जिल्हा बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली. आफ्रीन तन्वीर अत्तार आणि प्रसन्न शिवानंद मंगुळे हे निवडले२ले खेळाडू आहे. येथील कल्याणशेट्टी हायस्कूलम ध्ये झालेल्या स्पर्धेतून ही निवड झाली. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रा. सोहेल शेख, जिमखाना विभागप्रमुख डॉ. दत्तात्रय बिराजदार, सुधीर राठोड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी, सचिव सुभाष धरणे, व्हाइस चेअरमन अशोक हारकुड, संचालक मंडळ, प्राचार्य डॉ. गुरुलिंगप्पा धबाले, उपप्राचार्या वैदेही वैद्य, पर्यवेक्षक नीलप्पा भरमशेट्टी आदींनी अभिनंदन केले.

### सहाय्यक आयुक्त सूर्यकांत खटके यांची लडाख मध्ये यशस्वी धाव

**दक्षिण सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

लडाख मॅरेथॉन' मध्ये कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय नवी-मुंबई येथील सहाय्यक आयुक्त व सोलापूरचे सुपुत्र सूर्यकांत श्रीमंत खटके यांची यशस्वी धाव झाली आहे.टाटा मुंबई प्रोकैम मॅरेथॉन,टाटा अल्ट्रा मॅरेथॉन,लोणावळा वर्षा मैराथन, माउंट अबू मैराथन, खारघर हिल मैराथन व अनेक प्रतिष्ठेच्या मॅरेथॉनमध्ये यशस्वी सहभाग घेतलेले खटके यांनी लेह येथील अत्यंत कठीण ५०% ऑक्सीजन असलेल्या 'लडाख मॅरेथॉन' मध्ये सहभागी होत ४२ किलोमीटरचे अंतर ५ तास ५७ मिनिट मध्ये पूर्ण केले आहे. या मुळे शारीरिक तंदुरुस्तीचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित केले.






# माता रमाईच्या पुतळ्याचे सोलापुरात स्वागत

## फुलांच्या पाकळ्या उधळून महिलांनी केला आनंदोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

बहुप्रतिक्षित असलेला माता रमाई यांचा पुतळा बुधवारी रात्री सोलापूरात दाखल झाला. सोलापूरात पुतळा दाखल झाल्यावर रमाईच्या लेकींनी गुलाबाच्या पाकळ्यांची उधळण करत त्याचे स्वागत केले. न्यू बुधवार पेठेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात हा पूर्णाकृती पुतळा बसवण्यात येणार आहे.

मागील पाच सहा वर्षांपासून याची सर्वांना प्रतिक्षा होती. या उद्यानाचे नुतनीकरण करण्यात येत आहे. विविध सोयीसुविधा या उद्यानात असणार आहेत. परंतू डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शेजारी उभारण्यात येणारा हा पुतळा पूर्ण होणे बाकी होते. अखेर पुण्याच्या आल्हाट आर्टसने याचे काम पूर्ण करत सोलापूरकरांसाठी हा पुतळा मंगळवारी मार्गस्थ केला. प्रारंभी पुणा नाका व नंतर सम्राट चौकात याचे स्वागत करण्यात आले. यावेळी नगरसेविका वंदना गायकवाड, नगरसेवक गौतम कसबे, माजी नगरसेवक अरुण भालेराव, बबलू गायकवाड, कामगार नेते

अशोक जानराव, ॲड. संजीव सदाफुले, दशरथ कसबे, अजित गायकवाड, , गौतम चंदनशिवे, देवा उघडे आदींसह अनेक अनुयायांनी स्वागत केले. महिलांनी गुलाबाच्या पाकळ्या ऊधळून फुगडी घालून आनंद व्यक्त केला.

# कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर यांना लोकशिक्षक बाबा भारती जीवनगौरव पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. कर्नल प्रकाश महानवर यांना या वर्षीचा प्रतिष्ठित 'लोकशिक्षक बाबा भारती जीवनगौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे. पुण्याच्या लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानतर्फे (पिंपरी चिंचवड) या पुरस्काराची घोषणा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेंद्र भारती यांनी केली.

हा पुरस्कार बाबा भारती यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिला जातो, ज्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सहवास लाभला होता आणि ज्यांनी पहिला 'पाली-मराठी शब्दकोश' तयार केला होता. कुलगुरू डॉ. महानवर यांना नुकताच एनसीसीकडून 'कर्नल' हा सन्माननीय दर्जा मिळाला असून, त्यांनी शैक्षणिक, प्रशासकीय आणि संशोधन क्षेत्रात दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल हा पुरस्कार प्रदान केला जात आहे.

पुरस्कार वितरण सोहळा बुधवार, २३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या नूतन प्रशासकीय इमारतीमधील 'अहिल्याभवन' अधिसभा सभागृहात होणार आहे. ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाईल. यापूर्वी हा पुरस्कार माजी मंत्री डॉ. अण्णासाहेब डांगे, पद्मश्री पोपटराव पवार, पद्मश्री गिरीश प्रभुणे आणि कुलगुरू प्रा. डॉ. रजनीश कामत यांसारख्या मान्यवरांना मिळाला आहे.या सोहळ्याला प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे आणि अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती व निमंत्रक प्रकाश कांबळे यांनी सर्वांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# 'जिजाऊ'चा प्रथमेश शिंदे योगासन स्पर्धेत प्रथम

**बार्शी, दि. २२ सप्टेंबर-**

तालुकास्तरीय शालेय योगासन स्पर्धेत जिजाऊ गुरुकुलचा प्रथमेश जयवंत शिंदे याने १९ वर्षे वयोगटात आर्टिस्टिक योगा प्रकारात प्रथम क्रमांक तर ट्रेडिशनल योगा प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावला.

सदर कामगिरीवर त्याची जिल्हा स्पर्धेसाठी निवड झाली. प्रथमेशचे जिजाऊ गुरुकुलचे संस्थापक-अध्यक्ष संभाजी घाडगे, सचिवा वर्षा घाडगे, प्रशासकीय अधिकारी किशोर कदम, फिजिकल कोच जे. बी. शिंदे तसेच जिजाऊ गुरुकुलचे सर्व शिक्षक व कर्मचारी आदींनी अभिनंदन केले.



# आजोबांना आता 'नातू' शिकवू लागले; पण 'आजोबा' आजोबाच!

## अमोल शिंदेंचा देशमुखांच्या भाजपांतर्गत विरोधकांना टोला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

आजोबा गणपतीच्या विशेष टपाल लिफाफा अनावरण मोठ्या उत्साहात सोमवारी पार पडला. या सोहळ्यात शिवसेनेचे नगरसेवक अमोल शिंदे यांनी भाजपचे आमदार विजयकुमार देशमुख यांचा उल्लेख 'भाजपचे सोलापुरातील आजोबा' असा करत त्यांच्या राजकीय स्थितीवर भाष्य केले.

मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासमोरच त्यांनी, 'दादा, आजकाल आजोबांना काल-परवा आलेले नातू शिकवायला लागलेत; कितीही नातू आले तरी आजोबा आजोबाच असतात,' असा टोला देशमुखांच्या पक्षांतर्गत विरोधकांना लगावल्याने व्यासपीठावर हशा पिकला. यानंतर मंत्री चंद्रकांत पाटील यांनी राजकारणातील चढ-उतार आणि बदलत्या समीकरणांचा संदर्भ दिला. 'कालचक्र' आणि निसर्गाच्या नियमाचे उदाहरण देत राजकारणात रात्र-पहाट, ऊन-सावलीप्रमाणे चढ-उतार अटळ



असल्याचे त्यांनी सांगितले. विजय मालक यांच्याकडे सध्या मोठी जबाबदारी नसली तरी आजोबा गणपतीचा आशीर्वाद व स्वामीजींचे अधिष्ठान त्यांच्या पाठीशी असल्याचे सांगत, 'येत्या काळात काहीही घडू शकते,' असे सूचक विधान त्यांनी केले. पहाटेच्या शपथविधीचा दाखला देत 'देर है, अंधेर नहीं,' असे म्हणत विजयमालक पुन्हा महाराष्ट्राच्या राजकारणाच्या मुख्य प्रवाहात येतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

# 'लंबोदर'तर्फे महिलांसाठी मनोरंजनात्मक खेळ; उत्स्फुर्त सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२२ सप्टेंबर -**

शिवछत्रपती व्यायाम शाळा, पाटील चाळ तरुण गणेश मंडळ संचलित लंबोदर प्रतिष्ठानच्यावतीने गणेशोत्सवानिमित्त महिलांसाठी 'महिला आरती व मनोरंजक खेळ सोहळा जल्लोषात पार पडला. तुळजापूर रोड, पाटील चाळ येथील हनुमान मंदिर परिसरात सोहळ्याचे आयोजन केले होते.

सुरुवात महिलांच्या उपस्थितीत महाआरतीने झाली. त्यानंतर महिलांसाठी मनोरंजक खेळ झाले. महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत खेळांचा मनमुराद आनंद लुटला. लहान मुला-मुलींनी सादर केलेल्या बहारदार नृत्यांनी रंगत आणखी वाढवली. बालचमूंच्या कलागुणांना उपस्थितांनी दाद



दिली. सूत्रसंचालन संज्योती थोरात यांनी केले. विजेत्यांना आकर्षक बक्षिसे दिली. प्रथम क्रमांक सुप्रिया पवार यांनी पटकावला, त्यांना सोन्याची नथ बक्षीस दिली. द्वितीय क्रमांक नीता साखरे यांनी मिळवला, त्यांना पैठणी, तर तृतीय क्रमांक शिवानी पवार यांनी मिळवला, त्यांना ब्युटी हॅम्पर दिला. सहभागी प्रत्येक महिलेला लंबोदर प्रतिष्ठानच्यावतीने सन्मानपूर्वक भेटवस्तू देण्यात आली.

कार्यक्रमासाठी शोभना क्षीरसागर, निशा जाधव, भारती थोरात, रेणुका क्षीरसागर, सुवर्णा कदम, राणी गुढे, शलाका थोरात यांच्यासह मंडळातील महिलांनी विशेष परिश्रम घेतले. लंबोदर प्रतिष्ठानचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच परिसरातील नागरिकांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# तालुका बुध्दीबळ स्पर्धेत कल्याणशेट्टी शाळेचे धम्मे, डांगे व वाघदरे अजिंक्य

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २२ सप्टेंबर-**

तालुका बुद्धिबळ स्पर्धेत कल्याणशेट्टी शाळेच्या दोघांनी अजिंक्यपद पटकाविले. १७ वर्षांखालील मुलींच्या गटात गायत्री धम्मे, १४ वर्षांखालील मुलांच्या गटात आदर्श डांगे तर मुलींच्या गटात मृणाली वाघदारे यांनी अजिंक्यपद पटकाविले.

तसेच १९ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत मुलांच्या संघाने तालुक्यात द्वितीय क्रमांक पटकावला.

त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक, प्राचार्य, क्रीडा शिक्षक तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**सिलींग जमीन भोगवटदार वर्ग २ वरुन भोगवटदार वर्ग १ करीता जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की मौजे शेन्द्री ता. बार्शी जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नं. २४३/४ क्षेत्र १.१४ हे आर ही मिळकतीचे खातेदार श्री दत्तात्रय लक्ष्मण साळुंके रा. उपळाई (ठों) ता. बार्शी यांनी सदरची जमीन भोगवटादार वर्ग २ असल्याने सदर जमिनीची भोगवटादार वर्ग २ वरून भोगवटादार वर्ग १ करीता आमचे अशिल श्री. दत्तात्रय लक्ष्मण साळुंके यांनी मा. अपर जिल्हाधिकारी सोलापूर (कुळकायदा शाखा) या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

तरी उक्त नमूद शेतजमिनीबाबत व त्यामध्ये झालेल्या व्यवहाराबाबत किंवा इतर कुठल्याही प्रकारची व्यवहाराबाबत किंवा उक्त जमिनीबाबत कोणाचाही करार, लिज, भाडेपट्टा, पोटगी हक्क, वारसा हक्क, बोजा, गहाण, दान, लिन, कर्ज, कोर्ट केसेस, मृत्युपत्र, खरेदी-विक्री, साठेखत, पतसंस्थेचा बोजा, सावकारी देणे-घेणे इ. बाबत काही हरकत / तक्रार / हितसंबंध / अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत मा. अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर (कुळकायदा), सात रस्ता, सोलापूर या पत्त्यावर आपली हरकत नोंदवावी. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून उक्त शेतजमिनीचा भोगवटादार वर्ग-२ वरून भोगवटादार वर्ग-१ करणेकामी पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. ता. २२/०९/२०२६

सही/-
ॲड: संजय चंद्रकांत साखरे
मो.नं. ८८३०३११०१५
पत्ता : ४०६९, एस.टी.स्टँडजवळ, तुळजापूर रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
अशील - श्री. दत्तात्रय लक्ष्मण साळुंके
पत्ता : रा. उपळाई (ठो), ता. बार्शी

**जाहीर समन्स** — आर.टी.एस. अपील नं. १०/२०२६

**करमाळा येथील मे. प्रांत अधिकारी सो यांचे कोर्टात**

**सखुबाई गरड** - **अर्जदार**
विरुध्द
**रमेश साळुंखे, वगैरे** - **सामनेवाला**
ज्याअर्थी सदर अपील मधील सामनेवाला नं. १ हे अपिलात सामील आहे.
**रमेश आप्पा साळुंखे** रा. द्वारा लंका चौगुले
ढवळस पिंपरी, वरकुटे फाटा ता. करमाळा, जि. सोलापूर

यास अर्जाचे समन्स / नोटीस न बजावता परत आलेली आहे. त्याची बजावणी सामनेवालास करण्यात आलेली नाही. त्या अर्थी या जाहीर समन्स / कारणे दाखवा नोटीसने कळवण्यात येते की, सदर अपिलात हजर होण्यासाठी नेमलेली तारीख दि. ३०/०९/२०२६ रोजी अथवा त्यापूर्वी स्वतः अथवा प्रतिनिधी, विधीज्ञमार्फत अपिलात हजर होऊन आपले म्हणणे दाखल करावेत. जर आपण या कोर्टात उपरोक्त प्रमाणे हजर न झालेस अपिलात आपले कोणतेही म्हणणे / तक्रार नाही व असल्यास त्या सोडून दिल्या आहेत असे समजून तुमचे गैरहजेरीत तुमचे विरुध्द एकतर्फा सुनावणी होऊन एकतर्फा निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी. हे जाहीर समन्स / कारणे दाखवा नोटीस प्रसिध्द केले असे. ता. ११/०९/२०२६

शिक्का
सही/-
उपविभागीय अधिकारी
माढा विभाग, कुर्डुवाडी

**जाहीर प्रसिध्दीकरण** — दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३४/२०२६ नि. ६

**बार्शी येथील मे. अति जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कोर्टात**

१. **शिवरत्न नागेश भोरे**
वय - १७ वर्षे, धंदा - शिक्षण,
अ.पा.क. आई अर्जदार नं. २
२. **शैला नागेश भोरे**
वय - ४० वर्षे, धंदा - घरकाम,
रा. भोसरे, ता. माढा, जि. सोलापूर — **अर्जदार**
विरुध्द
**महाराष्ट्र शासन तर्फे**
**मा. कलेक्टर साहेब सोलापूर - सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांनी मौजे भोसरे येथील शेतजमीन गट नं. ३८२ याचे क्षेत्र ०२ हे. ५९ आर, आकार ०४ रु. ३५ पैसे यापैकी अज्ञान अर्जदार नं. १ यांचे मालकीचे क्षेत्र ०० हे. ३७ आर, आकार ०० रु. ६२ पैसे या एकूण जमिनीपैकी ०० हे. २३ आर क्षेत्र संपादित केलेले असून त्या जमिनीपैकी अज्ञान अर्जदार नं. १ यांचे संपादित केलेले क्षेत्र ०० हे. ३.२८ आर असे क्षेत्र सीना माढा उपसा सिंचन योजना अंतर्गत डावा कालवा वितरिका क्र. १ ची लघुवितरिका क्र. ५ डावी ची उपलघु वितरिका योजनेसाठी अर्जदार नं. १ यांच्या मालकीचे क्षेत्र महाराष्ट्र सरकारने संपादित केलेले आहे. सदर अर्जदाराचे भूसंपादनाची एकूण ठरविण्यात आलेली एकूण किंमत र.रु. १५,२०,८७५/- एवढी आहे. त्यापैकी अज्ञान अर्जदार नं. १ यांचे हिस्स्याची रक्कम रुपये २,१७,२६७/- एवढी त्यांना मिळणार आहे, परंतु अर्जदार नं. १ हा अज्ञान असल्याने सदर रक्कमेचा धनादेश त्यांचे अ.पा.क. अर्जदार नं. २ आई यांना मिळणे जरुरीचे आहे. सदर रक्कम मिळाल्यानंतर अर्जदार नं. २ हे अज्ञान अर्जदार नं. १ याचे उच्च शिक्षणासाठी आर्थिक अडचणीचे निवारण करणेसाठी व शैक्षणिक फी भरण्यासाठी करणार आहेत. त्यामुळे अज्ञान अर्जदार नं. १ याचे नावे असलेल्या सरकारने संपादीत केलेले त्यांचे हिस्स्याचे ०० हे. ३.२८ आर क्षेत्राचे त्यांचे तर्फे अ.पा.क. म्हणून आई अर्जदार नं. २ यांना सरकारचे नावे खरेदीखत लिहून देणे जरुरीचे आहे. त्यासाठी अज्ञान अर्जदार नं. १ याचे तर्फे अ.पा.क. आई अर्जदार नं. २ यांना मे. कोर्टाची परवानगी मिळणे जरुरीचे आहे व त्यासाठी सदरचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, वर नमूद अज्ञान अर्जदार यांचे मालकीचे क्षेत्र सरकारचे नावे खरेदीखत लिहून देणेकामी कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असेल तर किंवा सदर मिळकतीसंबंधी कोणताही खरेदी, विक्री, गहाण, दान, बोजा, लिज, चोळी-बांगडी, पोटगी, अथवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध व हरकत असेल तर सदर प्रकरणाची पुढील नेमलेली तारीख दि. ०९/१०/२०२६ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहून कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी. कोणाचीही काही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदर शेतजमिन विक्री करणेबाबत परवानगी देण्यात येईल. कळावे. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता. १७/०९/२०२६

सही/- क. लिपिक
कोर्टाचा शिक्का
सही/- सहा. अधीक्षक
जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी

**जाहीर प्रसिध्दीकरण** — दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३२/२०२६ नि. ६

**बार्शी येथील मे. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश सो यांचे कोर्टात**

१. **ज्ञानेश्वर विकास चव्हाण**
वय - १७ वर्षे, धंदा - शिक्षण,
अ.पा.क. आई अर्जदार नं. ३
२. **लक्ष्मण विकास चव्हाण**
वय - १५ वर्षे, धंदा - शिक्षण,
अ.पा.क. आई अर्जदार नं. ३
३. **सुवर्णा विकास चव्हाण**
वय - ३८ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. इर्लेवाडी, ता. माढा, जि. सोलापूर — **अर्जदार**
विरुध्द
**महाराष्ट्र शासन तर्फे**
**मा. कलेक्टर साहेब सोलापूर - सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांनी मौजे इर्लेवाडी येथील शेतजमीन गट नं. १३६ पैकी यातील अर्जदार नं. १ खाते क्र. ६८२ याचे क्षेत्र ०० हे. ५३ आर, आकार ०१ रु. ३५ पैसे तसेच सदर जमिनीपैकी यातील अर्जदार नं. २ खाते क्र. ६८३ याचे क्षेत्र ०० हे. ५२ आर, आकार ०१ रु. ३२ पैसे. सदरील क्षेत्र हे अर्जदार नं. १ व २ यांच्या मालकीचे असून या जमिनीपैकी संपादित केलेले क्षेत्र ०० हे. १३ आर असे आहे. सदर क्षेत्र कोल्हापूर पद्धतीचा बंधारा इर्ले, ता. बार्शी या योजनेसाठी सरकारने संपादित केलेले असून सदर संपादित क्षेत्राबाबत अर्जदार नं. १ व २ चे अ.पा.क. आई सुवर्णा विकास चव्हाण यांनीही संमतीपत्र, हमीपत्र नोटरी लिहून दिले आहे. अज्ञान अर्जदार नं. १ व २ यांचे संपादीत जमिनीची ठरविण्यात आलेली रक्कम रु. ५,५७,८९५/- असून ती रक्कम अज्ञान अर्जदार नं. १ व २ यांना मिळणार आहे. परंतु सदर अर्जदार नं. १ हे अज्ञान असल्यामुळे सदर रक्कमेचा धनादेश त्यांचे अ.पा.क. अर्जदार नं. ३ आई यांना मिळणे जरुरीचे आहे. सदरची रक्कम मिळाल्यानंतर अज्ञान अर्जदार नं. ३ आई ही अज्ञान अर्जदार नं. १, २ यांचे उच्च शिक्षणासाठी आर्थिक अडचणीचे निवारण करणेसाठी व शैक्षणिक फी भरण्यासाठी करणार आहेत. त्यामुळे अज्ञान अर्जदार नं. १, २ यांचे नावे असलेल्या सरकारने संपादीत केलेले ०० हे. १३ आर क्षेत्राचे त्यांचे तर्फे अ.पा.क. म्हणून आई अर्जदार नं. ३ यांना सरकारचे नावे खरेदीखत लिहून देणे जरुरीचे आहे. त्यासाठी अज्ञान अर्जदार नं. १ व २ याचे तर्फे अ.पा.क. आई अर्जदार नं. ३ यांना मे. कोर्टाची परवानगी मिळणे जरुरीचे आहे व त्यासाठी सदरचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी,वर नमूद अज्ञान अर्जदार नं. १, २ यांचे मालकीचे क्षेत्र सरकारचे नावे खरेदीखत लिहून देणेकामी कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असेल तर किंवा सदर मिळकतीसंबंधी कोणताही खरेदी, विक्री, गहाण, दान, बोजा, लिज, चोळी-बांगडी, पोटगी, अथवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध व हरकत असेल तर सदर प्रकरणाची पुढील नेमलेली तारीख दि. ०८/१०/२०२६ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा. हजर राहून कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी. कोणाचेही काही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदर शेतजमीन विक्री करणेबाबत परवानगी देण्यात येईल. कळावे. हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले. ता. १७/०९/२०२६

सही/- क. लिपिक
कोर्टाचा शिक्का
सही/- सहा. अधीक्षक
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी

**सावधगिरीची जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः मौजे बार्शी, ता. बार्शी व आसपासच्या बार्शी तालुक्यातील जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, जि. सोलापूर सब डि. ता. बार्शी पैकी बार्शी शहर हद्दीतील जमीन गट नं. ८७१ याचा चालू गट नं. ८७१/२ याचे एकूण क्षेत्र ०२ हे ३८.०२ आर आकार ०५ रु. ०० पैसे या पैकी कोर्ट वाटपाने उद्‌भवल्याप्रमाणे आलेली जमीन तिचे क्षेत्र ०० हे ४४.४५ आर आकार ०० रू. ७६ पैसे या पैकी तुम्हांस विक्री केलेले क्षेत्र पुढील प्रमाणे -

अ) वर नमूद जमिनीपैकी दक्षिण बाजूची मधील तिचे क्षेत्रफळ ०० हे ०० हे १८.८२४३ आर (यांचे चौ.मी. १८८२.४३) अशी जमीन याची चतु:सिमा :- पूर्व - मैनाबाई राऊत यांचे हे. ११.२६६३ आर जमीन, दक्षिणेस, वायकुळे यांची जमीन, पश्चिमेस - सदर नंबर पैकी नियोजीत डी.पी. रोडने बाधीत होण्याची शक्यता असणारा १०० फूट रुंदीचा दक्षिणोत्तर चालीचा १५५८ चौ.मी.चा समाईक मालकीचा रस्ता, उत्तरेस सदर गोटा पैकी बिनशेती झालेला लेआऊट.

ब) वर नमूद जमिनी पैकी पूर्व दक्षिण कोपऱ्यातील जमीन तिचे क्षेत्र ६३७ चौ.मी. अशी जमीन याची चतु:सिमा :- पूर्वेस - सदर नंबर पैकी नियोजीत डी. पी. रोडने बाधीत होण्याची शक्यता असणारा १०० फूट रुंदीचा दक्षिणोत्तर चालीचा १५५८ चौ.मी. समाईक मालकांचा रस्ता, दक्षिणेस - सदर गोटा पैकी तुमचे मालकीची जमीन, पश्चिमेस नियोजीत १२.०० मीटर रुंदीचा रस्ता, उत्तरेस - सदर गोटा पैकी तुमचे मालकीची जमीन येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक जमीन आतील दगड, माती वगैरे तद्‌ंगभूत वस्तूंसह वहिवाटीच्या हक्कांसह, व येणे जाणेच्या या गटातील नियोजीत डी. पी. रोडसाठी समाईकात सोडलेल्या क्षेत्रात वाटप पत्रात सर्व सह हिस्सेदारांचा समाईक हिस्सा आहे. त्याप्रमाणे १५५८ चौ.मी. पैकी माझे येणारे समाईक हिस्साचे हक्कासह जमीन.

वर नमूद जमीन ही श्रीमती प्रमिला गोवर्धन ठोंबरे, श्री. सुधिर गोवर्धन ठोंबरे, प्रिया गोवर्धन ठोंबरे लग्नानंतरचे नाव सौ. सुप्रिया सुधिर आयरकर यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी त्यांचे प्रापंचिक, कायदेशीर गरजपोटी आमचे अशिलास विक्री करण्याचे ठरविलेले आहे व आमचे अशिलांनी सदरची मिळकत ही रु. ५०,००,०००/- (अक्षरी पन्नास लाख रुपये) इतक्या रक्कमेस खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे, तसा विक्री संबंधीचा व्यवहारही उभयतांमध्ये ठरलेला असून त्याप्रमाणे दि. ०९/०४/२०२६ रोजी ठरलेल्या रक्कमेपैकी इसारा रु. ५,००,०००/- (अक्षरी पाच लाख रुपये) रक्कम इसारापावती नमूद चेक द्वारे आर.टी.जी.एस. स्वरूपात स्वीकारलेली आहे. सदरची मिळकत ही निर्बंध, निजोखमी, बिनबोजाची, स्वतंत्र मालकी व कब्जे वहिवाटीची असल्याची खात्री, त्याही प्लॉट मालकांनी आमचे अशिलास दिलेली आहे. व त्याप्रमाणे दिनांक १७/०४/२०२६ रोजी दै. तरुण भारत बार्शी या दैनिकात खरेदीपूर्व जाहीर नोटीस देखील दिलेली आहे.

असे असताना आजपावेतो ५ महिन्यांचा कालावधी पूर्ण झालेला आहे, तरी सदर व्यवहार पूर्ण करण्यासाठी आमचे अशिल सुधिर गोवर्धन ठोंबरे यांना वारंवार फोन करून व मोबाईल व्हॉट्स अप द्वारे मेसेज करून कळविले असून देखील ते उडवाउडवीचे उत्तरे देऊन सदर व्यवहार पूर्ण करण्यास टाळाटाळ करत आहेत. सदर मिळकतीबाबत बेकायदेशीर खरेदीखत, गहाण, दान, बक्षीस, साठेखत, मृत्युपत्र, वारसा, फेडपत्र, टाच, कर्ज-बोजा, करार, नोटरी, अथवा अन्य हस्तांतरणाचा दस्त करण्याचा प्रयत्नात आहेत. त्यामुळे श्रीमती प्रमिला गोवर्धन ठोंबरे, श्री. सुधिर गोवर्धन ठोंबरे, प्रिया गोवर्धन ठोंबरे लग्नानंतरचे नाव सौ. सुप्रिया सुधिर आयरकर यांचेशी कोणीही कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करू नये. याउपर हस्तांतरणाचा व्यवहार केल्यास तो मुळीच आमचे अशिलांचे हक्क अधिकारांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच जर इतर त्रयस्थ व्यक्तींनी व्यवहार केलेस त्यांची फसवणूक झाल्यास त्यास आमचे अशिल हे जबाबदार राहणार नाहीत. याची नोंद घ्यावी त्यामुळे सदरचे मिळकतीबाबत कोणाचीही फसवणूक होऊ नये म्हणून व आमचे अशिलाचे हक्क, हिश्शाची जाणीव करून देण्यासाठी ही सावधगतीची जाहीर नोटीस दिली असे. ता. २२/०९/२०२६

सही/-
पल्लवी सुधाकर वाघमारे
पत्ता- जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
मो. ८८३०८२३६५६
अशिलातर्फे ॲडव्होकेट

## महत्त्वाचे

### राष्ट्रपती, पंतप्रधानांनी केले पदक विजेत्यांचे अभिनंदन

**नवी दिल्ली :** आयची-नागोया येथे सुरू असलेल्या आशियाड क्रीडा स्पर्धेत हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला क्रिकेट संघाने सुवर्णपदक जिंकले. या स्पर्धेतील भारताचे हे पहिलेच सुवर्णपदक ठरले असून, त्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संघाचे अभिनंदन केले. संपूर्ण स्पर्धेत महिला क्रिकेटपटूंनी एक संघ म्हणून उत्कृष्ट खेळ केला आणि सर्व सामने जिंकले. त्यांनी देशाचा गौरव वाढवला आहे. त्या आपल्या तरुणांसाठी, विशेषतः आपल्या मुलींसाठी, मोठ्या प्रेरणेचा स्रोत आहेत, असे राष्ट्रपती मुर्मू यांनी एक्सवर पोस्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी आशियाड क्रीडा स्पर्धेत पदक जिंकणाऱ्या भारतीय एमएमए खेळाडू सुचिका तरियाल आणि भारतीय महिला क्रिकेट संघाचे अभिनंदन केले. महिलांच्या पारंपारिक ६० किलो वजनी गटात कांस्यपदक जिंकून मिश्र मार्शल आर्ट्समध्ये आशियाड क्रीडा स्पर्धेचे पदक जिंकणारी पहिली भारतीय खेळाडू ठरण्याचा मान सुचिका तरियालने मिळविला आणि इतिहास रचला. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला क्रिकेट संघाने आशियाड क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकल्यानंतर पंतप्रधान मोदींनी त्यांचेही अभिनंदन केले. भारतीय क्रिकेटसाठी एक शानदार विजय! आशियाड क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकल्याबद्दल आमच्या महिला क्रिकेट संघाचे मनापासून अभिनंदन. संघाने देशाला अभिमान वाटेल अशी कामगिरी केली आहे. संपूर्ण संघाला शुभेच्छा, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

### वुशूमध्ये रोशिबिना देवी उपांत्य फेरीत; पदक निश्चित

**नागोया :** आयची-नागोया आशियाड क्रीडा स्पर्धेत वुशूच्या महिलांच्या ६० किलो वजनी गटात मकाऊच्या चू मॅन सिनचा पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारत रोशिबिना देवी नाओरेमने भारतासाठी पदक निश्चित केले.

या स्पर्धेच्या मागील दोन आवृत्त्यांमध्ये रौप्य आणि कांस्य पदक जिंकणाऱ्या रोशिबिनाला 'आयची प्रीफेक्चरल मार्शल आर्ट्स हॉल'मध्ये मकाऊच्या प्रतिस्पर्ध्याविरुद्ध गुणांच्या फरकामुळे विजयी घोषित करण्यात आले. दुसरीकडे, हंजाबम लँगलेनटोम्बी देवी महिलांच्या 'नानक्वान आणि नंदाओ' प्रकाराच्या अंतिम फेरीत ९.४०३ गुणांसह नवव्या स्थानावर राहिली. तिला हालचालींच्या गुणवत्तेसाठी ४.८५, एकूण कामगिरीसाठी २.७०३ आणि कौशल्याच्या काठिन्य पातळीसाठी १.८५ गुण मिळाले. 'सांडा' प्रकाराच्या उपांत्यपूर्व फेरीत आर्यनला उझबेकिस्तानच्या सयदुल्लो अबुराशितोवकडून १-२ असा पराभव पत्करावा लागला. ■

# महिला क्रिकेट संघाने दिले भारताला पहिले सुवर्णपदक

## आशियाड : श्रीलंकेवर १४७ धावांनी एकतर्फी विजय

**निशिन, २२ सप्टेंबर**

आयची-नागोया आशियाड क्रीडा स्पर्धेत मंगळवारी महिला क्रिकेटच्या अंतिम टी-२० क्रिकेट सामन्यात भारताने दमदार कामगिरी करीत श्रीलंकेचा १४७ धावांनी धुव्वा उडविला. या विजयासह भारताने आपले सुवर्णपदक कायम राखले आणि स्पर्धेतील भारताचे पहिले सुवर्णपदक जिंकून मोहिमेची यशस्वी सुरुवात केली.

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघाचे हे सुवर्णपदक चालू स्पर्धेतील भारताचे पहिलेच पदक ठरले. फलंदाजीतील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर भारताने श्रीलंकेसमोर २१७ धावांचे विक्रमी लक्ष्य ठेवले होते, मात्र धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेचा संपूर्ण संघ १५.४ षटकांत ६९ धावांतच गारद झाला. भारतीय महिला क्रिकेट संघाने आशियाड क्रीडा स्पर्धेत सलग दुसरे सुवर्णपदक जिंकत आपला आशियाई दबदबा पुन्हा एकदा सिद्ध केला.


स्मृती मंधाना : ४५ चेंडूत ७९ धावा

भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. शेफाली वर्मा व स्मृती मंधानाने ६० चेंडूंत ९९ धावांची सलामी भागीदारी करीत भारताच्या विक्रमी धावसंख्येत भरीव योगदान दिले. मंधानाने ४५ चेंडूंत ५ चौकार व ७ षट्कारांसह ७९ धावांची, तर शेफाली वर्माने २९ चेंडूंत प्रत्येकी ३ चौकार व षट्कारांसह ४८ धावांची शानदार खेळी केली. त्यानंतर ऋचा घोषने २२ चेंडूंत ६ चौगकार व ३ षट्कारांसह ४९ धावा केल्या आणि भारताला ३ बाद २१६ धावांपर्यंत पोहोचवले; ही आशियाड क्रीडा स्पर्धेच्या इतिहासातील सर्वोच्च धावसंख्या ठरली.

श्रीलंकेच्या सर्व आशा कर्णधार चामारी अथापथू (२१ चेंडूत २९ धावा) हिच्यावर होत्या, परंतु ती एकटी भारतीय गोलंदाजांचा प्रतिकार करू शकली नाही. भारतीय फिरकी गोलंदाजांनी प्रतिस्पर्धी संघाला जेरीस आणले आणि श्रीलंकेचा संघ १५.४ षटकांत अवघ्या ६९ धावांत सर्वबाद झाला.

शेफाली वर्माने (४८ धावा आणि ३ धावांत २ बळी) अष्टपैलू कामगिरी केली, तर दीप्ती शर्माने ६ धावांत ३ बळी, श्री चरणी व श्रेयांका पाटीलने प्रत्येकी २ बळी मिळविले. एकंदरीत हा अंतिम सामना एकतर्फी ठरला. ◂ (वृत्तसंस्था)

### मिथुन मन्हास, तेंडुलकरकडून भारतीय महिला संघाचे कौतुक

**नवी दिल्ली :** मंगळवारी आशियाड क्रीडा स्पर्धेच्या अंतिम सामन्यात श्रीलंकेवर १४७ धावांनी दणदणीत विजय मिळवून सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक जिंकणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघाचे बीसीसीआयचे अध्यक्ष मिथुन मन्हास व सचिन तेंडुलकर यांनी अभिनंदन केले. ■

# आमच्या संघाने सुवर्णपदकांचे द्वार उघडले : हरमनप्रीत कौर

### भारतासाठी आणखी पदकांची आशा

**नागोया, २२ सप्टेंबर**

सुवर्णपदक मिळणे ही खूप चांगली भावना आहे. कोणत्याही खेळाडूसाठी हे एक स्वप्न असते. आमच्या महिला क्रिकेट संघाने आशियाड क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदकांचे द्वार उघडले आहेत. भारत जितकी जास्त सुवर्णपदके जिंकेल, तितके ते आमच्यासाठी चांगले आहे. आशियाड क्रीडा स्पर्धेतील महिला क्रिकेटमध्ये भारताने सुवर्णपदक जिंकल्यामुळे या स्पर्धेत देशासाठी सुवर्णपदकांची मालिका सुरू होईल, अशी आशा महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हिने मंगळवारी व्यक्त केली.

चीनमध्ये २०२३ मध्ये झालेल्या मागील आवृत्तीत जिंकलेले विजेतेपद कायम राखताना भारताने श्रीलंकेचा १४७ धावांनी पराभव केला.स्पर्धेपूर्वी आम्ही अजिंक्य राहण्याबाबत आणि स्वतःसाठी निश्चित केलेल्या उच्च दर्जाच्या खेळाचे प्रदर्शन करण्याबाबत चर्चा केली होती. प्रत्येक खेळाडू सकारात्मक मानसिकतेने प्रत्येक सामन्याकडे पाहत आहे, हे पाहून खूप समाधान वाटते, असे हरमनप्रीत कौर सामन्यानंतर म्हणाली. एकंदरीत, अनुभव आणि नवीन गुणवत्ता (प्रतिभा) यांचा समतोल अगदी योग्य होता आणि



महत्त्वाच्या क्षणी प्रत्येकाने आपली कामगिरी चोख बजावली, असे ती म्हणाली.

सुवर्णपदक कायम राखणे हेच आमच्या संघाचे एकमेव ध्येय होते. इथून सुवर्णपदक घेऊन जाणे. आम्हाला आमचा तिरंगा उंच फडकताना आणि राष्ट्रगीत गायले जाताना पाहायचे होते. पण, सुवर्णपदक मिळविणारे आम्हीच पहिले असू, याची आम्हाला कल्पना नव्हती. मला खात्री आहे की इतर खेळाडूही अनेक सुवर्णपदके जिंकतील, असे ३७ वर्षीय हरमनप्रीत म्हणाली. आम्ही उद्या परत (भारताला) जात आहोत. पण, आम्ही नक्कीच (इतर स्पर्धांवर) लक्ष ठेवू, असेही ती म्हणाली. ◂ (वृत्तसंस्था)

## तिरंगा फडकताना पाहण्यासारखा मोठा आनंद नाही: शेफाली वर्मा

**निशिन :** राष्ट्रध्वज फडकताना पाहण्यापेक्षा मोठा आनंद नाही, अशा भावना भारतीय महिला क्रिकेट संघाची सलामीवीर शफाली वर्मा हिने मंगळवारी व्यक्त केल्या. आशियाड क्रीडा स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक जिंकल्याचा आनंद साजरा करताना ती माध्यमांशी बोलत होती.



अंतिम सामन्यात हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने अंतिम सामन्यात श्रीलंकेवर १४७ धावांनी विजय नोंदविला. संघाच्या या विजयात शेफालीने अष्टपैलू कामगिरी केली. तिने २९ चेंडूंत ४८ धावा केल्या आणि दोन षटकांत केवळ तीन धावा देऊन दोन बळी घेतले.

राष्ट्रध्वज फडकताना पाहणे हेच आमचे ध्येय होते आणि मला खूप आनंद झाला आहे. आम्ही एकमेकांसोबत आनंद साजरा करण्यासाठी संघाचे जेवण आयोजित करणार आहोत. घरी पोहोचल्यावर आम्ही कुटुंबासोबत आनंद साजरा करू, असे ती म्हणाली. ■

# साक्षीकडून ऑलिम्पिक पदक विजेतीला हादरा

## आशियाड मुष्टियुद्ध : जादुमणीही उप-उपांत्यपूर्व फेरीत

**निशिओ, २२ सप्टेंबर**

भारतीय मुष्टियोद्धा साक्षी चौधरीने (५१ किलो) पॅरिस ऑलिम्पिकमधील कांस्यपदक विजेती आयरा विलेगास हिचा पराभव करून अनपेक्षित विजय मिळविला आणि उप-उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. त्याचवेळी, जादुमणी सिंग (५५ किलो) यानेही मंगळवारी आशियाड क्रीडा स्पर्धेच्या अंतिम सोळाच्या फेरीत प्रवेश केला.

भिवानी येथील २६ वर्षीय साक्षीने आपल्या उंचीचा व हातांच्या लांबीचा पुरेपूर वापर करीत फिलिपिन्सच्या बॉक्सरला दूर ठेवले आणि ५-० असा निर्विवाद विजय नोंदविला.

जादुमणीनेही नेपाळच्या चंद्र बहादूर थापावर ५-० असा वर्चस्वपूर्ण विजय मिळवून आपल्या मोहिमेची सुरुवात केली आणि अंतिम सोळाच्या फेरीत प्रवेश केला; तिथे आता त्याचा सामना टोकियो ऑलिम्पिकमधील रौप्यपदक विजेत्या फिलिपिन्सच्या कार्लो पालामशी होणार आहे.

साक्षीचा हा विजय ५१ किलो वजनी गटातील तिच्या प्रभावी कामगिरीची मालिका कायम राखणारा ठरला. तिने मे महिन्यात ५४ किलो वजनी गटातून खाली येत ५१ किलो गटात प्रवेश केला होता आणि निवड चाचणीत दोन वेळा जागतिक विजेती व मागील


साक्षी जादुमणी

स्पर्धेतील कांस्यपदक विजेती निखत झरीनचा पराभव केला होता. माजी ज्युनियर आणि युथ वर्ल्ड चॅम्पियन असलेल्या साक्षीने गेल्या महिन्यात राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते.

आता तिच्यासमोर आणखी एक कठीण आव्हान आहे, कारण अंतिम-१६ च्या फेरीत तिचा सामना कझाकस्तानची विद्यमान जागतिक विजेती अलुआ बाल्किबेकोवा हिच्याशी होणार आहे.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील रौप्यपदक विजेता जादुमणी याने थापाचा पराभव करण्यासाठी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण, अति-वेगवान आणि आक्रमक बॉक्सिंग शैलीचा आधार घेतला. दोघांमध्ये जोरदार मुष्ठीयुद्ध रंगले, परंतु जादुमणीचे ठोसे अधिक अचूक आणि प्रभावी होते. ◂ (वृत्तसंस्था)

# पुरुष संघाचे पदक निश्चित; महिला संघाचे आव्हान संपुष्टात

## आशियाड बॅडमिंटन : भारताची जपानवर ३-० ने मात

**नागोया, २२ सप्टेंबर**

आशियाड क्रीडा स्पर्धेत मंगळवारी भारतीय पुरुष बॅडमिंटन संघाने जपानवर शानदार विजय मिळवित उपांत्य फेरीत धडक मारली आणि पदकाची निश्चिती केली. या विजयात लक्ष्य सेनची मारलेली 'जबरदस्त मुसंड' महत्त्वाची आणि रोमांचक घटना ठरली. दुसरीकडे, महिला संघाला मात्र यजमान जपानकडून १-३ असा पराभव पत्करावा लागल्याने त्यांचे आव्हान संपुष्टात आले.

गत आशियाड क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक जिंकणाऱ्या भारतीय पुरुष संघाने यावेळीही उत्कृष्ट कामगिरी केली. लक्ष्य सेन, सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी-चिराग शेट्टी आणि आयुष शेट्टी यांच्या विजयांच्या जोरावर भारताने हा विजय साकारला.

पहिला गेम गमावल्यानंतर आणि निर्णायक गेममध्ये अल्मोडा येथील २५ वर्षीय लक्ष्य सेन १४-१९ असा पिछाडीवर होता. मात्र, त्याने पली जिद्द सिद्ध केली. त्याने सलग सात गुण मिळवत जागतिक क्रमवारीत सातव्या स्थानावर


लक्ष्य सेन

असलेल्या आणि दोनदा जागतिक स्पर्धेत रौप्यपदक जिंकणाऱ्या कोडाई नारओकाचा ११-२१, २१-५, २१-१९ असा पराभव केला आणि भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली.

पहिल्या दुहेरीच्या सामन्यात, या हंगामात दोन विजेतेपदे पटकावणाऱ्या सात्त्विक व चिराग जोडीने माजी जागतिक विजेते होकी ताकुरो आणि कोबायाशी युगो या जोडीचा २१-१८, २४-२२ असा पराभव करून भारताची आघाडी २-० अशी वाढवली. त्यानंतर, आयुष शेट्टीने प्रभावी खेळ करत कोकी वातानाबेचा २१-१०, २१-१९ असा पराभव केला. या विजयामुळे भारताचा सामना आणि पदक निश्चित झाले.

बुधवारी होणाऱ्या उपांत्य फेरीत भारताचा सामना गतविजेता चीन संघाशी होईल. दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात चीनने कोरियावर मात केली.

जपानमधील आशियाड क्रीडा स्पर्धेत जपानविरुद्ध आपल्या पुरुष संघाने मिळविलेला हा विजय अतिशय शानदार आहे. यामुळे सेऊल येथे १९८६ मध्ये झालेल्या आशियाड क्रीडा स्पर्धेतील काही खास आठवणी पुन्हा ताज्या झाल्या आहेत, असे भारताचे माजी प्रशिक्षक विमल कुमार म्हणाले. ◂ (वृत्तसंस्था)

# भारताने जपानविरुद्धचा टी-२० सामना जिंकला

**सानो, २२ सप्टेंबर**

भारत आणि जपान या दोन देशांमधील राजनैतिक संबंधाच्या ७५ व्या वर्षानिमित्त येथील सानो आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदानावर आयोजित ऐतिहासिक टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात ओलसर मैदानामुळे सामन्यांतील षटकांची मर्यादा कमी करण्यात आली. पाच षटकांच्या या ऐतिहासिक सामन्यात भारताने जपानवर २ धावांनी रोमहर्षक विजय नोंदविला.

अतिशय ओलावा असलेल्या व उन्हाच्या तडाख्यामुळे खेळण्यास अत्यंत कठीण बनलेल्या खेळपट्टीवर पाच षटकांच्या या 'हाय-व्होल्टेज' सामन्यातील अनपेक्षित धोके भारताने यशस्वीपणे पार केले. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताने ५ षटकांत ४ बाद ३२ धावा केल्या. विजयासाठी ३३ धावांचा पाठलाग करताना जपानला ५ शचरांक ३ बाद ३० धावांपर्यंतच मजल मारता आली.

या विजयादरम्यान भारताने पाच षटकांच्या टी-२० सामन्यात सर्वात कमी धावसंख्या यशस्वीपणे बचाव करण्याचा विक्रम प्रस्थापित केला; केवळ ३२ धावा करूनही भारताने हा अटीतटीचा सामना दोन धावांनी जिंकला. १२ चेंडूंत १६ धावा करणारा कर्णधार श्रेयस अय्यर सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. जपानकडून कर्णधार काडोवाकी-फ्लेमिंगने १२ धावा केल्या, तर हारा-हिन्झेने १७ धावांत २ बळी टिपले. ◂ (वृत्तसंस्था)

### सॉफ्ट टेनिसमध्ये जय मीना उपांत्यपूर्व फेरीत

**नागोया :** आशियाड क्रीडा स्पर्धेत मंगळवारी भारताच्या जय मीनाने सॉफ्ट टेनिसच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. जयने 'गट डी' मध्ये पाकिस्तानच्या अरेन हुसेनचा ४-० असा पराभव केला आणि आता उपांत्यपूर्व फेरीत त्याचा सामना फिलिपिन्सच्या शेरविन नुग्युइटशी होईल. दुसरीकडे, आर्यन ठाकूरने मंगोलियाच्या अल्टांगेरेल बोल्ड-एर्डेनेवर ४-० (४-१, ४-१, ४-०, ४-१) असा विजय मिळविला, परंतु त्याला चायनीज तैपेईच्या चेन पो-यीकडून ०-४ असा पराभव पत्करावा लागला. ■

# जुगराज, अभिषेक, दिलप्रीतची हॅट्ट्रिक

## आशियाड पुरुष हॉकी : भारताचा श्रीलंकेवर १६-१ ने विजय

**नागोया, २२ सप्टेंबर**

आशियाड क्रीडा स्पर्धेत मंगळवारी जुगराज सिंग, अभिषेक आणि दिलप्रीत सिंगने केलेल्या हॅट्ट्रिकच्या जोरावर भारतीय पुरुष हॉकी संघाने श्रीलंकेवर १६-१ असा शानदार विजय मिळविला आणि आपली वर्चस्व गाजवणारी मोहीम कायम राखली.

गट अ मधील दुसऱ्या साखळी सामन्यात ड्रॅग-फ्लिकर जुगराज सिंग तसेच स्ट्रायकर अभिषेक आणि दिलप्रीत सिंगने प्रत्येकी एक हॅट्ट्रिक नोंदविली आणि भारतीय पुरुष हॉकी संघाने तुलनेने कमकुवत असलेल्या श्रीलंकेचा १५ गोलने धुव्वा उडविला. याआधी भारताने इंडोनेशियाचा १३-१ असा पराभव केला होता.

जुगराजने (१०, २२, ४२ आणि ५३ व्या मिनिटाला) चार गोल केले, तर अभिषेक (११, १७, ४९ व्या मिनिटाला) आणि दिलप्रीतने (३०, ३८, ५५ व्या मिनिटाला) प्रत्येकी तीन मैदानी गोल केले.



कर्णधार हरमनप्रीत सिंग (१६, ४५ व्या मिनिटाला), मनदीप सिंग (५ व्या मिनिटाला), सुखजीत सिंग (२९ व्या मिनिटाला), मनप्रीत सिंग (३१ व्या मिनिटाला) आणि विवेक सागर प्रसादनेही (३६ व्या मिनिटाला) गोल केले.

श्रीलंकेचा एकमेव गोल सुरेश रत्नायके याने ५० व्या मिनिटाला केला, आशियाड क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात भारताविरुद्धचा त्यांचा हा पहिलाच गोल ठरला.

भारत आपला पुढील सामना गुरुवारी दक्षिण कोरियाविरुद्ध खेळणार आहे. सामन्याच्या सुरुवातीपासूनच भारतीय संघाने अपेक्षित वर्चस्व राखले आणि श्रीलंकेच्या संघावर पूर्ण नियंत्रण मिळविले. अभिषेकच्या पासवर मनदीपने गोल करत भारताचे खाते उघडले; यासाठी केवळ पाच मिनिटे लागली. ◂ (वृत्तसंस्था)

# डॉ. अनुवा कपूर यांनी जिंकलीत तीन पदके

**नागपूर, २२ सप्टेंबर**

एम्स नागपूरमधील कम्युनिटी मेडिसिनच्या एमडी अंतिम वर्षाच्या निवासी डॉक्टर डॉ.अनुवा कपूर यांनी २२ व्या राष्ट्रीय मास्टर्स जलतरण स्पर्धेत तीन पदके जिंकलीत. या यशाबद्दल एम्स नागपूरने त्यांचे अभिनंदन केले.

भारतीय जलतरण महासंघाच्या वतीने हरयाणातील बहादूरगड येथील चॅम्पियन अॅक्वाटिक्सि अकादमी येथे ११ ते १३ सप्टेंबर २०२६, या कालावधीत या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करताना डॉ.अनुवा कपूर यांनी ४०० मीटर वैयक्तिक मेडले प्रकारात सुवर्ण आणि १०० मीटर बटरफ्लाय प्रकारात कांस्यपदक पटकावले. याशिवाय महिलांच्या सांघिक ४ बाय ५० मीटर फ्रीस्टाईल रिले प्रकारात त्यांनी रौप्य पदक जिंकले. त्यांच्या या कामगिरीमुळे त्या ३ ते १० ऑक्टोबर २०२६ दरम्यान बंगळुरू येथे होणाऱ्या दुसऱ्या



एशियन मास्टर्स जलतरण स्पर्धेसाठी पात्र ठरल्या आहेत.

डॉ. अनुवा कपूर यांनी पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणाच्या अत्यंत व्यस्त वेळापत्रकात क्रीडा क्षेत्रात बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीसाठी, एम्स नागपूरचे कार्यकारी संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. प्रशांत पी. जोशी यांनी, त्यांचे कौतुक केले. तसेच, आगामी एशियन मास्टर्स जलतरण स्पर्धेसाठी दिल्या. डॉ. कपूर यांनी कार्यकारी संचालकांकडून मिळालेल्या प्रोत्साहनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ◂ (वृत्तसंस्था)

# भारतीय महिला टेबल टेनिस संघ उपांत्यपूर्व फेरीत; पुरुष संघ स्पर्धेतून बाहेर

**टोयोटा, २२ सप्टेंबर**

२० व्या आशियाड क्रीडा स्पर्धेतील टेबल टेनिस प्रकारात भारतीय महिला संघाने थायलंडवर विजय मिळवित उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली, मात्र पुरुष संघाला उप-उपांत्यपूर्व फेरीत दक्षिण कोरियाकडून पराभव पत्करावा लागल्याने स्पर्धेतून बाहेर पडावे लागले.

येथील 'स्काय हॉल'मध्ये झालेल्या लढतीत भारतीय महिला संघाने थायलंडवर ३-२ अशी निसटती मात केली, तर पुरुष संघाला ०-३ असा एकतर्फी पराभव स्वीकारावा लागला. आयर्लंडविरुद्धच्या सलामीच्या सामन्यानंतरचा गट फेरीतील हा त्यांचा दुसरा पराभव ठरला.

महिलांच्या लढतीत, पहिल्या सामन्यात श्रीजा अकुलाला ओरावान पारानंगकडून २-३ (११-७, ११-१, ९-११, ६-११, १०-१२) असा पराभव पत्करावा लागला.

दुसरा सामनाही पाच गेम्सपर्यंत रंगला, ज्यात यशस्वीनी घोरपडेने आपली प्रतिस्पर्धी सुथासिनी सावेत्ताबुतवर ३-२ (११-५, ५-११, ७-११, ११-९, ११-९) अशी मात केली. मात्र, दिया चितळेला जिन्निपा सावेत्ताबुतविरुद्ध २-३ (७-११, ११-५, ११-७, ७-११, ११-१३) असा पराभव स्वीकारावा लागला; या टप्प्यावर भारताची आघाडी २-१ अशी होती.

चौथ्या सामन्यात घोरपडेने पारानंगवर ३-० (११-५, ११-८, ११-९) असा वर्चस्वपूर्ण विजय मिळवून भारताला सामन्यात परत आणले, तर पाचव्या सामन्यात श्रीजाने पुनरागमन करत सुथासिनीविरुद्ध ३-१ (९-११, ११-६, १२-१०, ११-८) असा विजय मिळवला.

दुसरीकडे, भारतीय पुरुष संघासाठी मात्र ही स्पर्धा निराशाजनक ठरली आणि त्यांना स्पर्धेतून बाहेर पडावे लागले. हरमीत देसाईने पहिल्या गेममध्ये ११-८ असा विजय मिळवून चांगली सुरुवात केली, परंतु त्यानंतरच्या तीन गेम्समध्ये त्याला कोरियाच्या जांग वू-जिनकडून पराभव पत्करावा लागला आणि तो सामना १-३ (११-८, ७-११, ८-११, ९-११) असा हरला.

दुसऱ्या सामन्यात, पहिल्या गेममध्ये ४-११ असा मोठा पराभव झाल्यामुळे मनुष शाहवर दडपण आले होते, तरीही त्याने जोरदार पुनरागमन करत पुढील दोन गेम्स जिंकले. मात्र, त्याचा प्रतिस्पर्धी ओह जुंगसुंग याने ३-२ (४-११, ११-८, १३-११, ११-१३, ६-११) अशा फरकाने सामना जिंकला.

भारतासाठी परिस्थिती कठीणच राहिली; कारण मानव ठक्करची सुरुवातही पहिल्या गेममधील १०-१२ अशा पराभवाने झाली आणि त्यालाही तिसऱ्या सामन्यात आन जे-युनकडून १-३ (१०-१२, ६-११, ११-७, १०-१२) असा पराभव स्वीकारावा लागला. ◂ (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### अक्कलकोट शहर परिसरात सलग दुसऱ्या दिवशी पाऊस

**अक्कलकोट दि.२२ सप्टेंबर -**
अक्कलकोट शहर व परिसरात मंगळवार दि. २२ सप्टेंबर रोजी सलग दुसऱ्या दिवशी पावसाने हजेरी लावली.पावसाअभावी खरीप हंगाम वाया गेला आता सारी भिस्त रब्बी हंगामावर शेतकऱ्याची भिस्त आहे. मंगळवारी सलग दुसऱ्या दिवशी अक्कलकोट शहर परिसरात पावसाने हजेरी लावली. मंगळवारी दुपारी व रात्री ७.३० पासून ८ पर्यत खंडाखंडाने पाऊस पडला.

### खून प्रकरणी आरोपी पितापुत्रास ५ दिवसांची पोलिस कोठडी



**सोलापूर, दि.२२ सप्टेंबर -**
अनैतिक संबंधाच्या संशयावरून आहेरवाडी येथील २२ वर्षीय तरुणाचा तीक्ष्ण शस्त्राने हल्ला करून खून केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या धोंडीबा हनुमंत क्षेत्री (वय ४२) आणि त्याचा मुलगा आयुष धोंडीबा क्षेत्री (वय २१ दोघे रा. आहेरवाडी ता. दक्षिण सोलापूर) यांना ५ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश अक्कलकोटच्या न्यायालयाने सोमवारी दिला आहे. रविवारी पहाटे ३ वाजेच्या सुमारास अनैतिक संबंधाच्या संशयावरून सचिन अभिमन्यू सासवे (वय २२) या तरुणाचा शेतातील वस्तीवर झोपेत असताना निर्घृणपणे खून करण्यात आला होता. याप्रकरणी मयत सचिन याचे वडील अभिमन्यू सासवे (वय ५२ रा.आहेरवाडी) यांनी चारित्र्याच्या संशयावरून आपल्या मुलाचा वरील आरोपींनी खून केल्याची फिर्याद वळसंग पोलीसात दाखल केली होती.

### शिवणी येथे गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर -**
अज्ञात कारणावरून एका ४६ वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शिवणी (ता.उत्तर सोलापूर) येथे सोमवारी रात्री उघडकीस आली. शिवाजी कोळी (वय ४६) असे मयताचे नाव आहे. सोमवारी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह घरातील छताच्या अँगलला गमच्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यांना फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

### माळ्यावरील बादली डोक्यात पडल्याने एक जखमी

**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर -**
झोपेत असताना माळ्यावरील बादली डोक्यात पडल्याने पती जखमी झाला. ही घटना मुरारजी पेठ परिसरातील निराळे वस्तीत आज मंगळवारी पहाटेच्या सुमारास घडली. विष्णू फलटणकर (वय ५७ रा.निराळेवस्ती) असे जखमीचे नाव आहे. विष्णू हे रात्री घरात झोपले होते. पहाटे पाच वाजेच्या सुमारास त्यांची पत्नी माळ्यावरील घागर काढत होत्या. त्यावेळी बाजूस असलेली बादली डोक्यात पडल्याने फलटणकर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी अश्विनी (पत्नी) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### कुत्र्याला धडकून दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर -**
दुचाकीवरून प्रवास करीत असताना अचानक कुत्रा आडवा आल्याने खाली कोसळून वैभव गायकवाड (वय ४० रा.कुमठानाका सोलापूर) हे जखमी झाले. हा अपघात आज मंगळवारी सकाळच्या सुमारास घडला. वैभव सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास अक्कलकोट ते सोलापूर असा दुचाकीवरून प्रवास करीत होते. लिंबे चिंचोली येथील औष्णिक केंद्राजवळ कुत्रा आडवा आल्याने ते खाली कोसळले. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### प्रसिद्ध लावणी कलावंत शकुंतला नगरकर यांचे निधन

**अकलूज, दि. २२ सप्टेंबर -**
पारंपारिक लावणी कलावंत शकुंतला नगरकर (वय ६६) यांचे आज अल्पशा आजाराने निधन झाले.



१९९३ साली सहकारमहर्षी शंकर मोहिते-पाटील जयंती समारंभ समितीच्या वतीने सुरू केलेल्या लावणी स्पर्धेत पहिल्या वर्षीच्या त्या विजेत्या होत्या. त्यांना उत्कृष्ट नृत्यांगनाचाही पुरस्कार मिळाला होता. पुढे सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील पुरस्कार देऊनही सन्मानित केले होते. नवी दिल्ली येथील संगीत नाटक अकॅडमीचा लावणी कलावंत पुरस्कार तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या हस्ते मिळाला होता. महाराष्ट्र शासनानेही त्यांचा ज्येष्ठ लावणी कलावंत पुरस्कार देऊन सन्मान केला होता. त्यांच्या निधनाने कलाक्षेत्रात मोठी हानी झाल्याची भावना जयसिंह मोहिते-पाटील यांनी व्यक्त केली. प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील व जयंती समारंभ समितीच्या सदस्यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

## निधन वृत्त...

### अर्चना राऊत



**माढा, दि. २२ सप्टेंबर-**
माढा येथील अर्चना राऊत (वय ४२) यांचे मंगळवार दि. २२ सप्टेंबर रोजी पहाटे ४ सुमारास हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सासू, सासरे, दीर, जाऊ, विवाहित नणंद असा परिवार असून जिल्हा परिषद शिक्षक लक्ष्मण राऊत यांच्या त्या पत्नी होत.

### सिद्राम यादव



**मंगळवेढा, दि. २२ सप्टेंबर-**
येथील जवाहरलाल शेतकी हायस्कूलचे संस्थापक सचिव सिद्राम यादव (वय ९४) यांचे मंगळवार दि. २२ सप्टेंबर रोजी दुपारी २.५० वाजणेच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. मंगळवेढा तालुका शिक्षक सोसायटीचे संचालक गणेश यादव व ॲड. बापूसाहेब यादव यांची ते वडील होत.

# श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीवर लेपन प्रक्रिया; पंढरपूरचे विठ्ठल मंदिर दोन दिवस बंद

### केंद्रीय पुरातत्त्व विभागाच्या देखरेखीखाली काम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ सप्टेंबर -**
श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील मूर्तीच्या संवर्धनासाठी लेपन प्रक्रिया मंगळवारी रात्रीपासून सुरू करण्यात येणार आहे. मंगळवारी रात्री शेजारतीनंतर मंदिर भाविकांना दर्शनासाठी बंद होईल. त्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीची आवश्यक स्वच्छता करून केंद्रीय पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली लेपन प्रक्रिया सुरु केली जाईल. ही लेपन प्रक्रिया दोन दिवस चालणार आहे.

आषाढी यात्रेपुवी जून महिन्यात ही प्रक्रिया करण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, त्याचवेळी वारकरी संप्रदायातील काही व्यक्तींनी न्यायालयात धाव घेतल्याने निकाल लांबला होता. त्यातच आषाढी यात्रा, त्यानंतरचा श्रावण महिना आणि भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेऊन लेपण प्रक्रिया पुढे ढकलली होती. दरम्यान मंदिर समितीने मागील आठवड्यात



बैठक घेऊन मूर्ती संवर्धनाच्या कामाबाबत अंतिम निर्णय घेतला आहे. त्यानुसार २२ सप्टेंबर रोजी रात्री शेजारतीनंतर मंदिर बंद करण्यात येणार आहे. २३ व २४ सप्टेंबर

> विठ्ठल रुक्मिणी मुर्तीवर लेपन प्रक्रिया सुरू असल्याने मंदिर बंद राहणार आहे. भाविकांनी मंदिर समितीला सहकार्य करावे.
> **- गहिनीनाथ महाराज औसेकर, सहअध्यक्ष, विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर.**

रोजी श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीवर लेपन प्रक्रिया करण्यात येणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया केंद्रीय पुरातत्त्व विभागाच्या अधिपत्याखाली आणि मार्गदर्शनाखाली केली जाणार आहे. मूर्तीची स्वच्छता, आवश्यक पूर्वतयारी आणि त्यानंतर संवर्धनासाठी लेपण प्रक्रिया अशा टप्प्यांत काम होणार आहे.

ही संवर्धन प्रक्रिया श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, व्यवस्थापक प्रवीण घम तसेच सल्लागार समितीचे सदस्य यावेळी उपस्थित राहणार आहेत.

# आत्महत्या करु पाहणाऱ्या युवकाचे उपायुक्तांकडून समुपदेशन

### कागदपत्र तपासणी; पदे रिक्त झाली की नियुक्तीची ग्वाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**
लाड कमिटींतर्गत नोकरीसाठी पाठपुरावा करूनही प्रतिसाद मिळत नसल्याच्या कारणावरून एका युवकाने सोमवारी महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीवरून उडी मारण्याचा प्रयत्न केला होता. मात्र त्याला वेळीच रोखले होते. या घटनेनंतर मंगळवारी उपायुक्त सोनाली यादव यांनी त्याला बोलावून त्याच्या कागदपत्रांची तपासणी केली. घटनेनंतर प्रशासकीय इमारतीचा चौथा मजला कुलूप बंद केला आहे.

युवक नोकरीसाठी पात्र आहे. सध्या क्रमवारीनुसार नियुक्तीची प्रक्रिया सुरू असून पात्र यादीत त्या युवकाचा क्रमांक ७९ आहे. आतापर्यंत ६० क्रमांकापर्यंत नियुक्त्या झाल्या आहेत. ही प्रक्रिया कांबळे यांना समजावून सांगितली असून त्यांनीही ती मान्य केली आहे, अशी माहिती यादव यांनी दिली. अर्जदार बुद्धभूषण कांबळे यांचे समुपदेशन केले आहे. अर्जदार पात्र आहे. रिक्त पदे झाली की नियुक्ती देण्यात येईल, असेही त्या म्हणाल्या.

> **चौथा मजला केला कुलूप बंद**
> महापालिका प्रशासकीय इमारतीवरून पुन्हा कोणी उडी मारण्याचा प्रयत्न करू नये, यासाठी प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून मंगळवारी इमारतीचा चौथा मजला कुलूप बंद केला आहे. या परिसरात सुरक्षा रक्षकांनी नियमित गस्त घालण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आवश्यक ती दक्षता घेण्यात येत आहे.

# 'हरिभाई'च्या विद्यार्थ्यांची आजोबा गणपती चरणी अथर्वशीर्ष सेवा



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर -**
येथील हरीभाई देवकरण प्रशालेतील इयत्ता पाचवी ते नववीच्या १०० विद्यार्थ्यांनी हिंदुस्थानातील पहिला मानाचा आजोबा गणपती सोलापूर येथे श्री गणपती अथर्वशीर्ष पठण केले व गाणी सादर केली.

पाऊस पडून शेतकरी सुखी व्हावा अशी प्रार्थना अथर्वशीर्ष पठणाने केली. शाळा समितीचे अध्यक्ष सुरेश मंकणी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला. श्री गणपती अथर्वशीर्ष पठण संस्कृत शिक्षक निखिल बडवे यांच्याबरोबर म्हणण्यात आले. संगीत शिक्षिका सावनी कुलकर्णी यांच्यासह गणपती गाणी गायली. मुख्याध्यापक प्रकाश कांबळे यांच्या हस्ते आरती झाली. आजोबा गणपती ट्रस्टच्यावतीने मुख्याध्यापक प्रकाश कांबळे, पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड, पर्यवेक्षक गणेश नेवरे, सहशिक्षक माणिक साळसकर, निखिल बडवे, राघवेंद्र पिल्ले तसेच शिक्षिका सावनी कुलकर्णी व भक्ती माळवदकर यांचा सत्कार करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांना प्रसाद वाटप करण्यात आला.

# विद्यापिठीय, महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांचा आंदोलनाचा एल्गार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.२२ सप्टेंबर -**
महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीची महत्त्वपूर्ण बैठक सोमवार, दि. २१ सप्टेंबर रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पार पडली. बैठकीत प्रलंबित मागण्यांसाठी ५ ऑक्टोबर रोजी पुणे येथील उच्च शिक्षण संचालक कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्णय झाला.

बैठकीत राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या दीर्घकाळापासून प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शासनाकडे वारंवार पत्रव्यवहार, निवेदने आणि पाठपुरावा करूनही मागण्यांबाबत ठोस निर्णय झालेला नसल्याने आंदोलनाची पुढील दिशा निश्चित केली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी संयुक्त कृती समितीचे अध्यक्ष



अजय देशमुख होते. यावेळी मुख्य संघटक रावसाहेब त्रिभुवन, मिलिंद भोसले, आनंदराव खामकर, दिनेश दखने, प्रकाश म्हसे, शिवाजी उतेकर, चंद्रकांत धनवड यांच्यासह राज्यभरातील विविध संघटनांचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंदोलनाच्या रूपरेषेनुसार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांना निवेदन देणार आहे. मोर्चात राज्यभरातून सुमारे १ हजारांहून अधिक विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी सहभागी होणार असल्याचे कृती समितीने सांगितले. मोर्चानंतरही शासनाने मागण्यांची तातडीने दखल न घेतल्यास पुढील टप्प्यात एक दिवसाचा राज्यव्यापी लाक्षणिक संप पुकारण्यात येईल. त्यानंतरही प्रश्न मार्गी न लागल्यास राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचारी राज्यव्यापी बेमुदत कामबंद आंदोलन/संप पुकारतील, असा इशारा संयुक्त कृती समितीने दिला आहे.

महासंघाचे प्रतिनिधी म्हणून सोलापूर जिल्ह्यातून भीमा मस्के, शरद मस्के, रामराजे सूर्यवंशी, योगेश पाटील, दीपक कांबळे यांची निवड करण्यात आली.

### शिवी दिल्याच्या कारणावरून घरात घुसून हल्ला; तिघे जखमी

**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर -**
शिवी दिल्याच्या कारणावरून घरात घुसून चाकू,सळई आणि काठीने केलेल्या मारहाणीत तिघेजण जखमी झाले. ही घटना कोंडी (ता.उत्तर सोलापूर) येथे सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली.

रशीद खान (वय १६), साहिले खान (वय १८) आणि इसराज खान (वय २४ सर्व रा. कोंडी) अशी जखमीची नावे आहेत. आम्हाला दुपारी शिवीगाळ का केली ? असे म्हणत राहुल सिंग, सुमन थापा आणि इतर तिघांनी मिळून त्यांना मारहाण केली. त्यांना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# वृध्द प्रेयसीकडून वृध्द प्रियकराची हत्या

### डीएनए तपासणीवरून दीड महिन्यानंतर उलगडले खूनाचे रहस्य




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ सप्टेंबर -**
शंकरगाव (ता. पंढरपूर) येथे प्रेम प्रकरणातून ५५ वर्षीय महिलेने ७० वर्षीय प्रियकराची हत्या केली. तसेच मृतदेह जाळून पुरावा नष्ट करण्याचाही प्रयत्न केला. दीड महिन्यानंतर डीएनए अहवाल हाती येताच खूनाचा उलगडा झाला. अखेर तिला न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे.

७० वर्षीय अंबादास खांडेकर यांचे ५५ वर्षीय मंगल होनमानेशी प्रेमसंबंध होते. घरच्यांनी अनेकदा समजावल्यानंतरही ते चालूच होते. २७ जुलै २०२६ रोजी अंबादास 'शेंडगे वस्तीवर मुलीकडे जातो' असे सांगून घरातून निघाले आणि परत आलेच नाहीत. घरच्यांनी ३० जुलैला पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात मिसिंग तक्रार दिली. २ ऑगस्टला अंबादास यांच्या कुटुंबीयांना मंगलच्या घरासमोर उसाचे पाचट आणि एक साडी जळाल्याचे दिसले. तेव्हाच भालचंद्र चंदनशिवे यांच्या शेतातील विहिरीत पाण्यावर एक कुजलेले, अर्धवट जळालेले प्रेत दसले. पोलीस पाटील विजय वाघमारे यांनी पंचनामा करुन प्रेताचा डीएनए सॅम्पल घेतला. अंबादास यांच्या दोन मुली मैना पांढरे आणि जयश्री येलगुंडे यांचे डीएनए सॅम्पल घेऊन पुणे लॅबला पाठवले. दीड महिन्यानंतर अहवालात अंबादास यांचाच मृतदेह असल्याचे स्पष्ट झाले.



# मोडनिंब बसस्थानकावर एसटीच्या प्रतीक्षेत प्रवासी

### सणांसाठी जादा बस सोडल्याने समस्या

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २२ सप्टेंबर -**
गणेशोत्सव व गौरी सणानिमित्त कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी एसटी महामंडळाने जादा बसची व्यवस्था केली. त्यामुळे बस उत्सवाकरिता कोकण मार्गावर पाठवल्याने ग्रामीण भागातील नियमित बस फेऱ्यांवर परिणाम झाला आहे. सणानंतर मोडनिंब बसस्थानकावर प्रवाशांची गर्दी वाढली आहे. अनेक प्रवासी बसची वाट पाहत ताटकळत बसलेले असतात.

लांब पल्ल्याच्या काही बसफेऱ्यांना वेळ लागत असल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. ग्रामीण भागातील बसफेऱ्याही कमी झाल्याने विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयात जाण्यासाठी अडचणी येत आहेत. मोडनिंब बसस्थानकातून पुणे, सोलापूर, कुर्डुवाडी, माढा तसेच ग्रामीण भागातील मार्गांवर नियमित बससेवा सुरळीत पूर्ववत करावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे. मोडनिंब बसस्थानकावर सध्या प्रवाशांची मोठी गर्दी होत आहे. मात्र अनेक एसटी बस बसस्थानकात न येता महामार्गावरूनच पुढे जात असल्याने प्रवाशांना मोठी गैरसोय सहन करावी लागत आहे. बसस्थानकाच्या दोन शिफ्टसाठी आवश्यक मनुष्यबळही उपलब्ध नाही.

> सणामुळे मोडनिंब बसस्थानकावर प्रवाशांची गर्दी वाढली आहे. बसस्थानकात नियमित बस याव्यात. गरज पडल्यास प्रवाशांच्या हितासाठी पुन्हा आंदोलन करू.''
> **- प्रदीप गिड्डे, सरचिटणीस, राष्ट्रवादी.**

> मोडनिंब बसस्थानकावर प्रवाशांची गर्दी वाढली आहे. लांब पल्ल्याच्या काही बसफेऱ्यांना वेळ लागत असल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयात जाण्यासाठी अडचणी येत आहेत.
> **- विशाल पाटील, शहराध्यक्ष, भाजप**

# पंढरपूर शहरातील वाहतूक व्यवस्थेचा खेळखंडोबा

### नगरप्रदक्षिणा मार्गावर बेशिस्त पार्किंग; नागरिकांसह भाविकांचीही गैरसोय

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ सप्टेंबर -**
पंढरपूर शहरातील वाहतूक व्यवस्थेचा अगदी खेळखंडोबा होवून बसला आहे. मंगळवारी (दि.२२) एकादशी दिवशी मंदिर परिसरात, प्रदक्षिणा मार्गावर वाहतूकीचा पुरता बोजवारा उडाला होता. मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्गावर तीन, चार चाकी वाहने पार्किंग केल्यामुळे सतत वाहतूक कोंडी होत होती. याचा फटका शहरातील सर्वसामान्य नागरिक तसेच एकादशी निमित्त नगरप्रदक्षिणा करणाऱ्या वारकरी भाविकांना बसत होता.

एरवी शहरात वाहतूकीचे तीन तेरा वाजलेले असतातच निदान पंधरा दिवसाच्या, महिन्याच्या एकादशीला तर वाहतूक शाखेकडून शहरातील विशेषत: मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्गावरील वाहतूकीचे चोख नियोजन केले जावे अशी अपेक्षा असते. तरी देखील वाहतूक शाखेचे अधिकारी आणि कर्मचारी यांना त्याचे काहीही देणेघेणे नव्हते अशी एकंदर शहरातील परिस्थिती होती.

अतिरिक्त पोलीस प्रमुखांची नियुक्ती झाल्यानंतरही शहरातील वाहतूक व्यवस्थेत म्हणावी तशी सुधारणा झालेली दिसत नाही. मंदिर परिसरातील रस्ते तसेच प्रदक्षिणा मार्ग हा भाविकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. विशेषतः दर एकादशी तसेच आषाढी, कार्तिकी सारख्या मोठ्या यात्रा आणि अन्य धार्मिक पर्वांच्या काळात या मार्गावर भाविकांची मोठी गर्दी असते. मात्र, गर्दीच्या काळातही या मार्गावरील रिक्षा, चारचाकी आणि इतर वाहने रस्त्याच्या कडेला तसेच काही ठिकाणी तर चक्क रस्त्यावरच उभी केली जात असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे प्रदक्षिणा मार्ग हा भाविकांना नगरप्रदक्षिणेसाठी की पार्किंगसाठी आहे असा प्रश्न पडतो.



> **वाहतूक शाखा असून अडचण, नसून खोळंबा**
> पंढरपूर येथे वाहतूकीचे नियोजन व्यवस्थित व्हावे यासाठी स्वतंत्र वाहतूक शाखा कार्यरत आहेत. या शाखेकडे सुमारे १५ ते १८ कर्मचारी आणि वरिष्ठ दर्जाचा अधिकारी कार्यरत आहेत. मात्र शहरातील एकंदर वाहतूक व्यवस्था पाहिली तर येथील वाहतूक शाखा असून अडचण नसून खोळंबा म्हटले तर वावगे ठरणारे नाही. शहरातून होणाऱ्या अवजड वाहतुकीचाही प्रश्न गंभीर बनला आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोठ्या वाहनांमुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. शहरातील अनेक महत्वाच्या भागात रिक्षा तसेच चारचाकी वाहने बिनदिक्कतपणे रस्त्याच्या कडेला किंवा वाहतुकीला अडथळा होईल अशा पद्धतीने आडवीतिडवी उभी केली जातात. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज चौक, चौफाळा, मंदिर परिसर आणि प्रदक्षिणा मार्गावर ही समस्या अधिक तीव्र आहे.

> **पंढरपूरकरांच्या अपेक्षा**
> पंढरपूरच्या वाढत्या लोकसंख्येचा तसेच भाविक संख्येचा विचार करून शहरातील वाहतूक व्यवस्थेचा स्वतंत्र कृती आराखडा तयार करावा. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी स्वत: पाहणी करुन उपाययोजना कराव्यात. लोकप्रतिनिधींनीही प्रश्न विधीमंडळात तसेच शासकीय पातळीवर मांडून समस्या सोडवण्याचा प्रयत्न करावा.



दैनिक तरुण भारत कार्यालयातील 'श्रीं'चे पूजन महापौर विनायक कोंड्याल, 'भाजपा'चे प्रदेश पदाधिकारी विक्रम देशमुख, इंडियन मॉडेल स्कूलचे अमोल जोशी व सायली जोशी, सामाजिक कार्यकर्ते सुरेश चव्हाण, सिध्देश्वर राजमाने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, पत्रकार किरण बनसोडे.



दैनिक तरुण भारत कार्यालयातील 'श्रीं'चे पूजन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जि.प.चे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, व्यवस्थापक विनायक पुला, जाहिरात विभागाचे व्यवस्थापक मनोहर बायनी, पत्रकार यशवंत गुरव.



दैनिक तरुण भारत कार्यालयातील 'श्रीं'चे पूजन आमदार देवेंद्र कोठे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, सीईओ श्रीनिवास बिनगुंडी, मराठवाडा विभागाचे प्रमुख कुलभूषण तारे, राजाराम मस्के, वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड, उपसंपादक विकास चाटी.



दैनिक तरुण भारत कार्यालयातील 'श्रीं'चे पूजन महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, पत्रकार किरण बनसोडे.



दैनिक तरुण भारत कार्यालयातील 'श्रीं'चे पूजन मुंबई-गोवा बार असोसिएशनचे माजी चेअरमन तथा विद्यमान सदस्य ॲड.मिलींद थोबडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ॲड.बसवराज सलगर, समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, मराठवाडा विभाग प्रमुख कुलभूषण तारे, जाहिरात विभागाचे व्यवस्थापक मनोहर बायनी, प्रकाश जाधव.



दैनिक तरुण भारत कार्यालयातील 'श्रीं'चे पूजन महापालिकेतील शिवसेना गटनेते अमोल शिंदे, काँग्रेसचे गटनेते चेतन नरोटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आ.सचिन कल्याणशेट्टी, जि.प.चे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, सीईओ श्रीनिवास बिनगुंडी, पत्रकार यशवंत गुरव.



दैनिक तरुण भारत कार्यालयातील 'श्रीं'चे पूजन जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, जाहिरात विभागाचे व्यवस्थापक मनोहर बायनी, पत्रकार यशवंत गुरव.



दैनिक तरुण भारत कार्यालयातील 'श्रीं'चे पूजन मराठवाडा विभाग प्रमुख कुलभूषण तारे व त्यांच्या अर्धांगिनी सौ.राजश्री तारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मयुरा तारे, उपसंपादिका आरती कुसेकर, मनीषा विभुते, अंजुमन मुल्ला.



दैनिक तरुण भारत कार्यालयातील 'श्रीं'चे पूजन सुरेश शिंदे उर्फ गामा पैलवान यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, जाहिरात विभागाचे व्यवस्थापक मनोहर बायनी, गामा पैलवान यांचे मित्रमंडळी.



दैनिक तरुण भारत कार्यालयातील 'श्रीं'चे पूजन वैराग येथील एकता महिला मंचच्या जिल्हाप्रमुख लक्ष्मी सुतार जिल्हा, प्रवक्त्या रंजना गवळी, जिल्हा प्रसिध्दी प्रमुख गीतांजली जोशी, आशा विभूते, राजश्री बादगुडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रभाकर क्षीरसागर.



दैनिक तरुण भारत कार्यालयातील 'श्रीं'चे पूजन तरुण भारतचे कर्मचारी राजकुमार दिंडोरे व त्यांच्या अर्धांगिनी सुकन्या दिंडोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मराठवाडा विभाग प्रमुख कुलभूषण तारे, सिध्दाराम चिट्टे, मयुरा तारे आदी.



दैनिक तरुण भारत कार्यालयातील 'श्रीं'चे पूजन सोलापूर क्राईम रिपोर्टर असोसिएशनचे अध्यक्ष विशाल भांगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्य संपादक प्रशांत माने.

# सोलापूर विद्यापीठाच्या 'सिनेट' सदस्यांनी कुलगुरुंच्या विरोधात केली आगपाखड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट अर्थात अधिसभेत कुलगुरु डॉ.प्रकाश महानवर यांची कार्यपध्दती, कर्मचाऱ्यांना दिली जाणारी अपमानास्पद वागणूक, विद्यापीठ व विद्यार्थी हिताचे परस्पर बदलले जाणारे निर्णय, खासगी संस्थांशी केलेले वादग्रस्त सामंजस्य करार, न्यायालयीन प्रकरणातील प्राध्यापक पदोन्नती आणि आरक्षणाचे उल्लंघन आदी विषयांवरुन आगपाखड करत सदस्य चांगलेच आक्रमक झाले होते.

कुलगुरु डॉ.प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची ३८ वी सिनेट अर्थात अधिसभा घेण्यात आली. व्यासपीठावर प्र-कुलगुरु प्रा.डॉ.लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव प्रा.डॉ.अतुल लकडे यांच्यासह अधिसभा व व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते. ऑनलाईन व ऑफलाईन अशा दोन्ही पध्दतीने ही बैठक घेण्यात आली.




कामातील दिरंगाई अथवा वेळेवर न आल्याप्रकरणी कर्मचाऱ्यांवर कोणत्या नियम ानुसार कारवाई केली जाते? असा प्रश्न अजितकुमार संगवे यांनी उपस्थित केला. वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांना कुलगुरुंनी तासन्तास उभे करुन अपमानास्पद वागणूक दिल्याचा मुद्दा रोहिणी तडवळकर, ॲड.मल्लिनाथ शाबादे, संजय साळुंखे, प्रा.डॉ.वीरभद्र दंडे, प्रा.जैनोद्दिन मुल्ला, गणेश डोंगरे यांनी उपस्थित केला.

या प्रश्नांना उत्तर देताना कुलगुरु प्रा.प्रकाश महानवर यांनी एकाही कर्मचाऱ्यांनी लेखी तक्रार केली नसल्याचे सांगत, सर्व सदस्यांनी शांत राहावेत, असे जणू फर्मावले. तेव्हा, कुलगुरुंच्या अशा दहशतीमुळेच कर्मचारी पुढे येऊन तक्रार करण्याचे धाडस करीत नाहीत, असा पलटवार सदस्यांनी केला. दरम्यान, कर्मचाऱ्यांनी वेळेत यावे, प्रशासनाने केवळ नियमांच्या चौकटीत राहून कारवाई करावी, असे सांगत प्रा.डॉ.भगवान आदटराव यांनी या वादावर पडदा टाकला.

### युवा महोत्सवातील जागेवरुन कुलगुरुंची ठाम भूमिका

मागील वर्षी सांगोला महाविद्यालयात पार पडलेल्या विद्यापीठ युवा महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यात सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्यांना व्यासपीठावर बसण्याची सोय करण्यात आली नव्हती. दोन महिन्यांपूर्वी राज्यपाल यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या पदवी प्रदान सोहळ्यातही अधिसभा सदस्यांना बसण्यासाठी योग्य व्यवस्था नव्हती. याकडे ॲड.मल्लिनाथ शाबादे यांनी लक्ष वेधले असता, व्यासपीठावर कोणाला बसवायचे? तो सर्वस्वी माझा निर्णय असल्याचे सांगत आपल्या भूमिकेवर आपण ठाम आहोत, असे कुलगुरु प्रा.प्रकाश महानवर यांनी सांगितले.

### सामंजस्य करार; खासगीकरणाचा डाव

विद्यापीठाने केलेल्या सामंजस्य करारांवरुन ॲड.शाबादे यांनी जाब विचारला. ८०-२० या सूत्रानुसार खासगी संस्थांना विद्यापीठाची ८० टक्के स्वायत्तता बहाल करुन खासगीकरणाचा डाव आखला जात आहे का? असा सवाल डॉ.आदटराव यांनी उपस्थित केला. या गंभीर आक्षेपावर कुलगुरुंनी सविस्तर उत्तर नंतर देईन, असे सांगत हा विषय राखून ठेवला.

### आरक्षण निकषांचे पालन झाले का?

कंत्राटी कर्मचारी व सहायक प्राध्यापक भरतीत आरक्षण निकषांचे पालन झाले का? यावर व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.डॉ.सम ाधान पवार यांनी 'आरक्षणाचा निकष जपला असून काही ठिकाणी थोडे लवचिक धोरण ठेवले, १९-२० झाले', असे सांगताच सदस्यांनी तीव्र आक्षेप घेतला.

### उच्च न्यायालयात याचिका प्रलंबित

उच्च न्यायालयात याचिका प्रलंबित असताना एका प्राध्यापकाला देण्यात आलेली पदोन्नती, त्यासाठी नेमलेल्या निवड समितीत विद्या परिषद व व्यवस्थापन परिषदेच्या म ान्यतेनुसार विषयतज्ज्ञ होते का? असा प्रश्न गणेश डोंगरे यांनी विचारला.

### सदस्यांनी गळ्यात अडकवले होते फलक

सिनेटची बैठक सुरु होण्यापूर्वी विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावर अधिसभा सदस्या तथा भाजप शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, सुदर्शन यादव, ॲड.सुनंदा भगत, सूरज मस्के, संजय साळुंखे, वर्षाराणी कामुर्ती, अजिंक्य देशमुख यांनी 'कुलगुरु की हुकूमशहा? विद्यापीठातील कर्मचारी-अधिकाऱ्यांना गुलाम ाची वागणूक देणारे आका कोण?' अशा आशयाचे फलक गळ्यात अडकवून लक्ष वेधून घेतले.

## सलग दुसऱ्या दिवशी पावसाची हजेरी; शेतकरी अद्यापही चिंताग्रस्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्ह्यावर दुष्काळाची गडद सावट असताना परतीच्या पावसाने दुसऱ्या दिवशी सलग हजेरी लावली आहे. परंतु हा अत्यल्प पाऊस असल्याने शेतकरी अद्यापही चिंताग्रस्त आहे. सोलापूर जिल्ह्यावर यंदा खूपच कमी पर्जन्यमान झाल्यामुळे जिल्ह्यात सध्या दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे.

एल निनोच्या प्रभावामुळे यंदा सोलापूर जिल्ह्यावर दुष्काळाचे संकट ओढवले आहे. पावसाळा संपत आला तरीही यावर्षी सरासरीच्या निम्माही पाऊस झालेला नाही. खरिपाचे पीक हाता-तोंडातून गेल्यामुळे शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट ओढावले आहे. सलग दुसऱ्या दिवशी पावसाने हजेरी लावली असली तरी अगदी अत्यल्प आहे.

शेतकऱ्याची सर्व भिस्त आता रब्बी हंगामावर आहे. पुढील १५ ते २० दिवस पाऊस मोठ्या प्रमाणात झाला तरच रब्बी पिकाच्या बाबतीतील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत होणार आहेत. पण परतीचा पाऊस पुढे काही दिवस पडेलच, अशी खात्री नसल्याचे सांगण्यात येते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नळदुर्गातील स्वीट मार्ट, हॉटेल्सची तपासणी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ सप्टेंबर -**

सणासुदीच्या पार्श्वभूमीवर नळदुर्ग शहरातील स्वीट मार्ट व हॉटेल्समध्ये विक्री होणाऱ्या खाद्यपदार्थांची अन्न व औषध प्रशासन विभागाने तातडीने तपासणी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी ग्राहक व नागरिकांमधून होत आहे.

शहरातील काही स्वीट मार्टमध्ये पेढे, बर्फी, बालुशाही, कंदी पेढे तसेच गणेशोत्सवातील मोदक यांसारखे खाद्यपदार्थ कालबाह्य किंवा



निकृष्ट दर्जाचे असल्याच्या तक्रारी ग्राहकांकडून करण्यात येत आहेत. काही पदार्थांमध्ये भेसळ अथवा नियमबाह्य घटकांचा वापर होत असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे.

त्यामुळे नळदुर्ग शहरासह राष्ट्रीय महामार्गालगतच्या स्वीट मार्ट व हॉटेल्सची तपासणी करून खाद्यपदार्थांचे नमुने घ्यावेत.

भेसळयुक्त अथवा कालबाह्य पदार्थ आढळल्यास संबंधितांविरुद्ध नियमानुसार कडक कारवाई करावी, अशी मागणी नळदुर्ग येथील सुज्ञ नागरिकांनी केली आहे.



# दुष्काळी भागाच्या पाहणीसाठी मुख्यमंत्री फडणवीसांचा आज जिल्हा दौरा



### पीक नुकसान, पाणी-चारा व मदतीबाबत शेतकऱ्यांच्या अपेक्षा...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ सप्टेंबर -**

पावसाने दीर्घकाळ ओढ दिल्याने मराठवाड्यासह राज्यातील अनेक भागांत खरीप हंगाम संकटात सापडला आहे. सोयाबीनसह विविध पिकांना मोठा फटका बसला असून शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दुष्काळी भागाच्या पाहणी करण्यासाठी उद्या (दि.२३) धाराशिव जिल्हा दौऱ्यावर येत असल्याची माहिती भाजपाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी दिली आहे.

या दौऱ्यात दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून मुख्यमंत्री कोणता निर्णय घेतात आणि शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा मिळणार का? याकडे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

पावसाचा खंड वाढल्याने अनेक ठिकाणी उभी पिके करपली आहेत. मराठवाड्यात सोयाबीन हे प्रमुख खरीप पीक असून शेंगा भरण्याच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पावसाने दडी मारल्याने उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. सोलापूर जिल्ह्यातही दीर्घ पावसाच्या खंडामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांनी १७ सप्टेंबर रोजी पिकांच्या नुकसानीचे सर्वेक्षण करण्याची तयारी सुरू असल्याचे सांगितले होते. नियमांनुसार औपचारिक पीक नुकसान सर्वेक्षण दि. ५ ऑक्टोबरनंतर केले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. केंद्राकडील एनडीआरएफच्या मदतीची प्रतीक्षा न करता राज्य सरकारकडून मदत करण्याची भूमिकाही त्यांनी मांडली होती.

राज्यातील अनेक जिल्ह्यांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने मंत्र्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात प्राथमिक पाहणी करून तयारी करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी यापूर्वी सांगितले आहे.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांच्या प्रस्तावित पाहणी दौऱ्यात पीक नुकसान, पाणीटंचाई, चारा उपलब्धता, पीक विमा आणि शेतकऱ्यांना तातडीच्या मदतीबाबत काय निर्णय होतो, याकडे सोलापूर, धाराशिव आणि लातूरसह संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागले आहे.

## मानवतेला काळिमा : वाशीत महिलेवर तर शिराढोणमध्ये ५ वर्षीय बालिकेवर लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ सप्टेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात एका २४ वर्षीय महिलेवर तर कळंब तालुक्यातील शिराढोण येथील ५ वर्षीय बालिकेवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधमाविरूद्ध संबंधित पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वाशी तालुक्यात २४ वर्षीय महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, दि.३ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर या कालावधीत एका तरुणाने महिलेचे फोटो डिलीट करण्याच्या बहाण्याने तिला भाड्याच्या खोलीवर नेऊन लैंगिक अत्याचार केला.



त्यानंतर आणखी एका तरुणानेही तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. तसेच एका महिलेसह दोन तरुणांनी तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने जबरदस्तीने काढून घेतल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

याप्रकरणी पीडितेने दि.२१ सप्टेंबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच कळंब तालुक्यातील शिराढोण येथील एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. २० सप्टेंबर रोजी सायंकाळी संबंधित तरुणाने मुलीला आपल्या घराच्या गच्चीवर नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याची तक्रार तिच्या आईने केली.

या फिर्यादीवरून दि.२१ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास संबंधित पोलीस करीत आहेत. पीडितांची ओळख कायद्यानुसार गोपनीय ठेवण्यात आली आहे.

## धाराशिवात तलवार बाळगणाऱ्या तरुणावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ सप्टेंबर -**

शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाजवळ विनापरवाना तलवार बाळगणाऱ्या तरुणावर धाराशिव शहर पोलिसांनी कारवाई केली. श्रीनाथ चंद्रकांत जाधव (वय २२, रा. धाराशिव) असे त्याचे नाव आहे.

२० सप्टेंबर रोजी रात्री पोलिसांनी त्याच्याकडून लोखंडी तलवार जप्त केली.

याप्रकरणी पोलीस अंमलदार कृष्णा गायकवाड यांच्या फिर्यादीवरून शस्त्र कायदा कलम ४/२५ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

## दुष्काळ जाहीर करा, शेतकऱ्यांना तातडीची मदत द्या!




### तुळजापुर शहरात शेतकरी आक्रोश मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ सप्टेंबर -**

पावसाने दीर्घ उघडीप दिल्याने खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर विविध मागण्यांसाठी सोमवारी तुळजापूर शहरात शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून निघालेला मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला. यावेळी तहसीलदारांना निवेदन देऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

तुळजापूर तालुक्यातील अनेक भागांत पावसाने दडी मारल्याने सोयाबीन, उडीद, बाजरी, मका तसेच द्राक्षबागांचे मोठे नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेली पिके पाण्याअभावी करपल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी, अशी मागणी मोर्चातून करण्यात आली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत, दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी, नवीन पीककर्ज उपलब्ध करून देणे आणि चालू पीककर्जाचे व्याज माफ करणे, या प्रमुख मागण्या करण्यात आल्या. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना एक लाख रुपये प्रोत्साहनपर अनुदान द्यावे, अशी मागणीही करण्यात आली.

पावसाअभावी झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना पीकविम्याची भरपाई तत्काळ द्यावी. तसेच जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था करण्यासाठी चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. ग्रामीण भागात रोजगार हमीची कामे तातडीने सुरू करावीत, पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी व बोअरवेल अधिग्रहित कराव्यात, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती व मोफत एसटी पास द्यावेत, तसेच महिला शेतकरी बचत गटांच्या कर्जवसुलीस स्थगिती देऊन व्याजमाफी करावी, अशा मागण्याही निवेदनातून करण्यात आल्या.

मोर्चात धाराशिव जिल्हा काँग्रेसचे ॲड. धिरज पाटील, जिल्हाध्यक्ष उमेशराजे निंबाळकर, ॲड. अरविंद बेडगे, अमोल कुतवळ, अक्षय परमेश्वर-कदम यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी सहभागी झाले होते.

## लोहाऱ्यात किरकोळ वादातून पत्नीची चाकूने वार करून हत्या

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२२ सप्टेंबर -**

सततच्या किरकोळ वादाचे पर्यवसान हाणामारीत होऊन पतीने धारदार सुऱ्याने पत्नीवर पोट, पाठ व गळ्यावर सुमारे दहा वार केल्याची घटना सोमवारी (दि.२१) दुपारी लोहारा (खुर्द) शिवारात घडली. या हल्ल्यात पत्नीचा जागीच मृत्यू झाला, तर पतीही पोटात वार झाल्याने गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



कमलाबाई पिंटू उर्फ आप्पाराव राठोड (वय ४३) असे मयत महिलेचे नाव आहे. कमलाबाई व त्यांचे पती पिंटू उर्फ आप्पाराव गुलाब राठोड (वय ४६) यांच्यात गेल्या काही दिवसांपासून किरकोळ कारणांवरून वाद सुरू होते. सोमवारी दुपारी पुन्हा वाद झाल्यानंतर त्याचे हाणामारीत रूपांतर झाले. यावेळी पतीने धारदार सुऱ्याने पत्नीवर वार केल्याचे पोलिसांनी सांगितले.

घटनेनंतर जखमी अवस्थेत पिंटू राठोड दुचाकीवरून लोहारा पोलीस ठाण्यात पोहोचला व घटनेची माहिती दिली. पोलिसांनी त्याला लोहारा ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी धाराशिव येथे पाठविले.

दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. नेमका वाद कोणत्या कारणावरून झाला, याचा तपास पोलीस करीत आहेत.

## धाराशिवात मटका जुगारावर पोलिसांचा छापा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ सप्टेंबर -**

आनंदनगर पोलिसांनी २१ सप्टेंबर रोजी नगरपालिका कार्यालयासमोर रोडलगत छापा टाकून कल्याण मटका जुगाराचे साहित्य व ८१० रुपये रोख जप्त केले.

याप्रकरणी राजहंस किरण काकडे (वय ३२, रा. आगडगल्ली, धाराशिव) याच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अन्वये आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कृष्णा खोऱ्याच्या पाण्यासाठी संघर्षाचा बिगुल!

### मंगरुळमध्ये वंचित गावांतील शेतकऱ्यांची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.२२ सप्टेंबर -**

कृष्णा खोऱ्यातील पाणीवाटपात तुळजापूर तालुक्यातील बहुतांश गावे वंचित राहिल्याच्या निषेधार्थ आणि पाण्यासाठी लढा उभारण्यासाठी सोमवारी मंगरुळ येथे परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांची पहिली बैठक झाली. या बैठकीत कृष्णा खोरे पाणी संघर्ष समिती स्थापन करण्याचा एकमताने निर्णय घेण्यात आला.

तुळजापूर तालुका कायम दुष्काळी म्हणून ओळखला जात असून बालाघाटाच्या कुशीत वसलेल्या या तालुक्यातील शेतकऱ्यांना दरवर्षी पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. मात्र, कृष्णा खोऱ्यातील पाणी इतर तालुक्यांना देताना तुळजापूर तालुक्यातील मंगरुळसह कुंभारी, काडगाव, नांदुरी, आरळी, कसई यासह अनेक गावांना वगळण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

बैठकीत शेतकऱ्यांनी अनेक वर्षांपासून कृष्णा खोऱ्यातील पाण्याची मागणी केली जात असल्याचे सांगितले. तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन वंचित गावांचा पाणीप्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी करण्यात आली. शासनाने या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास संघर्ष समितीच्या माध्यमातून रास्ता रोको, धरणे आंदोलन तसेच जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून आंदोलन तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

बैठकीस मुकुंद डोंगरे, चित्तरंजन सरडे, तालुकाध्यक्ष धैर्यशील पाटील, रुबाब पठाण, दिलीप भोकरे, कचरे यांच्यासह मंगरुळ व परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## नळदुर्गात मद्यपी दुचाकी चालकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ सप्टेंबर -**

मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालविणाऱ्या विजय सुभाष गायकवाड (रा. साठेनगर, नळदुर्ग) याच्याविरुद्ध नळदुर्ग पोलिसांनी कारवाई केली.

२१ सप्टेंबर रोजी रात्री बसस्थानक नळदुर्ग रोडवर एमएच २५ एआर २२५५ क्रमांकाची दुचाकी मद्यधुंद अवस्थेत चालविताना तो आढळून आला. याप्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# लोहाऱ्यात ४०० ट्रॅक्टर, १०० बैलगाड्यांतून शेतकऱ्यांचा एल्गार!

### लोहारा तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्यासह हेक्टरी एक लाख मदत द्या; माकणीचे पाणी शेतकरी-नागरिकांसाठी राखीव ठेवण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२२ सप्टेंबर -**

लोहारा तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा, शेतकऱ्यांना तातडीने दुष्काळी मदत द्यावी तसेच तालुक्यातील पाण्यावर शेतकरी व नागरिकांचा प्राधान्याचा हक्क असावा, या प्रमुख मागण्यांसाठी सोमवारी लोहारा शहरात सकल शेतकरी बांधवांच्या वतीने भव्य ट्रॅक्टर व बैलगाडी मोर्चा काढण्यात आला. बसस्थानकापासून तहसील कार्यालयापर्यंत निघालेल्या या मोर्चात सुमारे ४०० ट्रॅक्टर आणि १०० बैलगाड्यांसह मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले.





मोर्चाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील गावागावांत बैठका घेऊन शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात आला होता.

पावसाचा दीर्घ खंड, पिकांची दयनीय अवस्था, पाण्याची टंचाई आणि वाढता शेती खर्च यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याची भावना या बैठकांमध्ये व्यक्त करण्यात आली. मोर्चात सहभागी होण्याच्या आवाहनाला शेतकरी, युवक आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

लोहारा तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून हेक्टरी एक लाख रुपये दुष्काळी मदत द्यावी, प्रत्येक जनावरासाठी दरमहा १० हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावेत, ऊस पिकाला फळबागांप्रमाणे अनुदान द्यावे आणि दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, अशा मागण्या करण्यात आल्या.

तसेच प्रत्येक एकरासाठी २०० चौरस फूट सोकपिटची व्यवस्था शासनाने करावी, पिण्याच्या पाण्यासाठी तालुक्यातील धरणे व तलावांमधील पाणी राखीव ठेवावे, अशी मागणीही करण्यात आली. माकणी धरणाचे पाणी तसेच तालुक्यात उपलब्ध असलेला पाणीसाठा शेतकरी व नागरिकांना प्राधान्याने मिळावा, या मागणीवरही शेतकऱ्यांनी भर दिला.

मोर्चानंतर शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदार रणजितसिंह कोळेकर यांना देण्यात आले.

यावेळी तालुक्यातील शेतकरी, युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### तुळजापुरात दुग्धाभिषेक

**तुळजापूर, दि.२२ सप्टेंबर**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा आमदार अंबादास दानवे यांच्या समर्थनार्थ तुळजापूर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात पक्षाच्या वतीने त्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून सन्मान करण्यात आला. यावेळी शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हा संघटक प्रमुख शामलताई वडणे-पवार, उपजिल्हाप्रमुख जितेंद्र कानडे, तालुकाप्रमुख जगन्नाथ गवळी, शामभाऊ पवार, कृष्णार्थ मोरे, सुधीर कदम, अर्जुन साळुंके, सागर इंगळे यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.



### तालुकाध्यक्षपदी शिवाजी कांबळे

**अणदूर, दि.२२ सप्टेंबर**

येथील सामाजिक कार्यकर्ते शिवाजी कांबळे यांची शिवसेना शेतकरी परिषदेच्या तुळजापूर तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली. धाराशिव येथे झालेल्या संघटनेच्या बैठकीत प्रदेशाध्यक्ष शंकर धोंडगे यांनी त्यांच्या निवडीची घोषणा केली. शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी पदाच्या माध्यमातून प्रामाणिकपणे प्रयत्न करणार असल्याचे कांबळे यांनी सांगितले. यावेळी देवानंद रोचकरी, भैरवनाथ माडजे, दिलीप लोमटे यांच्यासह जिल्ह्यातील कार्यकर्ते उपस्थित होते. कांबळे यांच्या निवडीबद्दल अणदूर परिसरातील शेतकरी व खडकाळी मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी अभिनंदन केले.



### पांडुरंग महाराज लोमटे यांचे प्रवचन

**धाराशिव, दि.२२ सप्टेंबर**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गणेशोत्सवानिमित्त 'संस्काराचे मोती' या उपक्रमांतर्गत ज्येष्ठ प्रवचनकार हभप. ॲड. पांडुरंग महाराज लोमटे यांचे प्रवचन झाले. विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेतच आपल्या जीवनाचे अस्तित्व ओळखावे. आई-वडील हेच आपले चालते-बोलते व जागृत दैवत असून, दुसऱ्याच्या आनंदात आपला आनंद मानावा. संतांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून संस्कारक्षम व सात्त्विक जीवन जगावे, असे मार्गदर्शन लोमटे यांनी केले. डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे यांच्या प्रेरणेने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रा. गणेश शेटे यांनी मानले.




### लोहारा काँग्रेसचे आमरण उपोषण

**लोहारा, दि.२२ सप्टेंबर**

पावसाने मोठी ओढ दिल्याने खरीप पिकांवर गंभीर संकट निर्माण झाले असून, धाराशिवसह मराठवाड्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा, या मागणीसाठी लोहारा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. सोयाबीन, कापूस, तूर यांसह विविध पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शासनाने शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ५० हजार रुपयांची मदत द्यावी, जनावरांसाठी चारा छावण्या सुरू कराव्यात, विद्यार्थ्यांचे शालेय शुल्क माफ करावे, अशा मागण्या आंदोलकांनी केल्या आहेत. यावेळी आ. प्रवीण स्वामी, जगदेव वगे, दयानंद पाटील, बसवराज कारभारी, अमोल बिराजदार, शामसुंदर तोडकारी, प्रकाश होंडराव यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



### अध्यक्षपदी ॲड. आनंद फाटक

**खामसवाडी, दि.२२ सप्टेंबर**

कळंब विधीज्ञ मंडळाच्या सन २०२६-२७ या वर्षासाठी झालेल्या निवडणुकीत अध्यक्षपदी ॲड. आनंद केशवराव फाटक यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी ॲड. अमर पायाळ, महिला उपाध्यक्षपदी ॲड. किरण गालफाडे यांची निवड करण्यात आली. सचिवपदी ॲड. कुणाल डिकले, तर कोषाध्यक्षपदी ॲड. दत्तात्रय कवडे यांची निवड झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. भगीरथ वाघमोडे यांनी काम पाहिले.

# पोलिस कर्मचाऱ्यावर टोळक्याचा हल्ला!; दुचाकी अडवून मारहाण,लोखंडी रॉडने डोक्यात वार;दोघे ताब्यात इतर फरार

बीड (प्रतिनिधी) बीड शहरामध्ये मागील काही महिन्यांमध्ये रात्रीच्यावेळी नशेमध्ये काही तरुणाचे टोळके दहशत निर्माण करण्यासाठी भांडणे,हाणामारी तसेच शस्त्राने वार देखील करत असल्याच्या घटना आहेत.यामुळे बीड पोलिसांनी रात्रीच्या वेळी विनाकारण फिरणाऱ्यावर व वेळेचे उल्लंघन करणाऱ्या हॉटेल,बियर बार,धाबे व बिर्याणी हाऊसवर कारवाई मोहीम हाती घेण्याची गरज आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत मागील महिन्यातच माने कॉम्प्लेक्स भागात मागील भांडणाची कुरापत काढून दोघांवर दहा जणांच्या टोळक्याने लाठी काठ्याने व शस्त्राने हल्ला केल्याने दोघे गंभीर जखमी झाले होते यातील पाच आरोपी अद्यापही फरार आहेत. एक महिन्यानंतरही फरार आरोपीचा शोध लागत नसल्याने शिवाजी नगर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. DB पथक काय करते? गुन्हेगारावर पोलिसांचा वचक राहिला नाही का?असा देखील सवाल उपस्थित होत आहे.

टोळक्याने एका पोलिस अंमलदाराची मोटारसायकल अडवून त्यांच्यावर सशस्त्र हल्ला केल्याची घटना २१ सप्टेंबर रोजी रात्री शहरातील नगर रोडवर घडली. या हल्ल्यामध्ये पोलिस अंमलदारासह अन्य एक जखमी झाले आहेत. या हल्ल्यात खांडेकर यांच्या डोक्याला व पायाला गंभीर दुखापत झाली असून बीड येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी पोलिस अंमलदार खांडेकर यांच्या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात सहा ते सात जणांविरुध्द जीवे मारण्याचा प्रयत्न केल्यासह अन्य कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काल रात्री उशिरा पोलिसांनी या प्रकरणात दोन आरोपींना अटक केली आहे.दरम्यान गेल्या काही दिवसांपासून मध्यरात्रीच्या वेळी टोळ्यांकडून लोकांना त्रास देण्याचा प्रयत्न सुरू आहे. आठवडाभरापुर्वीच सुभाष रोडवर एका तरूणाला मध्यरात्री आडवून लुटल्याची घटना घडली होती, त्यामुळे अशा टोळक्यांचा पोलिसांनी बंदोबस्त करावा अशी मागणी होवू लागली आहे.



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार गेवराई पोलिस ठाण्यात पोलिस अंमलदार म्हणून कार्यरत असलेले धीरज कल्याण खांडेकर (वय ३३ वर्ष, रा. पालवन चौक, बीड) हे २१ सप्टेंबर २०२६ रोजी मध्यरात्री मोटारसायकलवरून जात असताना आरोपींनी इतर साथीदाराला बोलवून हल्ला केला.

तू गाडीचा हॉर्न का वाजवलास ? अशी कुरापत काढून आरोपींनी त्यांच्याशी भांडण उकरून काढले. त्यानंतर हातातील लोखंडी रॉडने खांडेकर यांच्या डोक्यात मारहाण केली आणि दगडाने उजव्या पायावर मारून गंभीर दुखापत केली. तसेच, तक्रारदार व त्यांच्यासोबत असलेल्या अन्य एकाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली.

शिवाजी नगर पोलिसांनी तातडीने तपास करून प्रज्वल दीपक मस्के (रा. संत नामदेव नगर, धानोरा रोड, बीड), ओमकार लाटे (रा. ग्रामसेवक कॉलनी, नगर रोड, बीड) यांना अटक केली असून याप्रकरणातील अन्य आरोपींचा शोध सुरू आहे. पोलिस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. मुंडे पुढील तपास करीत आहेत.

या प्रकरणी खांडेकर यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९ (१), ११८ (२), १८९ (२), १९१ (२) (३), १९० आणि १२३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत प्रज्वल दीपक मस्के (रा. संत नामदेव नगर, धानोरा रोड, बीड) आणि ओमकार लाटे (रा. ग्रामसेवक कॉलनी, नगर रोड, बीड) यांना अटक केली आहे. अन्य आरोपींचा शोध सुरू आहे.

दरम्यान, शहरात मध्यरात्रीच्या वेळी टोळक्यांकडून नागरिकांना त्रास देण्याच्या घटना वाढत असल्याची चर्चा आहे. काही दिवसांपूर्वी सुभाष रोडवर एका तरुणाला लुटल्याची घटना घडली होती. त्यामुळे रात्रीच्या वेळी अशा टोळक्यांवर पोलिसांनी कडक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक समीरशेख , उपविभागीय पोलीस अधिकारी वेंकटराम साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्पाचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाक्ठ , पोलीस अंमलदार भास्कर केंद्रे संतोष राऊत,पो. सचिन आगलावे यांनी कली. फरार आरोपीचा शोध सुरु आहे.

## अंबाजोगाईत मोठी घरफोडी : 24 लाख 80 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी केला लंपास...!

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहरातील बँक कॉलनी परिसरात एका व्यापाऱ्याचे बंद घर फोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा एकूण 24 लाख 80 हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

बँक कॉलनी परिसरातील रहिवासी व कापड व्यावसायिक गुलाबचंद हनुमानदास सारडा (वय – 56) यांचे घर दि. 17 सप्टेंबर रोजी सायंकाळी 6 वाजता ते 19 सप्टेंबर रोजी सकाळी 9 वाजेपर्यंत बंद होते. याच कालावधीत अज्ञात चोरट्यांनी घराच्या लोखंडी गेटचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर पाठीमागील दरवाजाचे कुलूप व बेडरूममधील कपाटाचे लॉक तोडून कपाटात ठेवलेले सोन्या – चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. या चोरीत सोन्या – चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा एकूण 24 लाख 80 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी दि. 20 सप्टेंबर रोजी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे करीत आहेत.

## रायगडावर 24 सप्टेंबरला दशनाम गोसावी समाजाचा भव्य मेळावा

**माजलगाव :** अखंड हिंदुस्थानाचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पावन स्मृतींना अभिवादन करण्यासाठी दि. २४ सप्टेंबर रोजी किल्ले रायगडावर दशनाम गोसावी समाजाच्या वतीने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यात दशनाम गोसावी समाजाचे आद्यगुरू महंत निश्चलपुरी महाराज यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती, अशी समाजाची श्रद्धा आहे.

या ऐतिहासिक सोहळ्याच्या स्मरणार्थ रायगडावर होणाऱ्या कार्यक्रमास महाराष्ट्रातील विविध भागांतून दशनाम गोसावी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. समाजबांधवांना मार्गदर्शन करण्यासाठी दशनाम गोसावी समाज परिषदेचे राज्याध्यक्ष ओमप्रकाश गिरी, संस्थापक अध्यक्ष अ‍ॅड. राजेंद्र बन तसेच ह.भ.प. महंत दत्ता महाराज गिरी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याला अभिवादन करण्याबरोबरच समाजाची एकजूट, सामाजिक संघटन आणि पुढील दिशा याबाबतही यावेळी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यातील दशनाम गोसावी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने रायगडावर उपस्थित राहून ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन मराठवाडा अध्यक्ष भास्कर गिरी यांच्या सह , प्रा. लक्ष्मण गिरी, प्रा. तात्या पुरी, दिगंबर गिरी, सुधाकर भारती, आसाराम गिरी, संजीव भारती, रवि बन, दशनाम गोसावी समाज परिषदेचे, महादेव गिरी, अमित गिरी (माजलगाव), सुरेश गोसावी पुरी चिखली,भीमाशंकर गिरी,सूर्यकांत गिरी (माजलगाव), बाजीराव गिरी सर, बालाजी पुरी (आंबेजोगाई), विश्वंभर गिरी, मच्छिंद्र बन (बीड) अशोक पुरी आळंदी, राम गिरी आळंदी, कैलास गिरी आळंदी, विष्णू गिरी पुणे, यांनी केले आहे.

## लोकसंवाद मोहिमेअंतर्गत बीड शहरातील सावता गणेश मंडळ येथे उपक्रम



**बीड दि. 22 (जिमाका) :** गणेशोत्सवाच्या कालावधीत सर्वसामान्यांना घरपोच आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने लोकसंवाद मोहिमेअंतर्गत राज्य शासनाच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्यावतीने संपूर्ण राज्यभरात 'श्रीगणेशा आरोग्याचा' हे विशेष अभियान राबवले जात आहे. जिल्ह्यातही 'श्रीगणेशा आरोग्याचा " या संकल्पनेंतर्गत सलग १० दिवस विविध शासकीय रुग्णालये महात्मा फुले जन आरोग्य योजना व मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत खासगी वैद्यकीय संस्था तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये मोफत आरोग्य तपासणी आणि उपचार सेवा सुरू करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविला जात आहे.

**या अभियानांतर्गत शासकीय आणि खासगी वैद्यकीय संस्थांच्या सहकार्याने पुढील तपासण्या मोफत केल्या जात आहेत:**

* सामान्य शारीरिक तपासणी व औषधोपचार
* रक्तदाब (BP) आणि मधुमेह (Sugar) तपासणी
* कर्करोग (Cancer) प्राथमिक तपासणी
* ईसीजी (ECG) व आवश्यक रक्तचाचण्या
* असंसर्गजन्य आजारांचे (NCD) प्राथमिक निदान

गावोगावी आरोग्य यंत्रणा सज्ज

जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, शहरी आरोग्य केंद्रे तसेच 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' या सर्व केंद्रांवर ही मोफत तपासणी सुरू आहे. यासोबतच गर्दीच्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये विशेष आरोग्य शिबिरे भरवण्यात येत असून मंडळांकडूनही याला मोठा प्रतिसाद मिळत आहे.

बीड जिल्ह्य अंतर्गत मा. जिल्हाधिकारी श्री विवेक जॉनसन , निवासी जिल्हाधिकारी श्री शिवकुमार स्वामी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ सतीश सोळंके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ उल्हास गंडाळ यांच्या मार्गदर्शना नुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष बीड येथील डॉ चैतन्य कागदे यांनी जिल्ह्यातील सर्व गणेश मंडळा पर्यंत आरोग्याचा जागर पोहचवण्याचे नियोजन आखले आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

**अहवाल :** बीड जिल्हा श्री गणेशा आरोग्याचा अभियान-2026
मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, बीड
**दिनांक :** 14 ते 21/09/2026
शिबिरांचा आढावा
**एकूण शिबिरे :** 553
**एकूण रुग्ण :** 26171
**एकूण पुरुष :** 11795
**एकूण महिला :** 10958
**बालके :** 3418

### प्रख्यात कवी विठ्ठल वाघ यांना भगवानराव लोमटे पुरस्कार प्रदान

## मराठवाड्याच्या पाण्याचा बॅकलॉग कधी निघणार : कवी विठ्ठल वाघ

**अंबाजोगाई :** प्रख्यात कवी तथा निवृत्त प्राचार्य विठ्ठल वाघ यांना कै. यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह समितीच्या वतीने दिला जाणारा भगवानराव लोमटे स्मृती राज्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्यात कुठलेही सरकार आले तरी मराठवाड्याचा पाण्याचा बॅकलॉग अद्याप भरून निघाला नाही अशी खंत विठ्ठल वाघ यांनी व्यक्त केली.

लेखक तथा विचारवंत माजी प्राचार्य डॉ. विश्वास पाटील, ज्येष्ठ पत्रकार अशोकराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. समितीचे सचिव दगडू लोमटे, उपाध्यक्ष कमलाकर कांबळे, प्रभा विठ्ठल वाघ यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

कवी विठ्ठल वाघ आपले विचार व्यक्त करताना म्हणाले, की अंबाजोगाई हे माझे श्रद्धेचे ठिकाण आहे. यशवंतराव



चव्हाण यांच्या विचाराचा वारसा जोपासत शहराला सांस्कृतिक उभारी देण्याचे काम कै. भगवानराव लोमटे यांनी केले. कवितेने जगाला नव, नवी सृष्टी दिली. ही कवीता आपण जीव ओतून लिहितो, असे सांगून शेतकऱ्यांच्या वेदना मांडणारे भाष्य त्यांनी केले. या राज्यातील शेतकरी वर्ग अद्याप उपेक्षितच राहिला आहे. यावर्षी तर विदर्भ व मराठवाड्यात बिकट आवस्था. शेतकरी अडचणीत आहे. मराठवाड्याला त्यांच्या वाट्याचे पाणी मिळाले असते, तर आज ही आवस्था झाली नव्हती. राज्यात एकाच भागाला पाणी मिळते आणि दुसरा तहानलेला ही आवस्था बदलली पाहिजे अशी अपेक्षा विठ्ठल वाघ यांनी व्यक्त केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या वेदना व दुःख मांडणाऱ्या कवीता सादर केल्या.

राजकारण हे सामाजिक उत्थानाचे गमक असावे अशी धारणा असणारे यशवंतराव यांचे व्यक्तीमत्व होते. त्यांना भाषेचा विवेक जोपासता आला. त्यांचे चिंतन व वाचन आज दुर्मीळ आहे. भगवानराव लोमटे यांनीही ममत्व जागवले, या जगात स्मित, आश्रु, आणि स्पर्शाची भाषा कायम राहणार असल्याचा विश्वास डॉ. विश्वास पाटील यांनी व्यक्त केला.

अशोकराव देशमुख यांनी कै. भगवानराव लोमटे यांच्या आठवणींना उजाळा दिला. राजकारणात सर्वसमावेशक भूमिका त्यांची होती. जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांचे योगदान होते. दोन वेगवेगळ्या विचाराची माणसे जुळवण्याचे काम त्यांनी केले. काम करून घेण्याचे त्यांचे कसब होते. अशा आठवणी श्री. देशमुख यांनी सांगितल्या.

दगडू लोमटे यांनी प्रास्ताविकात यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाच्या उपक्रमाची माहिती दिली. पाहुण्यांचा परिचय डॉ. कमलाकर कांबळे यांनी दिला. सूत्रसंचालन प्रा. अंबादास फटांगरे यांनी करून आभार मानले.

## आ. विजयराजे पंडित यांच्या हस्ते प्रभाग 12 व 14 मध्ये रॅलीसह विविध मंडळांच्या गणपतींची आरती संपन्न



बीड । प्रतिनिधी

गणेशोत्सवानिमित्त आमदार विजयसिंह पंडित यांनी बीड शहरातील प्रभाग क्र.14, व 12 मध्ये विविध ठिकाणी गणेश मंडळांना भेटी देत श्रीगणेशाची आरती मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाल्या, नगरसेवक भैय्यासाहेब मोरे रंजीत बनसोडे प्रमोद शिंदे, यांनी तगडे नियोजन केले होते यावेळी त्यांनी गणेशभक्त तसेच परिसरातील नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या विविध अडचणी जाणून घेतल्या. आमचे तीनही नगरसेवक मोरे, बनसोडे, शिंदे सक्रिय असतात,तसेच मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्नांवर चर्चा करून नगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून आवश्यक उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आश्वासन दिले.

यावेळी संतोष मानुरकर, निवृत्ती डोके सर, रामचंद्र निर्मळ सर, करपे सर, भालेकर बप्पा, कुलकर्णी काका, देवबाप्पा पारगावकर काका, मिठन्नसेट कोटुळे,लोंढे, आगलावे, शिंदे, घोडके, मोरे, काशीद , नाईकवाडे, सातपुते, पाठक, सोने, अजबे, ठोसर, वाघमारे, उत्कर्ष,यांच्यासह मंडळातील सर्व सदस्य उपस्थित होते. तसेच सभापती आरती बनसोडे, नगरसेविका सीता ताई मोरे, चक्रे ताई व भागातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

आ. विजयसिंह पंडित यांनी नाथ सृष्टी-लोढा नगरी गणेश मंडळ, अंकुश नगर गणेश मित्र मंडळ, शिवगर्जना गणेश मित्र मंडळ (धानोरा रोड), भालचंद्र गणेश मित्र मंडळ (संत नामदेव नगर), काळभैरव गणेश मित्र मंडळ (संत नामदेव नगर पूर्व), नाथ गणेश मित्र मंडळ (बंकट स्वामी कॉलनी), पालवन चौक, दक्षिणमुखी हनुमान गणेश मित्र मंडळ (पालवन रोड) तसेच नक्षत्र गणेश

गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना परिसरातील रस्ते, पाणी, स्वच्छता, पथदिवे तसेच इतर नागरी सुविधांबाबत नागरिकांनी मांडलेल्या प्रश्नांची आमदार पंडित यांनी माहिती घेतली. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे त्यांनी यावेळी सांगितले.या प्रसंगी, नगरपालिकेचे नगरसेवक भैय्यासाहेब मोरे, नगरसेवक रंजीत बनसोडे,नगरसेवक प्रमोद अण्णा शिंदे, नगरसेवक दत्ताभाऊ जाधव, गणेश तांदळे, प्रभाकर पोपळे, अजिंक्य पांडव, राम शेळके, गजानन जवकर, जटाळ, राम शेळके, गजानन जवकर, संदीप पाटील यांच्यासह विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नेत्रतज्ज्ञ डॉ.एकनाथ शेळके यांना 'मराठवाडा भूषण पुरस्कार' प्रदान

**अंबाजोगाई :** स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाईचे नेतृत्व करणारे प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ.एकनाथ शेळके यांच्या दीर्घकाळच्या सेवाभावी व सामाजिक कार्याचा गौरव म्हणून त्यांना 'मराठवाडा भूषण पुरस्कार-२०२६' १७ सप्टेंबर रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे प्रदान करण्यात आला.

बीड जिल्ह्यातील किल्ले धारूर येथील सामान्य कुटुंबातून वैद्यकीय शिक्षण घेत डॉ.शेळके यांनी गोरगरीब व गरजू रूग्णांची सेवा करण्याचे ध्येय जोपासले. एमबीबीएस व एमएस (नेत्र शल्यचिकित्सा) शिक्षणानंतर त्यांनी सन २००७ पासून पुणे येथील शासकीय रूग्णालयापासून अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयापर्यंत आपल्या सेवाकार्याचा विस्तार केला. नेत्ररोगांच्या उपचारांसोबतच रूग्णांच्या मनातील भीती, वेदना व असहाय्यता समजून घेऊन त्यांना दिलासा देण्याचे संवेदनशील कार्य त्यांनी केले आहे. अंबाजोगाई, केज, धारूर तसेच ग्रामीण भागातील खेड्यापाड्यांत जाऊन मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू निदान शिबिरांच्या माध्यमातून हजारो गरजू रूग्णांवर उपचार व शस्त्रक्रिया करून त्यांना नवी दृष्टी देण्याचे कार्य त्यांनी केले. सन २००६ ते २०२५ या प्रदीर्घ कालावधीत लाखो रूग्णांची तपासणी, योग्य उपचार तसेच शस्त्र क्रियेसंदर्भात मार्गदर्शन करून त्यांनी नेत्रसेवेच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांना मोठा आधार दिला. विविध सामाजिक उपक्रम व वैद्यकीय शिबिरांमध्ये विनामूल्य सेवा देत त्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचविला. वैद्यकीय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासोबतच 'मोतीबिंदूमुक्त बीड जिल्हा' करण्याचा संकल्पही त्यांनी केला आहे. त्यांच्या अखंड व अतुलनीय नेत्रसेवेचा गौरव म्हणून मराठवाडा समन्वय समिती, पुणे यांच्या वतीने त्यांना 'मराठवाडा भूषण पुरस्कार-२०२६' प्रदान करण्यात आला. या सन्मानाबद्दल डॉ.एकनाथ शेळके यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.





सोयाबीन मलणी करतांना शेतकरी अल्प पाऊस पडल्याने सोयाबीन पिकातून खच निघणे आवघड झाले आहे शेतकरी यामुळे खूपच अडचणीत आहे.

## ज्येष्ठ पत्रकार परमेश्वर गित्ते यांचा पत्रकारिता सेवा गौरव पुरस्काराने सन्मान



**अंबाजोगाई :** त्रिदल नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार परमेश्वर गित्ते यांना त्यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'पत्रकारिता सेवा गौरव पत्रकारिता पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

पत्रकारिता क्षेत्रात सातत्याने कार्यरत राहून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणे, जनसामान्यांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविणे तसेच समाजहिताच्या विविध विषयांवर निर्भीडपणे लेखणी चालविणाऱ्या परमेश्वर गित्ते यांच्या कार्याची दखल घेत हा गौरव करण्यात आला.

यावेळी सायं. दैनिक बीड निक सिटीझनचे अंबाजोगाई प्रतिनिधी शेख फिरोज यांनी ज्येष्ठ पत्रकार परमेश्वर गित्ते यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पत्रकारिता क्षेत्रातील अनुभवी पत्रकाराचा झालेला हा सन्मान म्हणजे त्यांच्या प्रदीर्घ पत्रकारिता सेवेचा गौरव असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या सन्मानामुळे पत्रकारिता क्षेत्रातील विविध मान्यवर, पत्रकार आणि मित्रपरिवारातून परमेश्वर गित्ते यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## १,४०० अर्जदारांच्या नोकरभरतीवर प्रश्नचिन्ह; भरती प्रक्रिया रद्द करण्याची मागणी

### स्वाभिमानी संघटनेचे संपर्कप्रमुख मनोज भैया कदम यांच्या नेतृत्वाखाली स्वारातीर्थच्या अधिष्ठात्यांना निवेदन

**अंबाजोगाई :** स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई येथे स्मार्ट कंपनीमार्फत करण्यात येणाऱ्या नोकरभरती प्रक्रियेवर आक्षेप घेत स्वाभिमानी संघटना महाराष्ट्रचे संपर्कप्रमुख मनोज भैया कदम यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले.

या भरतीसाठी अंबाजोगाई परिसरातील सुमारे १,४०० महिला, विद्यार्थी व युवकांनी अर्ज केले होते. मात्र, भरती प्रक्रियेदरम्यान अचानक काही



उमेदवारांची निवड यादी जाहीर करण्यात आल्याने इतर अर्जदारांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. जाहीर करण्यात आलेली निवड यादी व संपूर्ण भरती प्रक्रिया पारदर्शक नसल्याचा आरोप निवेदनकर्त्यांनी केला असून, सदर भरती प्रक्रिया रद्द करून नव्याने पारदर्शक पद्धतीने भरती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

मनोज भैया कदम यांच्या नेतृत्वाखाली सर्व मित्रपरिवार व संबंधित अर्जदारांनी एकत्र येत स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांना निवेदन दिले. भरती प्रक्रियेतील निवड निकष, अर्जदारांची गुणवत्ता, निवड यादी तयार करण्याची पद्धत तसेच संबंधित कंपनीची भूमिका याबाबत सखोल चौकशी करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी निवेदनकर्त्यांनी "मोठ्यांचा आला गाडा आणि गरिबांचे घर मोडा" असा आरोप करत, आर्थिकदृष्ट्या वंचित असलेल्या युवकांना रोजगाराच्या संधींपासून दूर ठेवले जात असल्याची भावना व्यक्त केली.

दरम्यान, निवड प्रक्रिया प्रत्यक्षात बोगस असल्याचा आरोप करण्यात आला असला तरी, त्याबाबत अधिकृत चौकशीचा निष्कर्ष अथवा संबंधित प्रशासनाची भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी निवेदनकर्त्यांनी केली आहे.

पारदर्शक भरती, सर्व अर्जदारांना समान संधी आणि निवड प्रक्रियेची चौकशी या प्रमुख मागण्यांसाठी देण्यात आलेल्या या निवेदनामुळे अंबाजोगाईतील संबंधित नोकरभरतीचा मुद्दा चर्चेत आला आहे.

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## फळे पिकविणाऱ्या भट्ट्यांसह हॉटेल, बेकरींची तपासणी करा

### शिवराज्याभिषेक सोहळा समितीची मागणी

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२२ सप्टेंबर -

जिल्ह्यातील फळे पिकविणाऱ्या भट्ट्या तसेच हॉटेल, बेकरी आणि स्वीट मार्टमधील खाद्यपदार्थांची सखोल तपासणी करून नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी शिवराज्याभिषेक सोहळा समिती, धाराशिवच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत समितीने सोमवारी (दि.



२१) अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तांना सहाय्यक आयुक्तांमार्फत निवेदन पाठविले.

निवेदनात, जिल्ह्यात हॉटेल, बेकरी आणि स्वीट मार्टमध्ये खाद्यपदार्थ तयार करताना नियमबाह्य पदार्थ, रसायने व रंगांचा वापर होत असल्याचे समितीने नमूद केले आहे. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही समितीने दिला आहे.

यावेळी समितीचे उपाध्यक्ष हनुमंत यादव, सचिव आकाश भोसले, शहराध्यक्ष संतोष घोरपडे, हनुमंत तांबे, रामानंद माढेकर, दत्तात्रय साळुंके, अविनाश रणखांब, अमोल साळुंके, विशाल घोडके यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# दुष्काळ जाहीर करा, ५० हजारांची तातडीची मदत द्या; शेतकऱ्यांचा महामार्गावर रास्ता रोको



**पिकांचे ८५ टक्के नुकसान झाल्याचा दावा, कृत्रिम पावसाचीही मागणी...**

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२२ सप्टेंबर -

पावसाअभावी खरीप हंगामातील पिके करपून गेल्याने संपूर्ण जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी, तसेच कृत्रिम पाऊस पाडण्याची प्रक्रिया राबवावी, या मागण्यांसाठी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने सोमवारी येडशी येथे छत्रपती संभाजीनगर-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर सुमारे दीड तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलनामुळे महामार्गाच्या दोन्ही बाजूंना सुमारे तीन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या.



**येडशी येथील महामार्गावर तब्बल दीड तास आंदोलन...**

शेतकरी संघर्ष समितीचे जिल्हा संयोजक संजय पाटील दुधगावकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात शेतकऱ्यांनी शासनाच्या धोरणांविरोधात आक्रोश व्यक्त केला. मंडळ अधिकारी आंदोलनस्थळी दाखल झाले. त्यांच्याकडे शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

जिल्ह्यात पावसाळ्याचे जवळपास साडेतीन महिने उलटूनही सरासरीच्या तुलनेत मोठी तूट राहिल्याने सोयाबीन, मका, उडीद, मूग, ऊस तसेच पालेभाज्या व फळभाज्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला.

गतवर्षी अतिवृष्टी आणि यंदा पावसाअभावी शेतीचे नुकसान झाल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. शासनाने धाराशिव जिल्हा कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करून हेक्टरी ५० हजार रुपयांची तातडीची मदत द्यावी, नियमित पीककर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान द्यावे, तसेच मागील कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था करावी, पीकविमा योजनेतील रद्द करण्यात आलेले ट्रिगर पुन्हा लागू करून २५ टक्के अग्रीम भरपाई द्यावी, अशी मागणीही करण्यात आली. उसाचे थकीत बिल तातडीने देण्याचे आदेश साखर कारखान्यांना द्यावेत, गूळ पावडर कारखान्यांना एफआरपीच्या कक्षेत आणावे, अशी मागणी करण्यात आली.

परतीच्या पावसासाठी कृत्रिम पावसाची कार्यवाही करावी, खरीप पिकांच्या नुकसानीबाबत शास्त्रज्ञांनी केलेल्या संयुक्त पाहणीचा अहवाल ग्राह्य धरावा, महिला व शेतमजुरांना रोजगार उपलब्ध करून द्यावा, विद्यार्थ्यांचे परीक्षा व शैक्षणिक शुल्क माफ करावे, शेतकऱ्यांना दिवसा पूर्ण क्षमतेने आठ तास वीज द्यावी, शेतीमालाला हमीभावाचा कायदा लागू करावा, अशा मागण्याही करण्यात आल्या. वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या शेती नुकसानीवर तातडीने उपाययोजना करून बाधित शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली.

आंदोलनात शेतकरी संघर्ष समितीचे जिल्हा संयोजक संजय पाटील दुधगावकर, दयानंद पाटील, सुरेश नाईकनवरे, इकबाल पटेल यांच्यासह परिसरातील शेतकरी, शेतमजूर व तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### परंड्यात पक्षप्रवेशाने राजकीय समीकरणांना वेग...

## माजी सभापती शंकर इतापे यांचा तानाजी सावंत यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश



तभा वृत्तसेवा
परंडा, दि.२२ सप्टेंबर -

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर परंडा तालुक्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. लोणी जिल्हा परिषद गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य तथा परंडा पंचायत समितीचे माजी सभापती शंकर तात्या इतापे यांनी समर्थकांसह आमदार प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. हा प्रवेश १९ सप्टेंबर रोजी पुणे येथे झाला. या घडामोडीची स्थानिक राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

इतापे यांनी यापूर्वी जिल्हा परिषद सदस्य म्हणून तसेच त्यांच्या पत्नी काशीबाई इतापे यांनी पंचायत समितीच्या सभापतीपदाची जबाबदारी सांभाळली आहे. आता त्यांनी शिवसेनेत प्रवेश केल्याने आगामी स्थानिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर लोणी गटातील राजकीय समीकरणांवर त्याचा परिणाम होतो का, याकडे लक्ष लागले आहे.



**पक्ष प्रवेशाने लोणी गटात चर्चेला उधाण**

पक्षप्रवेशावेळी जिल्हाप्रमुख दत्ता साळुंखे यांच्यासह तानाजीराव सावंत प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामचंद्र घोगरे, माजी उपसभापती मेघराज पाटील, उद्योजक राजाभाऊ शेळके, ढगपिंपरीचे उपसरपंच अशोक गरड, पंचायत समितीचे माजी सदस्य गुलाब शिंदे, महालिंग राऊत आदी उपस्थित होते.

दरम्यान, शिवसेना तालुकाप्रमुख अण्णासाहेब जाधव यांच्या गैरहजेरीचीही स्थानिक राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे. विशेषतः आसू परिसरातील राजकीय संबंध आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या गैरहजेरीकडे वेगवेगळ्या राजकीय दृष्टिकोनातून पाहिले जात आहे. आसू येथील महालिंग राऊत आणि शंकर इतापे यांच्यात यापूर्वी स्थानिक राजकारणातून मतभेद असल्याची चर्चा आहे. मागील जिल्हा परिषद निवडणुकीत लोणी गटातून राऊत यांनी शिवसेनेच्या उमेदवार म्हणून निवडणूक लढवली होती. त्यामुळे इतापे यांच्या शिवसेना प्रवेशानंतर आसू व लोणी परिसरातील स्थानिक राजकीय समीकरणे कशी बदलतात, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

एकीकडे नव्या पक्षप्रवेशामुळे संघटनात्मक हालचाली वाढल्या असताना दुसरीकडे स्थानिक पातळीवरील गटबाजी आणि जुन्या राजकीय संबंधांचे काय परिणाम होतात, हे आगामी काळात स्पष्ट होणार आहे.

## सेवाभावी कार्याची दखल; सुजातााताई चव्हाण यांना 'समाजभूषण' पुरस्कार

तभा वृत्तसेवा
अणदूर, दि.२२ सप्टेंबर -

तुळजापूर तालुका व परिसरात विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून सेवाभावी कार्य केल्याबद्दल अणदूर येथील पौर्णिमा सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती सुजाताताई (बाबई) चव्हाण यांचा तुळजापूर शिक्षक संघटना व शिक्षक पतसंस्थेच्या वतीने 'समाजभूषण' पुरस्काराने सन्मान करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

या सन्मान सोहळ्यास तुळजापूर शिक्षक सोसायटीचे चेअरमन नागेश स्वामी, शिक्षक नेते बापू पडवळ, सुनील सूर्यवंशी, डी. डी. कदम, रुपाली स्वामी, बालाजी कदम, संगीता घुगे यांच्यासह विविध क्षेत्रांतील अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.



**शिक्षक संघटना व शिक्षक पतसंस्थेतर्फे गौरव**

पौर्णिमा महिला बहुउद्देशीय संस्था गेल्या अनेक वर्षांपासून तुळजापूर तालुक्यासह धाराशिव जिल्ह्यातील महिला, मुली, गरजू कुटुंबे व वंचित घटकांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. महिलांना स्वावलंबी करण्यासाठी बचत गट, शिवणकाम व ब्युटी प्रशिक्षण, महिला उद्योजकता, शेळीपालन व दुग्ध व्यवसायाला प्रोत्साहन देण्याचे काम संस्थेमार्फत केले जाते.

तसेच बालविवाह प्रतिबंध, व्यसनमुक्ती, बालमजुरी निर्मूलन, मुलींच्या शिक्षणासाठी मदत, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप आणि आपत्तीच्या काळात गरजू कुटुंबांना मदत अशा विविध क्षेत्रांत संस्थेचे कार्य सुरू आहे. या कार्यात सुजाताताई चव्हाण व व्यवस्थापक नागेश चव्हाण यांचे मोलाचे योगदान आहे.

शेतकरी व महिला शेतकऱ्यांसाठी वृक्षारोपण, जलसंधारण, बियाणे वाटप तसेच शेतीपूरक उपक्रम राबवून ग्रामीण भागातील कुटुंबांना आधार देण्याचे कामही संस्थेच्या माध्यमातून केले जाते. अनेक गरजू, गरीब व वंचित कुटुंबांपर्यंत मदत पोहोचविल्याने सुजाताताई चव्हाण या परिसरात 'गरजवंतांच्या बाबई' म्हणून परिचित आहेत.

## येवतीत घर फोडून ३.९९ लाखांचा ऐवज लंपास

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२२ सप्टेंबर -

तुळजापूर तालुक्यातील येवती येथे घराचा कडी-कोंडा उचकटून अज्ञात चोरट्यांनी घरातील सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम व गृहउपयोगी साहित्य असा एकूण ३ लाख ९९ हजार १५० रुपयांचा ऐवज लंपास केला.



महेश ज्ञानोबा भरगंडे यांच्या राहत्या घरात दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून दि. १९ सप्टेंबर रोजी सकाळी ७.१० वाजेपर्यंतच्या कालावधीत ही चोरी झाली. अज्ञात व्यक्तीने घराचा कडी-कोंडा उचकटून आत प्रवेश केला आणि कपाटातील मौल्यवान वस्तू व रोख रक्कम चोरून नेली.

याप्रकरणी महेश भरगंडे यांनी दि. २० सप्टेंबर रोजी नळदुर्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## रुपामाता अर्बन व मल्टीस्टेट सभासदांना ११ टक्के लाभांश देणार

**२३ वी व १५ वी संयुक्त वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात; आर्थिक प्रगतीचा घेतला आढावा**

### ॲड. व्यंकटराव गुंड यांची घोषणा...

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२२ सप्टेंबर -

रुपामाता अर्बन व मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., धाराशिव यांच्या २३ व्या व १५ व्या संयुक्त वार्षिक सर्वसाधारण सभा 'नातं... व्यवसायापलीकडचं...!' या ब्रीदवाक्याला साजेशा खेळीमेळीच्या वातावरणात उत्साहात पार पडल्या. या सभेत दोन्ही संस्थांच्या सभासदांना ११ टक्के लाभांश देण्याची घोषणा करण्यात आली.

सभेस रुपामाता उद्योग समूहाचे संस्थापक व कुटुंबप्रमुख ॲड. व्यंकटराव गुंड पाटील, मार्गदर्शक तथा चेअरमन सुधाकर गुंड गुरूजी, जिल्हा सहकार बोर्डाचे अधिकारी मधुकर जाधव व संचालक ॲड. अजित गुंड पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. रुपामाता अर्बनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यनारायण बोधले आणि मल्टीस्टेटचे मुख्य कार्यकारी





अधिकारी मिलिंद खांडेकर यांनी दोन्ही संस्थांचे वार्षिक अहवाल सादर केले. संस्थेची आर्थिक वाटचाल, व्यवसायवृद्धी, सभासदाभिमुख उपक्रम तसेच आगामी योजनांचा आढावा सभेसमोर मांडण्यात आला. सभासदांच्या विश्वासामुळे संस्थांनी विविध क्षेत्रांत सातत्याने प्रगती केली असून भविष्यातही सभासदांना अधिक दर्जेदार आर्थिक सेवा देण्याचा मानस व्यक्त करण्यात आला. यावेळी दोन्ही संस्थांचे संचालक, पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सभेदरम्यान सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतकांनी संस्थेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. पारदर्शक कारभारासोबतच सभासदांशी असलेले विश्वासाचे नाते अधिक दृढ करण्यावर भर देण्यात आला.

संस्थापक ॲड. व्यंकटराव गुंड पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रुपामाता अर्बन व मल्टीस्टेटने सहकार क्षेत्रात निर्माण केलेला विश्वास, सभासदांचा वाढता सहभाग आणि सातत्यपूर्ण आर्थिक वाटचाल यामुळे संस्थांच्या पुढील प्रगतीबाबत विश्वास व्यक्त करण्यात आला. सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक व कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे सभा यशस्वी झाली.

सोलापूर तरुण भारत
नियमित वाचा...

## दुष्काळाच्या झळा, त्यात वसंतनगरसह नळदुर्ग शहरात जुगाराचे अड्डे; कारवाईची मागणी

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.२२ सप्टेंबर -

ऐन सणासुदीच्या दिवसांत नळदुर्ग शहर व परिसरात चक्री जुगार तसेच पत्त्यांचे क्लब सुरू असल्याने पोलिसांनी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. तालुक्यात दुष्काळी परिस्थिती गंभीर असताना जुगाराच्या आहारी जाऊन सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक नुकसान होऊ नये, यासाठी पोलिस प्रशासनाने कठोर भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

तुळजापूर तालुक्यात सध्या दुष्काळाची तीव्र परिस्थिती निर्माण झाली असून शेतकरी व सर्वसामान्य नागरिक आर्थिक अडचणींचा सामना करीत आहेत. अशा परिस्थितीत शहर व परिसरात नव्याने चक्री जुगार व पत्त्यांचे क्लब सुरू झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.



**शहरात चक्री जुगार व पत्त्यांच्या क्लबचा सुळसुळाट...**

पोलिस प्रशासनाने अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

नळदुर्ग शहरातील वसंतनगर परिसरात ऑनलाइन चक्री जुगार सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यापूर्वीही शहरात ऑनलाइन चक्री जुगार सुरू झाल्यानंतर महाविद्यालयीन विद्यार्थी, शेतकरी व सर्वसामान्य कुटुंबातील तरुण त्याच्या आहारी गेल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यावेळी पोलिसांनी कारवाई करून हा प्रकार बंद केला होता. आता पुन्हा हा प्रकार सुरू झाल्याने तातडीने कारवाई करण्याची मागणी होत आहे.

नळदुर्ग पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सलगरा दिवटी बीटमध्ये पत्त्याचा क्लब सुरू असल्याचा आरोप असून जळकोट, अणदूर व इटकळ बीटमध्येही चक्री जुगार व पत्त्यांचे क्लब सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.


उपविभागीय पोलिस अधिकारी मनोहर पाटील व नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रविंद्र गायकवाड यांनी शहर व परिसरातील अशा प्रकारांची तातडीने तपासणी करून बेकायदा जुगार सुरू असल्याचे आढळल्यास संबंधितांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## मोबाईल तारकही, मारकही; यशासाठी कष्ट, सातत्य अन् एकाग्रता गरजेची : अहंकारी

तभा वृत्तसेवा
अणदूर, दि.२२ सप्टेंबर -

प्रत्येकाच्या जीवनातील यशाचा मार्ग वेगवेगळा असतो. विद्यार्थ्यांना केवळ शिक्षण देण्याबरोबरच आदर्श नागरिक घडविण्याचे काम जवाहर विद्यालयात केले जाते. शिक्षण घेणे म्हणजे केवळ यश मिळविणे नव्हे, तर आदर्श नागरिक बनणे हेच खरे यश आहे. यशाच्या शिखरावर जाताना आई-वडील, मित्रपरिवार व नातेवाईकांची साथ लाभते. प्रामाणिकपणे कष्ट आणि सातत्याने अभ्यास केल्यास यशाचा मार्ग सुकर होतो, असे प्रतिपादन नळदुर्गचे माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी केले.

अणदूर येथील जवाहर विद्यालयात गणेशोत्सवानिमित्त आयोजित पहिल्या व्याख्यानमालेतील 'यश म्हणजे काय असतं?' या विषयावरील व्याख्यानात ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामचंद्र आलुरे होते. आप्पासाहेब शेटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



**जवाहर विद्यालयात 'यश म्हणजे काय असतं?' : व्याख्यान संपन्न**

अहंकारी म्हणाले की, यशमिळविण्यात आई-वडील आणि गुरुजनांचा मोठा वाटा असतो. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अतिवापर टाळावा. मोबाईल आपल्या आचार-विचारांवर परिणाम करू शकतो. यशासाठी मोबाईल जितका उपयुक्त आहे, तितकाच त्याचा अतिवापर घातक ठरू शकतो, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात रामचंद्र आलुरे यांनी जवाहर विद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणून विनायक अहंकारी यांच्या कार्याचा गौरव केला. विद्यार्थ्यांनी परिस्थितीची जाणीव ठेवून अभ्यासाशी एकरूप व्हावे, अभ्यासात सातत्य ठेवावे आणि यशासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी, असे आवाहन त्यांनी केले. आई-वडील व शिक्षक हे जीवनाचे खरे शिल्पकार असून त्यांच्याप्रती आदरभाव ठेवावा. शाळा आणि गावाबद्दल अभिमान बाळगावा. कर्म हीच पूजा असून अभ्यासातील एकाग्रता विद्यार्थ्यांना यशाच्या शिखरापर्यंत घेऊन जाते, असेही त्यांनी सांगितले.


कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी, सामाजिक कार्यकर्ते राम हांडगे, मकरंद पाटील, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार रोहित मोरे यांनी मानले.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## माजी उपनगराध्यक्ष मोईजभाई शेख यांचे निधन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ सप्टेंबर : शिवछत्रपती पुरस्काराने गौरविण्यात आलेले, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस, लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष तथा लातूरचे माजी उपनगराध्यक्ष मोईजभाई शेख यांचे मंगळवारी दि. २२ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने लातूरच्या सामाजिक, राजकीय आणि विशेषतः क्रीडा क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

मोईजभाई शेख यांनी आपल्या प्रदीर्घ सार्वजनिक जीवनात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान दिले. उत्तम खेळाडू म्हणून त्यांनी क्रीडा क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. विशेषतः हॉलीबॉलच्या विकासासाठी त्यांनी सातत्याने कार्य केले. जिल्ह्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देणे, विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे तसेच खेळाडूंना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहिले.

लातूर जिल्हा हॉलीबॉल संघटनेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी संघटनात्मक पातळीवर महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या कार्यकाळात अनेक खेळाडूंना व्यासपीठ मिळाले आणि क्रीडा क्षेत्राला चालना मिळाली. त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाची दखल घेत त्यांना शिवछत्रपती पुरस्काराने गौरविण्यात आले होते. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच सामाजिक, राजकीय आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांकडून शोक व्यक्त करण्यात आला.



## विविध वृत्त.....

### महाराष्ट्र राज्य बाजार समितीच्या प्रभारी सभापतीपदी संतोष सोमवंशी



तभा वृत्तसेवा

औसा दि २२ सप्टेंबर : महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ पुणे चे सभापती बाळासाहेब नाहटा यांच्या विरोधातील अविश्र्वास ठराव सर्वानुमते मंजूर झाल्यानंतर सभापतीपद रिक्त झाले. या रिक्त झालेल्या पदाचा प्रभारी सभापती म्हणून संघाचे उपसभापती संतोष सोमवंशी यांच्याकडे पदभार सोपविण्यात आला आहे.

पुणे येथे झालेल्या संघाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत अविश्र्वास ठरावावर चर्चा झाली. या बैठकीत सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला. त्यानंतर सभापतीपदाची जबाबदारी उपसभापती संतोष सोमवंशी यांच्याकडे सोपविण्यात आली.

पदभार स्विकारल्यानंतर सोमवंशी यांनी बाजार समित्यांच्या माध्यमातून शेतकरी, व्यापारी व संबंधित घटकांच्या हितासाठी संघाचे कामकाज अधिक प्रभावीपणे पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. राज्यातील बाजार समित्यांच्या विविध प्रश्र्नांवर समन्वय साधून त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करण्यास प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

संतोष सोमवंशी यांची प्रभारी सभापतीपदी नियुक्ती झाल्याबद्दल बाजार समिती क्षेत्रातील पदाधिकारी, संचालक व सहकार क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# लातुरात ऑटोचालक रमाकांत कसबे यांचा प्रामाणिकपणा रिक्षात विसरलेली मौल्यवान साहित्याची बॅग मूळ मालकास सोपविली

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २२ सप्टेंबर : लातूर शहरातील ऑटोचालक रमाकांत कसबे यांनी आपल्या ऑटोरिक्षात विसरलेली एका प्रवाशाची बॅग आतील मौल्यवान साहित्यांसह मूळ मालकास सुपूर्द करून प्रामाणिकपणाचे एक आदर्श उदाहरण समाजासमोर प्रस्तुत केले. या प्रामाणिकपणाबद्दल विवेकानंद पोलीस ठाण्याच्या वतीने कसबे यांच्यासंमं करण्यात आला.

प्रवाशाची घाईगडबडीत ऑटोमध्ये विसरलेली लॅपटॉप, महत्त्वाची कागदपत्रे, ओळखपत्रे व इतर मौल्यवान साहित्य असलेली बॅग ऑटोचालकाने प्रामाणिकपणे पोलिसांच्या स्वाधीन केली. विवेकानंद चौक पोलिसांनी तत्परता दाखवत बॅगमधील कागदपत्रांच्या आधारे मूळ मालकाचा शोध घेऊन सुमारे एक लाख रुपये किमतीचा लॅपटॉप व इतर साहित्य सुरक्षितपणे परत केले. ऑटोचालकाच्या या प्रामाणिकपणाचे कौतुक करत पोलिसांनी त्यांचा सन्मान केला.ऑटोचालक रमाकांत अभंग कसबे, रा. राजीव नगर, लातूर यांच्या ऑटोमधून तय्यब चांदपाशा शेख,



रा. पानचिंचोली हे लातूर येथे आले होते. लातूर येथे उतरताना घाईगडबडीत शेख यांची लॅपटॉप, महत्त्वाची कागदपत्रे, ओळखपत्रे व इतर साहित्य असलेली बॅग ऑटोमध्येच राहिली. प्रवासी निघून गेल्यानंतर काही वेळाने ऑटोचालक रमाकांत कसबे यांच्या निदर्शनास ही बॅग आली.बॅगेतील साहित्याची पाहणी केल्यानंतर ती कोणीतरी प्रवासी विसरल्याचे लक्षात येताच कसबे यांनी कोणताही स्वार्थ न ठेवता सदर बॅग विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात आणून जमा केली. पोलिसांनी बॅगेतील कागदपत्रांच्या आधारे तिच्या मूळ मालकाचा शोध घेतला. त्यानंतर तय्यब चांदपाशा शेख यांच्याशी संपर्क साधून त्यांना पोलीस ठाण्यात बोलावून घेण्यात आले.

ओळख व मालकीची खात्री केल्यानंतर पोलिसांनी सुमारे एक लाख रुपये किमतीचा लॅपटॉप, महत्त्वाची कागदपत्रे, ओळखपत्रे व इतर साहित्य असलेली बॅग तय्यब शेख यांच्या स्वाधीन केली. मौल्यवान वस्तू परत मिळाल्याने शेख यांनी विवेकानंद चौक पोलिसांचे तसेच ऑटोचालक रमाकांत कसबे यांचे आभार मानले. दरम्यान, ऑटोचालक रमाकांत कसबे यांनी दाखविलेल्या प्रामाणिकपणा व सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांच्या हस्ते त्यांचा शाल, श्रीफळ व हार देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी पोलीस उपनिरीक्षक चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक आंधळे, पोलीस अंमलदार धैर्यशील मुळे यांच्यासह पोलीस अधिकारी-अंमलदार व नागरिक उपस्थित होते. प्रवाशाच्या मौल्यवान वस्तू स्वतःकडे न ठेवता त्या पोलिसांच्या स्वाधीन करून प्रामाणिकपणाचा आदर्श निर्माण करणाऱ्या रमाकांत कसबे यांच्या कृतीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### दिवाळी २०२६ निमित्त तात्पुरत्या फटाका विक्री परवान्यासाठी २८ सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २२ सप्टेंबर : दिवाळी २०२६ सणानिमित्त जिल्ह्यात तात्पुरत्या स्वरूपात फटाका विक्री दुकाने सुरू करण्यासाठी परवान्याकरिता २८ सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

'एक्सप्लोसिव्ह रूल्स २००८' मधील नियम ८४ नुसार सुरक्षा अटींच्या अधीन राहून तात्पुरता परवाना देण्याचे अधिकार जिल्हादंडाधिकारी यांना असून यानुसार अर्जांची छाननी, स्थळ पाहणी आणि विविध परवानग्यांची कार्यवाही पूर्ण केली जाणार आहे. अर्जदारांनी २८ सप्टेंबर २०२६ पर्यंत सेतू सुविधामधून प्राप्त विहित नमुन्यातील अर्ज, आधार कार्ड अथवा विजेचे बिल यांसारखा रहिवास पुरावा, स्थानिक स्वराज्य संस्थेचा नाहरकत दाखला, जागेच्या मालकीचा पुरावा किंवा भाडेपट्टा, तसेच जागा भाडेतत्त्वावर असल्यास जागामालकाचे संमतीपत्र, प्रस्तावित दुकानाच्या जागेचा नकाशा व लेआउट प्लॅन या आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावयाचे आहेत.

त्यानंतर १८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत तहसीलदार व पोलीस विभागाकडून प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून अहवाल सादर केला जाईल. या पाहणीदरम्यान प्रस्तावित जागा सुरक्षित असणे, शेड ज्वलनशील नसलेल्या साहित्याचे असणे, दोन शेडमध्ये किमान ३ मीटरचे तर सुरक्षित कामापासून ५० मीटरचे अंतर असणे, क्लस्टरमध्ये ५० पेक्षा अधिक दुकाने नसणे, शाळा, रुग्णालये, धार्मिक स्थळे, पेट्रोल पंप व दाट लोकवस्तीच्या ठिकाणांपासून सुरक्षित अंतर असणे, तसेच अग्निशमन व आपत्कालीन मार्ग उपलब्ध असणे या सर्व सुरक्षा निकषांची पडताळणी केली जाणार आहे.

१९ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत कार्यालयीन छाननी व विहित परवाना शुल्क भरण्याची प्रक्रिया पार पडेल आणि पात्र ठरलेल्या अर्जदारांना २३ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबर २०२६ दरम्यान अंतिम तात्पुरता फटाका विक्री परवाना निर्गमित केला जाईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

## रक्तदानासोबत रस्ता सुरक्षेचा संदेश; चाकूरमध्ये १०४ रक्तदात्यांना हेल्मेट भेट देऊन सन्मान, मोरया व्यापारी गणेश मंडळाचा स्तुत्य उपक्रम

तभा वृत्तसेवा

चाकूर दि. २२ सप्टेंबर : शहरातील बोथी रोड, येथील मोरया व्यापारी गणेश मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात तब्बल १०४ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. विशेष म्हणजे मोरया व्यापारी गणेश मंडळाच्या वतीने रक्तदात्यांना प्रमाणपत्रासोबतच हेल्मेट भेट देऊन त्यांचा अनोखा सन्मान करण्यात आला आणि रस्ता सुरक्षेचा संदेश देण्यात आला.



या रक्तदान शिबिराचे उद्घाटन अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सूरज बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष डॉ. चंद्रप्रकाश नागीमे हे होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक बालाजी भंडे, पोलीस उपनिरीक्षक किरण रायझुबे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष बालाजी सूर्यवंशी, अनिल वाडकर, जिल्हा उपाध्यक्ष संतोष फुलारी, डॉ. एन. जी. मिर्झा, डॉ. सतीश कदम, डॉ. लक्ष्मण कोरे, डॉ. कृष्णकुमार काप्रतवार, माजी उप नगराध्यक्ष अरविंद बिरादार, विनोद नीला, संदीप शेटे, बिलाल पठाण, पपन कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

व्यापारी गणेश मंडळाने यावर्षी केवळ रक्तदानच नव्हे तर रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती करण्याचा स्तुत्य उपक्रम राबवला. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक दात्याला हेल्मेट भेट देण्यात आले. रक्तदान करून तुम्ही एका व्यक्तीचा जीव वाचवता, आणि हेल्मेट घालून तुम्ही स्वतःचा जीव वाचवा, असा संदेश यावेळी देण्यात आला.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मोरगे, उपाध्यक्ष नरसिंग जाधव, सचिव शिवम कोरे, कोषाध्यक्ष विश्र्वप्रताप सूर्यवंशी, गणेश माकने, सजावट प्रमुख परमेश्र्वर आवाळे, मिरवणूक प्रमुख राम काळे, नागेश पाटील, नितीन हाके, अनिल मोठे, ओम अक्कानवरु, मंगेश घुमे, मनोज चिटबोने, दयानंद पाटील, शैलेश रोडगे, सचिन पाटील, नारायण गोलावार, गोविंद जाधव, गोटू सोमवंशी, विजय कोरे, विठ्ठल जाधव, ओम बिरनाळे, रंगनाथ चिद्रेवार, सुधाकर घुगे आणि चंद्रकांत वट्टमवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

## महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २२ सप्टेंबर : महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठीच्या ऑनलाइन पोर्टलचा शुभारंभ राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांचे हस्ते करण्यात आला आहे. शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर महिला शेतकऱ्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांच्या या योगदानाला अधिकृत ओळख मिळावी आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांना अधिक सुलभतेने मिळावा, यासाठी महिला शेतकरी प्रमाणपत्र हा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या माध्यमातून राज्यातील पात्र महिला शेतकऱ्यांना अधिकृत ओळख मिळणार असून, कृषी योजना, कृषी कर्ज, विमा, कृषी निविष्ठा, विस्तार सेवा तसेच विविध शासकीय कल्याणकारी योजनांचा लाभ अधिक सुलभतेने मिळण्यास मदत होणार आहे.

विशेष म्हणजे, महिला शेतकरी म्हणून मान्यता देताना केवळ जमिनीची मालकी हा निकष न ठेवता शेतीतील प्रत्यक्ष सहभागाला महत्त्व देण्यात आले आहे. पिकांची लागवड, बीजोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय, मधुमक्षिकापालन, फलोत्पादन, पुष्पोत्पादन यांसह विविध शेती व शेतीपूरक कामांमध्ये सहभागी महिलांचा यामध्ये समावेश आहे.

तसेच भाडेपट्ट्याने किंवा बटाईने शेती करणाऱ्या महिला, भूमिहीन शेतकरी, भूमिहीन पशुपालक, शेतमजूर, रोपमळा मजूर आणि पशुचारक यांनाही या उपक्रमाचा लाभ मिळणार आहे. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून पात्र महिला शेतकऱ्यांची ओळख पटवून त्यांना प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्यास प्रोत्साहित करण्यात येणार आहे. २ ऑक्टोबर २०२६ च्या ग्रामसभेत या महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्र वाटपाचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

## संघर्ष, कष्ट आणि संस्कारांतून जीवन घडते : डॉ. लहाने



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २२ सप्टेंबर : जीवनात यश संपादन करण्यासाठी अभ्यासासोबतच कष्ट, जिद्द आणि प्रतिकूल परिस्थितीशी सामना करण्याची तयारी आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी अडचणींना घाबरून न जाता त्यांच्यावर मात करून शिक्षण घ्यावे, असा प्रेरणादायी संदेश सुप्रसिद्ध सर्जन डॉ. विठ्ठल लहाने यांनी दिला.

निलंगा तालुक्यातील औराद शहाजनी येथील श्री विरूपाक्षेश्र्वर नवतरुण गणेश मंडळाच्या वतीने रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी श्री विरूपाक्षेश्र्वर मठ येथे 'असा मी घडलो' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी डॉ. लहाने यांनी आपल्या जीवनातील अनुभव आणि संघर्षाची कहाणी उपस्थितांसमोर मांडली.

पालकांनी मुलांना अति सुख-सुविधांमध्ये वाढविण्याऐवजी त्यांना कष्टाचे महत्त्व समजावून सांगावे. मेहनत, शिस्त आणि संस्कार यांच्या बळावरच व्यक्तिमत्त्वाची घडण होते, असे त्यांनी नमूद केले. आई-वडिलांची सेवा करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असून, पालकांना वृद्धाश्रमात पाठविण्याच्या प्रवृत्तीपासून समाजाने दूर राहावे, असे आवाहन त्यांनी केले. माय-बाप आणि गुरूजी यांना जीवनातील सर्वोच्च स्थान देण्याचा संदेशही त्यांनी दिला.

एकत्र कुटुंबपद्धतीमुळे परस्परांमध्ये प्रेम, सहकार्य आणि संस्कार वाढतात. त्यामुळे कुटुंबव्यवस्थेचे जतन करणे आवश्यक असल्याचे डॉ. लहाने यांनी सांगितले. त्यांनी स्वतः चा जीवनप्रवास तसेच पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या जीवनातील प्रेरणादायी पैलू उपस्थितांसमोर मांडले.

कार्यक्रमाची सुरुवात गणेशाच्या आरतीने झाली. मंडळाच्या कार्याचा आढावा शिवपुत्र आंग्रे यांनी प्रास्ताविकातून मांडला. सतीश हानेगावे यांनी सूत्रसंचालन केले, तर मल्लिकार्जुन लातूरे यांनी आभार मानले.

## किनगाव येथील दुष्काळाची पाहणी; शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची मदत द्या,रोहित पवारांची मागणी



तभा वृत्तसेवा

किनगाव दि. २२ सप्टेंबर : मराठवाड्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीच्या पाहणीसाठी आमदार रोहित पवार सध्या दौऱ्यावर आहेत. लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील किनगाव येथे पोहोचून त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली. पावसाअभावी पिकांचे नुकसान होत असून शेतकरी आणि शेतमजुरांसमोर आर्थिक संकट निर्माण झाल्याचे पवारांनी सांगितले.

पाहणीनंतर बोलताना रोहित पवारांनी शेतकऱ्यांना हेक्टरी किमान ५० हजार रुपये आणि शेतमजूर कुटुंबांना २५ हजार रुपयांची मदत देण्याची मागणी केली. तसेच जनावरांसाठी तातडीने चारा छावण्या सुरू करण्याची मागणीही त्यांनी केली.

पवारांच्या म्हणण्यानुसार, किनगाव परीसरातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून किनगाव ध्येही पावसाची मोठी तूट आहे. राज्यातील दुष्काळग्रस्त भागात तातडीने उपाययोजना करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले.

२०२० मधील पीक विम्याची प्रलंबित रक्कम, मागील वर्षीच्या अतिवृष्टीची मदत आणि कर्जमाफीतील अटींचा मुद्दाही उपस्थित केला.

पवारांनी कर्नाटकातील दुष्काळ जाहीर करण्याच्या निर्णयाचा दाखला देत महाराष्ट्रातही तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली. दरम्यान, शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दुष्काळी परिस्थितीबाबत पत्र पाठवून हेक्टरी ५० हजार रुपये मदतीसह विविध मागण्या केल्या आहेत.

## 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमातून १९ हजार नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २२ सप्टेंबर : गणेशोत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या 'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष उपक्रमाला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्र्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने आणि विविध आरोग्य संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे हजारो नागरिकांपर्यंत मोफत आरोग्यसेवेचा लाभ पोहोचला आहे. अनंत चतुर्थीपर्यंत हे अभियान सुरु राहणार आहे.

लातूर जिल्ह्यात १५ सप्टेंबर ते २० सप्टेंबर दरम्यान ३२२ आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांतून १९ हजार ३४७ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या रुग्णांना तज्ज्ञांकडे पुढील उपचाराकरिता पाठविण्यात आले. मोफत आरोग्य तपासणी करण्यात आलेल्या रुग्णांमध्ये ८ हजार ३६७ पुरुष, ९ हजार १५१ महिला आणि १ हजार ८२९ बालकांचा समावेश आहे.

या अभियानात लातूर जिल्ह्यातील सर्व ग्रामीण, निमशहरी, शहरी अशा सर्व स्तरावरील सार्वजनिक आरोग्य संस्था, धर्मादाय नोंदणीकृत अंतर्गत आरोग्य संस्था, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना संलग्नित रुग्णालय, मुख्यमंत्री सहायता निधी योजना संलग्नित रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय यांचा समावेश आहे. हे अभियान २५ सप्टेंबर पर्यंत सुरु राहणार असून नागरिक, भाविक भक्तांनी या शिबिरात आपली आरोग्य तपासणी करून घ्यावी, लातूर येथील मुख्यमंत्री सहायता कक्षामार्फत करण्यात आले आहे.